अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

आज लक्ष्मी पूजन

दे धक्का!!

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. १ नोव्हेंबर २०२४ | ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : ३५ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

काँग्रेसच्या उमेदवारीमुळे आडम मास्तरांचा संतापाचा कडेलोट!

माघार न घेतल्यास करणार खा. प्रणिती शिंदेंबद्दल गौप्यस्फोट!

✔ सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर शहर मध्यचे राजकारण तापले आहे. उमेदवारी न दिल्याने मोची आणि मुस्लिम समाज नाराज असतानाच आता माकपला मतदारसंघ न सोडल्याने माजी आ. नरसय्या आडमही संतापलेले आहे. ४ नोव्हेंबरपर्यंत काँग्रेसने उमेदवारी काढून घ्यावी अन्यथा खा. प्रणिती शिंदेंबद्दल गौप्यस्फोट करून बॉम्ब टाकण्याचा इशारा दिला आहे. काँग्रेस आणि माकपच्या वादात आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही उडी घेतली असून आता तरी कोण उपयोगी आहेत अन् कोण उपयोग करून घेतात याचा विचार करा, असा सल्ला त्यांनी आडम मास्तर यांना दिला आहे.

महाविकास आघाडीच्या जागा वाटपात सोलापूर शहर मध्य मतदारसंघाची जागा काँग्रेसला सुटल्याने नरसय्या आडम मास्तर नाराज आहेत. लोकसभा निवडणुकीत खासदार प्रणिती शिंदे यांना पाठिंब्याबद्दल आडम यांनी मध्य माकपला सोडण्याची मागणी केली होती. ती महाआघाडीने मान्य केल्याचा दावा आडम यांनी केला होता. मात्र सुशीलकुमार शिंदे अथवा प्रणिती शिंदेंसह कोणत्याही काँग्रेसच्या नेत्यांनी त्यावर भाष्य केले नव्हते.

मध्यंतरी खासदार प्रणिती शिंद यांनी सोलापूर शहर मध्य मतदारसंघातून काँग्रेस पक्षाचा कार्यकर्ता निवडणूक लढवेल, असे स्पष्ट केले होते. त्यानुसार या मतदासंघातून काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांना उमेदवारी देण्यात आहे, त्यामुळे आडम मास्तर यांनी आज पत्रकार परिषद घेऊन महाविकास आघाडी विशेषतः काँग्रेसला इशारा दिलेला आहे.

आडम मास्तर म्हणाले, माकपच्या पॉलिट ब्यूरोचे सदस्य अशोक ढवळे यांचा बुधवारी रात्री मला फोन आला होता. सोलापूर शहर मध्य मतदारसंघ मिळविण्यासाठी चार तारखेपर्यंत प्रयत्न सुरू आहेत, असे सांगितले. आम्ही येत्या चार तारखेला सोनिया गांधी यांना भेटणार आहोत. त्यामुळे मी चार तारखेपर्यंत वाट बघणार आहोत. चार तारखेपर्यंत काँग्रेसने आम्हाला जागा सोडली नाही तर आपण पाच तारखेला काँग्रेस विशेषतः खासदार प्रणिती शिंदे यांच्याविषयी गौप्यस्फोट करणार आहोत.

आडम म्हणाले, निवडणुकीची आमची तयारी झालेली आहे. आमचे हजारो कार्यकर्ते फिरत आहेत. काँग्रेसवाल्यांना एकच इशारा देतो की, महाराष्ट्राचा हरियाणा होऊ देऊ नका. हातातोंडाशी आलेला घास वाया जाऊ देऊ नका. लोकसभेला ३१ जागा मिळाल्या, त्याच्या धुंदीत राहू नका.

डावे पक्ष लहान असतील, त्यांची ताकद कमी असेल. पण ते प्रमाणिक आहेत, असे आडम यांनी म्हटले आहे.

दरम्यान या वादात उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी उडी घेत आडम मास्तरांना चांगलं कोण आणि वाईट कोण, याची ओळखच पटलेली नाही.

आडम मास्तर हे विरोधी विचाराचे असतानाही गरिबाला घर दिले पाहिजे; म्हणून तीस हजार घरं आडम मास्तर यांच्या संस्थेच्या माध्यमातून बांधून दिलेली आहेत, असे म्हटले आहे.

मैत्रीपूर्ण लढत करू : नरोटे

काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष आहे. अशी उमेदवारी माघारी घेता येत नाही. पक्षाने उमेदवारी दिली आहे. आपण लढणार आहे. मैत्रीपूर्ण लढत करण्यास आपण तयार आहोत, असे शहर मध्यचे काँग्रेस उमेदवार चेतन नरोटे म्हणाले.



...अन्यथा परिणाम भोगावे लागतील : आडम मास्तर

शहर मध्य मतदारसंघातून काँग्रेसने माघार घ्यावी; अन्यथा त्यांना परिणाम भोगावे लागतील. ही जागा आम्ही कोणत्याही परिस्थिती जिंकू. आतापर्यंत वीस लाख रुपयांची देणगी आमच्या पक्षाकडे जमली आहे. काँग्रेसने माघार घेतली नाही तर पाच तारखेला आम्ही नक्की बॉम्ब फोडू.

लोकसेभेला आडम यांना 'मध्य'चे चॉकलेट

लोकसभेच्या वेळी काँग्रेसने नरसय्या आडम यांना मध्यच्या जागेसंदर्भात चॉकलेट दिलं, त्यामुळे त्या वेळी ते काँग्रेससोबत गेले. आता त्यांच्या लक्षात आले आहे. त्यामुळे पुढं काय करायचं, हे त्यांनी ठरवायचं आहे. कोण उपयोगी आहेत आणि कोण उपयोग करून घेतात, याचा विचार आडम मास्तर यांच्यासारख्या लोकांनी केला पाहिजे, असा सल्ला फडणवीस यांनी दिला आहे.

रणजितदादा कमळाचे की तुतारीचे?

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार

सातपुतेंच्या दाव्याने वाढली संभ्रमावस्था

✔ सोलापूर/प्रतिनिधी

माळशिरस विधानसभा मतदारसंघातून भाजपाकडून आ. राम सातपुते यांना पुन्हा मैदानात उतरवण्यात आले आहे. गतनिवणुकीत मोहिते- पाटलांमुळे सातपुते यांचा विजय सुकर झाला होता, आता त्याच मोहिते पाटलांमुळे सातपुते यांचा विजय अवघड झाला आहे. असे असले तरी सातपुते हे माळशिरसमध्ये कडवी लढत देतील असे बोलले जात आहे. अशातच पहिला डाव म्हणून त्यांनी आ. रणजितसिंह मोहिते पाटील भाजपमध्येच आहेत असा दावा केला आहे. त्यामुळे आता रणजितदादांबाबत संभ्रमावस्था निर्माण झाली आहे.

निवडणुकीत जेव्हा अकलूजमध्ये आले होते, तेव्हा त्यांच्या स्वागतासाठी आमदार रणजितसिंह थांबले होते. मात्र, नाराज फडणवीस हे तेव्हा सत्कार स्वीकारायला थांबले नव्हते. त्यावेळीपासून मोहिते पाटील आणि भाजपमध्ये लोकसभा निवडणुकीपासूनच अंतर पडले होते. रणजितसिंह यांनी भाजपच्या प्रदेश स्तरावरील अधिवेशनाला पुण्यात हजेरी लावली होती. मात्र, सोलापूरच्या राजकारणात त्यांनी भाजपपासून लांब राहणेच पसंत केलेले आहे. अकलूज येथे नुकत्याच झालेल्या ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांच्या कार्यक्रमात रणजितदादांनी जिल्ह्याच्या विकासासाठी कोणतीही टोकाची भूमिका घेण्याची आपली तयारी आहे, असे सांगितले होते. त्यातून ते काँग्रेस अथवा पवार गटात जाऊन माढा विधानसभा लढवतील अशा चर्चा सुरू झाल्या होत्या. मात्र त्या सर्व फोल ठरल्या. आता रणजितदादा काय भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अशातच माळशिरसमधून उमेदवारी दाखल करताना सातपुते यांनी आमदार रणजितसिंह मोहिते पाटील हे अजूनही भाजपमध्ये आहेत, असा दावा केला आहे. त्यामुळे रणजितसिंह आता कमळाचे की तुतारीचे असा प्रश्न पडला आहे.

भारतीय जनता पक्षाने लोकसभा निवडणुकीत उमेदवारीमध्ये डावलल्यानंतर मोहिते पाटील यांनी बंड करत पवार गटात प्रवेश केला होता. धैर्यशील मोहिते पाटील यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून माढा मतदारसंघातून लोकसभेची निवडणूक लढवत जिंकली आहे. त्या निवडणुकीपासून रणजितसिंह मोहिते पाटील हे भाजपपासून चार हात लांब होते. भाजप आणि खुद्द भावाच्या प्रचार सभेलाही त्यांनी हजेरी लावली नव्हती. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस लोकसभा

रणजितदादांच्या भूमिकेकडे लक्ष

लोकसभा निवडणुकीत आ. रणजिसिंह मोहिते पाटील यांनी तटस्थ भूमिका घेतली होती. त्यानंतर ते महाआघाडीच्या स्टेजवर दिसले होते. मात्र त्यांनी भाजप पक्ष सोडला नव्हता. मात्र आता विधानसभा निवडणुकीत रणजितदादांना भूमिका घ्यावीच लागणार आहे.

बार्शीत घड्याळ झाले भुईसपाट!

भूमकर, सावळे यांचा महायुतीला दे धक्का!

✔ बार्शी/प्रतिनिधी

वैराग नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष निरंजन भूमकर व राष्ट्रवादी अजितदादा पवार गटाचे तालुकाध्यक्ष विक्रम सावळे यांनी अखेर दादांना रामराम ठोकला आहे. भूमकर आणि सावळे आपल्या सहकाऱ्यांसमवेत राष्ट्रवादीच्या शरद पवार गटात दाखल झाले आहेत. बार्शी विधानसभा मतदारसंघातील अत्यंत चुरशीच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली असताना भुमकर, सावळे यांच्या प्रवेशामुळे महायुतीला धक्का बसला आहे. बार्शीत अजितदादांची राष्ट्रवादी पुरती भुईसपाट झाली आहे.

शरद पवार गटामध्ये प्रवेश करताना भुमकर, सावळे यांनी बार्शीत नव्हे तर बारामती मध्ये आमदार रोहित पवार, खासदार निलेश लंके, यांच्या उपस्थितीमध्ये प्रवेश केला आहे. भूमकर, सावळे यांचा हा प्रवेश घडवून आणण्यास अर्थातच माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले यांची भूमिका महत्त्वाची ठरली आहे.

वैराग भागात माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले यांनी शरद पवार गटाचे बळ वाढविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना यश लाभले आहे. निरंजन भूमकर हे वैराग भागातील अनुभवी नेतृत्व आहे. भूमकर यांनी आजपर्यंत पंचायत समिती सदस्य व वैराग नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष म्हणून कार्यभार सांभाळला आहे. वैराग ग्रामपंचायतचे नगरपंचायतीमध्ये रूपांतर करण्यासाठी झालेल्या लोक चळवळीमध्ये भूमकर हे आघाडीवर होते. तसेच वैराग नगरपंचायतीच्याअत्यंत गाजलेल्या निवडणुकीत राऊत आणि सोपल यांच्या गटांच्या उमेदवारांना जोरदार टक्कर देऊन भुमकर यांनी राष्ट्रवादीचे १७ पैकी १३ नगरसेवक निवडून आणले होते व वैराग शहरात आपल्याला असलेल्या जनाधराची प्रचिती दिली होती. राष्ट्रवादीमध्ये तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे भूमकर यांना चांगले पाठबळ लाभले होते. भूमकर यांनी २०१९ आली विधानसभा निवडणूक राष्ट्रवादी कडून लढविली होती. प्रथमच आपत्कालीन परिस्थितीमध्ये राष्ट्रवादीकडून उमेदवारी लढविल्यानंतर भुमकर यांना १७ हजार मते मिळाली होती. त्यानंतर भूमकर हे तालुक्याच्या राजकारणात सक्रिय झाले होते. राष्ट्रवादीमध्ये अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली बंड झाले.

तेव्हा भूमकर यांनी सर्वप्रथम बार्शी तालुक्यात अजित दादांना समर्थन देण्याची भूमिका घेतली होती. त्यानंतर ते गेले वर्षभर अजित दादांच्या राष्ट्रवादीतच तळ ठोकून होते मात्र २५ वर्षाच्या राजकारणाचा अनुभव असलेल्या भूमकर यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला सोडचिठ्ठी देऊन शरद पवार गटात केलेला प्रवेश हा राजकीय दृष्ट्या महत्त्वाचा आहे.

वैराग भागाच्या राजकारणावर पडसाद उमटणार

भूमकर यांच्या या निर्णयाचा फायदा वैराग भागात ठाकरे सेनेचे उमेदवार दिलीप सोपल यांना होणार आहे, तसेच आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, बाजार समिती निवडणुकांमध्येही भूमकर यांच्या प्रवेशामुळे शरद पवार गटाचे बळ वाढले आहे. त्याचप्रमाणे सध्या बार्शी तालुक्याच्या राजकारणात शरद पवार यांच्या राष्ट्रवादीची सूत्रे ही प्रामुख्याने माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले यांच्या हातात आहेत. यांना भूमकर यांच्या या निर्णयाचा फायदा होणार आहे. भूमकर-सावळे यांच्या या निर्णयाचे पडसाद वैराग भागाच्या राजकारणावर उमटणार आहेत.

धक्का!!
सुराज्य सोलापूर
शुक्रवार, दि. १ नोव्हेंबर २०२४ । पान २

आता मिशन बंडोबांना थंडोबा करण्यासाठी आश्वासनांची खैरात

✔ मुंबई/प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीसाठी पक्षाची अधिकृत उमेदवारी न मिळाल्याने अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल करत निवडणूक निकालावर प्रतिकूल परिणाम करण्याची क्षमता असलेल्या बंडखोरांनी निवडणुकीतून माघार घ्यावी यासाठी त्यांची मनधरणी सुरू झाली आहे. प्रभावशाली बंडखोरांना शांत करण्यासाठी विधान परिषद, राज्यसभेचे सदस्यत्व, शासकीय महामंडळावर वर्णी लावण्याचे आश्वासन दिले जात आहे. त्यासाठी प्रमुख राजकीय पक्षांनी आपल्या नेत्यांना कामाला लावले आहे. या नेत्यांना येत्या ४ नोव्हेंबरपर्यंत बंडखोरी नियंत्रणात आणण्याचे मिशन दिले आहे. त्यासाठी बंडखोरांसोबत बैठकांचे सत्र सुरू झाले आहे.

पंधराव्या विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत काल, मंगळवारी संपली. राज्यातील २८८ विधानसभा मतदारसंघासाठी एकूण ७ हजार ९९५ उमेदवारांचे १० हजार ९०५ अर्ज दाखल झाले आहेत. काँग्रेस, शिवसेना - उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष यांची महाविकास आघाडी, भाजपच्या नेतृत्वाखालील शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची महायुती यामुळे प्रमुख राजकीय पक्षांना तिकीट वाटपात मर्यादा आल्या. आघाडीला आणि महायुतीला मित्र पक्षांना पुरेशा जागा देता आल्या नाहीत. त्यामुळे मित्र पक्षांनी आघाडी आणि महायुती विरोधात बंडाचे निशाण हाती घेतले आहे.

याशिवाय उमेदवारी नाकारली म्हणून प्रमुख राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी बंडखोरी केली आहे. उमेदवारी अर्ज माघारीपर्यंत या बंडखोरांना आवर घालण्याचे मोठे आव्हान राजकीय पक्षांसमोर आहे.

उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत संपल्यानंतर मंगळवारी रात्री मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांची बैठक झाली. या बैठकीत बंडखोरांना शांत करण्याबाबत चर्चा करण्यात आली. त्यानुसार स्वतः मुख्यमंत्री शिंदे हे आपल्या गटातील बंडखोरांशी संवाद साधणार आहेत. भाजपकडून नेते विनोद तावडे, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे बंडखोरांची समजूत काढणार आहेत. तर अजित पवार गटाकडून प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे बंडखोरांशी चर्चा करणार आहेत.

मतभेदांमुळे मित्र पक्ष आमने -सामने

आघाडी आणि महायुती यांच्यात शेवटच्या क्षणापर्यंत जागावाटपावर एकमत न झाल्याने परांडा विधानसभा मतदारसंघात शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या राहुल ज्ञानेश्वर पाटील आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या राहुल मोटे, सोलापूर दक्षिणमध्ये ठाकरे गटाचे अमित रतिकांत पाटील आणि काँग्रेसचे दिलीप माने, पंढरपूरमध्ये काँग्रेसचे भगीरथ भालके आणि शरद पवार गटाचे अनिल सावंत, दिग्रसमध्ये काँग्रेसचे माणिकराव ठाकरे आणि उद्धव ठाकरे गटाचे पवन जयस्वाल हे उमेदवार आमने-सामने आहेत. तर मोर्शीत भाजपने उमेश यावलकर आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाने विद्यमान आमदार देवेंद्र भुयार यांना उमेदवारी दिली आहे. दिंडोरीत अजित पवार गटाचे नरहरी झिरवाळ उमेदवार असताना शिंदे गटाने येथे माजी आमदार धनराज महाले यांना तर देवळालीत अजित पवार गटाच्या सरोज अहिरे यांच्या विरोधात शिंदे गटाने राजश्री अहिरराव यांचा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे ४ नोव्हेंबरपर्यंत या जागांवर आघाडी आणि युतीला निर्णय घ्यावा लागणार आहे.

ठाकरे गटाचा घणाघात

सत्ताधाऱ्यांकडून पैशांचा खेळ

✔ मुंबई/प्रतिनिधी

सध्या महाराष्ट्र आणि झारखंड या दोन राज्यांत विधानसभा निवडणुकांची धामधूम सुरू आहे. या दोन्ही राज्यांत आतापर्यंत पोलीस आणि इतर यंत्रणांनी तब्बल ३४५ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे पुन्हा या ३४५ कोटींपैकी १७५ कोटींची मालमत्ता महाराष्ट्रातील आहे. हा आकडा धक्कादायक असला तरी महाराष्ट्रातील सत्तेसाठी केंद्र आणि राज्यातील सत्ताधाऱ्यांकडून जो पैशांचा खेळ सुरू आहे, तो पाहता आश्चर्यकारक म्हणता येणार नाही, अशी घणाघाती टीका ठाकरे गटाने केली आहे.

निवडणुका आणि त्यात होणारा पैशांचा वापर हा विषय आपल्या देशात तसा नवीन नाही. निवडणूक कुठलीही असो, त्यात पैशांचे, मौल्यवान आणि इतर चीज-वस्तूंचे वाटप हा विषय चव्हाट्यावर येतच असतो. आताही केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी जी माहिती दिली आहे, त्यामुळे या नेहमीच्या वादावर परत प्रकाश पडला आहे. मुख्य निवडणूक आयुक्तांनी सांगितल्यानुसार निवडणूक आचारसंहिता लागू होण्यापासून मतदानापर्यंतच्या काळात पोलीस आणि इतर यंत्रणांनी जप्त केलेल्या मालमत्तेत प्रचंड वाढ झाली आहे, याकडे ठाकरे गटाने लक्ष वेधले आहे.

गंभीर बाब ही आहे की, २०१९च्या निवडणुकीत हाच आकडा १२२ कोटी ६% लाख रुपये एवढा होता. यावेळी आताच तो ३४५ कोटींवर गेला आहे. त्यातच दोन्ही राज्यांमधील मतदानाला अद्याप २०-२१ दिवस बाकी आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष मतदानापर्यंत हा आकडा शेकड्यातून हजार कोटींपर्यंत पोहोचण्याची भीती आहे, अशी चिंता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने सामना दैनिकातील अग्रलेखात व्यक्त केली आहे.

आतापर्यंत जप्त केलेली १७५ कोटींची मालमत्ता त्याच महापुरात तरंगत आहे. झारखंडमध्येही हेमंत सोरेन सरकार घालविण्यासाठी दिल्लीश्वरांनी कसलीच कसर सोडलेली नाही. त्यामुळे या दोन्ही राज्यांतील निवडणूक काळातील जप्तीची रक्कम १२२ कोटींवरून थेट ३७५ कोटींपर्यंत गेली, त्यात आश्चर्य ते काय? असा बोचरा प्रश्न ठाकरे गटाने विचारला आहे.

घरी परत आल्यानंतर बदलले आमदारांचे सूर

श्रीनिवास वनगांनी मांडली भूमिका

✔ पालघर/प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकारण रंगले आहे. पहिल्यांदाच तीन पक्ष एकत्रित येऊन निवडणूक लढवत असल्यामुळे जागावाटपामध्ये अनेक नेते नाराज झाले आहेत. महायुतीमधील अनेक नेत्यांमध्ये नाराजी नाट्य सुरु आहे. पालघरचे विद्यमान शिंदे गटाचे आमदार श्रीनिवास वनगा हे मागील काही दिवसांपासून राजकीय वर्तुळामध्ये चर्चेत आले आहेत. महायुतीने तिकीट नाकारल्यानंतर श्रीनिवास वनगा यांच्याशी संपर्क तुटला होता. ते घरातून न सांगता गेल्यामुळे चर्चेत आले होते. निघून जाण्यापूर्वी त्यांनी एकनाथ शिंदे यांच्याविरोधात बरेच वक्तव्य केले होते. मात्र आता परत आल्यानंतर श्रीनिवास वनगा यांचा तक्रारीचा सूर मावळला आहे.

शिंदे गटाचे आमदार श्रीनिवास वनगा यांनी परत आल्यानंतर माध्यामांशी संवाद साधला. यावेळी वनगा म्हणाले की,, मी माझ्या नातेवाईकांच्या घरी गेलो होतो. पालघर किंवा डहाणू विधानसभेसाठी मला तिकीट नक्कीच मिळेल, अशी मला अपेक्षा होती. पण तिकीट न मिळाल्यामुळे मी नाराज होतो. पण मी ठाकरे गटाशी कुठलाही संपर्क साधलेला नाही. माझे तिकीट कापण्यासाठी काही जणांनी षडयंत्र रचले. त्यांच्यावर एकनाथ शिंदेंनी कारवाई करावी, अशी माझी अपेक्षा आहे. यापुढे शिंदे सांगतील ते काम मी करेन, असे मत श्रीनिवास वनगा यांनी व्यक्त केले.निघून जाण्यापूर्वी श्रीनिवास वनगा यांनी एकनाथ शिंदे यांच्याबाबत नाराजी व्यक्त केली होती. एकनाथ शिंदे यांनी माझा घात केला असे ते म्हणाले होते. आता परत आल्यानंतर या विधानाबाबत प्रश्न विचारला असता. ते म्हणाले, एकनाथ शिंदेंनी नाही तर त्यांच्या बरोबर असलेल्या लोकांनी माझा घात केला. एकनाथ शिंदेंची दिशाभूल करण्यात आली. मी यापुढेही प्रामाणिक राहून काम करत राहील. मी शिवसेनेशी एकनिष्ठ आहे, असे मत श्रीनिवास वनगा यांनी व्यक्त केले आहे.

शरद पवारांचा वळसे-पाटलांवर निशाणा

✔ पुणे/प्रतिनिधी

आपण याआधी अनेकदा सत्तेत होतो. त्यावेळी आंबेगावच्या सहकाऱ्याल सातत्याने संधी दिली. जनता दुसऱ्या पक्षात सामिल झाली नाही पण आपला प्रतिनिधी मात्र सहभागी झाला, या शब्दात नामोल्लेख न करता ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्यावर टीका केली.

शरद पवार म्हणाले, निवडणुकीसंबंधी लोकांच्यात उत्साह पाहायला मिळत आहे. आपण मविआच्या माध्यमातून निवडणुकीला सामोरे जात आहोत. आपल्यासमोर असलेल्या दुसऱ्या शक्तीला मोदींचा पाठींबा आहे. त्यांच्याकडे सत्ता आहे. सत्तेच्या जोरावर तुम्हा लोकांना वेगळ्या ठिकाणी नेऊ शकतो असा त्यांना विश्वास आहे. मागची परिस्थिती वेगळी होती. आपण एकत्र होतो. आपण एकत्रित सत्ता स्थापन केली. बारामती, आंबेगावला मंत्री पद दिले. इंदापूरला राज्यमंत्री पद दिले. जिल्ह्याला तीन मंत्री दिले. या आधी कधी जिल्ह्याला एवढी पदे मिळाली नव्हती. अपेक्षा होती की जिल्ह्याकडे लक्ष दिले जाईल. लोकांच्या प्रश्नांची सोडवणूक होईल.

गोट्या खेळून आमदार नाही झालो

✔ सांगली/प्रतिनिधी

शरद पवार यांनी शिवाजीराव देशमुख सभापती असताना त्यांच्या आजापणाच्या काळामध्ये अविश्वासाचा ठराव आणला होता. पवार साहेब तुमच्या या गद्दारीची परतफेड या शिराळा मतदारसंघातील जनता केल्याशिवाय राहणार नाही, असा हल्लाबोल रयत क्रांती संघटनेचे प्रमुख सदाभाऊ खोत यांनी शरद पवारांवर केला.

शरद पवारांनी शिवाजीराव देशमुख सभापती असताना त्यांच्या आजारपणात अविश्वासाचा ठराव आणला होता . पवारसाहेब ही तुमची गद्दारी आहे आणि त्या गद्दारीची परतफेड या शिराळा मतदार संघातील जनता केल्याशिवाय राहणार नाही असे सदाभाऊ खोत म्हणाले. सांगलीच्या शिराळा येथे महायुतीतील भाजपाचे उमेदवार सत्यजित देशमुख यांच्या प्रचारसभेत ते बोलत होते. त्यावेळी देशमुख साहेब म्हणत होते मी आजारी आहे. शेवटच्या पायरीवर उभा आहे. मी राजीनामा स्वतःहून देतो, माझा तुम्ही अपमान करु नका. मला काहीही नको आहे थोडं मला बरे होऊ द्या. मी चालत त्या सभागृहात येतो माझा सभापती पदाचा राजीनामा देत असे शिवाजीराव देशमुख म्हणत होते असं सदाभाऊ खोत यांनी सांगितलं.

इथं आपणच गुंड आहोत आणि कोणी जर आरोप करत असेल तर आपल्याकडे नऊ नंबरच्या नांगराचा फाळ आहे, तो जमिनीत एवढा घुसवू की फाटल्या शिवाय राहणार नाही,अशा शब्दात आमदार सदाभाऊ खोत यांनी शिराळा विधानसभा मतदारसंघातल्या महाविकास आघाडीच्या उमेदवारासह नेत्यांना इशारा दिला. गुंडागर्दी काही नाही, मी दोनदा आमदार गोट्या खेळून झालो नाही असे खोत म्हणाले. गृहमंत्री महायुतीचा असून गुंडा गर्दी झाली तर त्याची खैर नाही अशा शब्दात असे खोत म्हणाले.

राज्यात २०२४ च्या विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली आहे. या वर्षीच्या विधानसभा निवडणुकीत वेगळीच रंगत आली आहे, कारण या पाच वर्षात राज्यात वेगळीच राजकीय समीकरणे झाली आहेत. ज्या पक्षांनी २०१९ च्या निवडणुका एकमेकांच्याविरोधात लढल्या, तेच पक्ष आज सोबत आले आहेत. तर दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेत उभी फूट पडली आहे. यामुळे या दोन्ही पक्षातील दोन्ही गट एकमेकांविरुद्ध लढत आहेत. सांगली जिल्ह्यातील शिराळा विधानसभा मतदार संघातील लढतीमध्ये रंगत आली आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे मानसिंगराव नाईक आणि भाजपाचे सत्यजित देशमुख यांच्यात लढत असणार आहे.

प्रचाराला ग्लॅमरचं वलय अन् फुटणार लाखोंच्या सुपाऱ्या

✔ मुंबई/प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीसाठी अर्जांची छाननी झाली असून येत्या ४ नोव्हेंबरपर्यंत बंडखोरी केलेल्या आमदारांना त्यांचे अर्ज मागे घेण्याचे प्रयत्न होताना दिसणार आहे. मात्र तोपर्यंत निवडणूक प्रचाराच्या तोफा धडाडताना दिसणार आहेत. या प्रचारात आता मनोरंजन विश्वातील तारे-तारका लाखोंच्या सुपाऱ्या खिशात टाकून प्रचाराला ग्लॅमरचा तडका देताना दिसणार आहेत. मात्र लोकसभा निवडणुकीपेक्षा विधानसभेत सुपाऱ्यांचे भाव वधारल्याचे पाहायला मिळत आहे.

ज्येष्ठ मराठी अभिनेते संयाजी शिंदे यांनी काही दिवसांपूर्वीच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. यानंतर त्यांच्यावर राष्ट्रवादीचे स्टार प्रचारक म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. मात्र इतर पक्षांकडून अद्याप स्टार प्रचारक जाहीर करण्यात आलेला नाही. असे असले ज्या कलाकारांनी राजकीय पक्षांचे गंडे बांधले आहेत, ते त्यांच्याच पक्षाच्या प्रचारात दिसतील. मात्र इतर हिंदी आणि मराठी मनोरंजन विश्वातील तारे-तारका निवडणुकीच्या प्रचारासाठी लाखोंच्या सुपाऱ्या घेताना दिसतील. लोकसभा निवडणुकीवेळी हिंदीतील कलाकारांची सुपारी २० लाख रुपये होती, पण आता विधानसभा निवडणुकीत सुपारी २५ लाख रुपयांच्या पुढे गेली आहे. मात्र काही कलाकार असेही आहेत, राजकारणापासून दूर राहण्यासठी लाखोंच्या सुपाऱ्या नाकारतानाही दिसत आहेत.

निवडणूक प्रचाराच्या निमित्ताने इव्हेंट मॅनेजर्स आणि कलाकारांना सुपाऱ्या मिळवून देणाऱ्यांची चांदी होते. तर मध्यस्थांच्या मदतीने हा आकडा कमी-जास्तही केला जात आहे. मात्र अशावेळी कलाकारांना निश्चित केलेल्या मानधनापैकी ५० टक्के रक्कम मध्यस्थ्यांच्या खिशात जाण्याचे प्रकारही आता घडताना दिसतील. कायम डिमांडमध्ये असलेले काही मराठी कलाकार साडेसात लाख रुपयांच्या पुढे मानधनाची मागणी करत आहेत.

तर निवडणूक प्रचाराच्या पार्श्वभूमीवर नृत्यांगना गौतमी पाटीलचे प्रचारासह परफार्मन्सचे बजेटही आता अडीच ते तीन लाखांपर्यंत पोहोचल्याचे समजते. याशिवाय छोट्या पडद्यावरील कलाकार दीड-दोन लाख रुपयांची, तर काहीजण ५० हजारांचीही मागणी करताना दिसत आहेत. विशेष म्हणजे प्रचारासाठी कलाकारांची पळवापळवी केली जाण्याची भीती असल्याने सध्या कोणता कलाकार कुठे प्रचाराला जाणार याबाबतही पक्ष गुप्तता बाळगताना दिसत आहेत.

अस्सल सोलापुरी
सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड
। शुक्रवार, दि. १ नोव्हेंबर २०२४ ।

दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

आहेरवाडीत शॉक बसल्याने तरुण शेतकऱ्याचा मृत्यू

सोलापूर : शेतातील विद्युत मोटारीस असलेली केबल खराब झाल्याने ती बदलत असताना शॉक बसल्याने २३ वर्षीय तरुण मरण पावला. ही घटना आहेरवाडी (ता. दक्षिण सोलापूर) येथे बुधवारी सायंकाळच्या सुमारास घडली. पंचनात वीरपक्ष फुंडीपल्ले (वय २३ रा. आहेरवाडी, होटगी स्टेशन जवळ) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. काल बुधवारी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास स्वतःच्या शेतात बोअरवेल यास जोडलेली विद्युत मोटारीची खराब झालेली केबल बदलत होता. त्यावेळी अचानक हाताला शॉक बसल्याने तो बेशुद्ध पडला. त्याला शिवानंद पारे (मामा) यांनी उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

अक्कलकोट येथे बोलेरोच्या धडकेने पादचारी वृद्धाचा मृत्यू

सोलापूर : पायी रस्ता क्रॉस करीत असताना बोलेरो मोटारीच्या धडकेने ८७ वर्षीय वृद्ध गंभीर जखमी होऊन मरण पावले. हा अपघात अक्कलकोट येथील आश्रम शाळेजवळ (वसंतराव

नाईक नगर) बुधवारी दुपारच्या सुमारास घडला. नातू गंगाराम चव्हाण (वय ८७ रा.आश्रम शाळा, अक्कलकोट) असे मयत झालेल्या इसमाचे नाव आहे. बुधवारी दुपारी १२ वाजेच्या सुमारास ते वसंतराव नाईक नगर येथील आश्रम शाळेसमोरून शेताकडे जाण्यासाठी रस्ता ओलांडत होते. त्यावेळी बोलेरो मोटारीच्या धडकल्याने गंभीर जखमी झाले होते. त्यांना अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून सुनील राठोड (नातू) यांनी रात्री सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ते उपचारापूर्वी मयत झाले. या अपघाताची नोंद अक्कलकोट पोलीसात झाली आहे.

मंद्रूप अपघातामधील जखमीचा मृत्यू

सोलापूर : मंद्रूप येथील बसस्टॉप जवळ चारचाकी वाहनाच्या धडकेतील जखमी झालेले लव सुरेश सासवे (वय ३१ रा.आहेरवाडी ता. दक्षिण सोलापूर) हा दुचाकी चालक शासकीय रुग्णालयात उपचार घेताना गुरुवारी सकाळी मयत झाले. ते २८ सप्टेंबर रोजी दुपारच्या सुमारास मंद्रूप ते कंदलगावच्या दिशेने दुचाकीवरून निघाले होते. मंद्रूप बसस्टॅन्ड जवळ चारचाकी वाहनाच्या धडकेत ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना खाजगी रुग्णालयात उपचार करून डिस्चार्ज देण्यात आले होते. आज गुरुवारी सकाळी श्वास घेण्यास त्रास होत असल्याने त्यांना सिव्हील मध्ये दाखल केले असता ते उपचारपूर्वी मयत झाले. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

उळेगाव येथे गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न

सोलापूर : उळेगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथील इंदिरानगरात राहणाऱ्या वैशाली बाळू माने (वय ३२) या विवाहितेने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केली. ही घटना गुरुवारी सकाळच्या सुमारास घडली. तिला फासातून सोडवून पतीने शासकीय रुग्णालयात बेशुद्ध अवस्थेत दाखल केले. पतीबरोबर तक्रार झाल्याने रागाच्या भरात तिने दोरीने गळफास घेतली होती. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

सीना नदीत ४ ऊसतोड कामगार बुडाले

माढा तालुक्यातील खैराव येथील घडली घटना
सायंकाळपर्यंत शोधकार्य सुरु

माढा/प्रतिनिधी

माढा तालुक्यातील खैराव येथे सीना नदीपात्रात असणाऱ्या बंधाऱ्याजवळ यवतमाळ जिल्ह्यातील चार ऊसतोड कामगार गुरुवार दि. ३१ रोजी दुपारी बाराच्या सुमारास बुडाल्याची घटना घडली. माढा पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक नेताजी बंडगर आणि सर्व कर्मचारी तपास कार्य करीत असूनही चौघांचाही सायंकाळपर्यंत शोध लागला नव्हता. शंकर विनोद शिवणकर (वय २५), प्रकाश धाबेकर (वय २६), अजय महादेव मंगाम (वय २५), राजीव रामभाऊ गेडाम (वय २६) सर्व रा. लसणा टेकडी ता. जि. यवतमाळ अशी बुडालेल्यांची नावे आहेत.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, ऊसतोड कामगारांची टोळी खैराव ता. माढा येथील एका वस्तीवर उतरली होती. जवळच असणाऱ्या सीना नदीवर चौघे जण आंघोळीसाठी व कपडे धुण्यासाठी गेले होते. शंकर हा सर्वात अगोदर पाण्यात गेल्यावर बुडायला लागल्यावर प्रकाश त्यास वाचवण्यासाठी गेला असता तोही बुडू लागल्याने इतर दोघेही पाण्यात उतरले.

नदीतील पाण्याचा प्रवाह जास्त असल्याने चौघेही पाण्यात बुडाले. घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी पोलीस प्रशासना सह गावकरी व परिसरातील नागरिक यांनी जाऊन पाहणी केली असता अद्याप ही हाती काही लागले नाही. दरम्यान आपत्ती व्यवस्थापन विभागाची मदत मागवली असून बोटीच्या मदतीने शोध कार्य सुरू केल्यानंतर बुडालेले मजूर सापडण्याची शक्यता आहे.

आ.कल्याणशेट्टी यांचे आवाहन — विकासकामांसाठी पुन्हा एकदा निवडून द्या

द.सोलापूर/प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील धोत्री येथे सचिन कल्याणशेट्टी यांच्या प्रमुख उपस्थितीत कॉर्नर बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी मतदारसंघात झालेल्या विविध विकासकामांची माहिती कल्याणशेट्टी यांनी देत पुन्हा एकदा निवडून देण्याचे आवाहन त्यांनी केले.

भाजप-महायुती सरकारच्या कामांवर विश्वास ठेवून सरपंच संजय पाटील व रमजान मियावाले यांनी पक्षप्रवेश



द.सोलापूर : धोत्री येथे कॉर्नर बैठकीत बोलताना आ. कल्याणशेट्टी.

केला. या गावात सार्वजनिक वाचनालय बांधकाम, महादेव नगर येथे अंतर्गत सिमेंट रस्ता, दलित वस्ती येथे अंतर्गत सिमेंट रस्ता, भिमनगर येथे हायमास्ट दिवा बसविणे भीमनगर येथ सिमेंट रस्ता, अंगणवाडी बांधकाम क्र. ३, दर्गनहळळी ते धोत्री मध्ये रस्ता सुधारणा, दर्गनहळळी ते दोडडी मध्ये रस्ता सुधारणा, मुळेगाव-दर्गनहळळी-धोत्री रस्ता सुधारणा, दर्गनहळळी-धोत्री मध्ये रस्ता सुधारणा, दोडडी ते दर्गनहळळी मध्ये रस्ता सुधारणा, दोडडी ते दर्गनहळळी मध्ये सुधारणा इत्यादी विकासकामे केल्याचे आ. कल्याणशेट्टी यांनी सांगितले.

यावेळी भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार, दत्ता शिंदे, महेश बिराजदार, अण्णाराव बाराचरे, केदार विभुते, महादेव पाटील, दयानंद बिराजदार शिवानंद रामपुरे, कोतप्पा बिराजदार, प्रभाकर व्हटकर, लिंबण्णा व्हतमान, बतप्पा माळी, लक्ष्मण बिराजदार, धानप्पा दहिटणे, नेताजी खंडागळे, अनिल बर्वे, राहूल काळे, उमाकांत गावडे आदी उपस्थित होते.

बार्शीत ३१ उमेदवारांचे अर्ज पात्र; आ. राऊत, सोपलांचे अर्ज मंजूर

बार्शी : विधानसभा निवडणुकीसाठी बार्शीतून ३७ जणांचे अर्ज दाखल होते. यापैकी ६ उमेदवारांचे अर्ज अपूर्ण कागदपत्रांमुळे अवैध ठरवले. उर्वरित ३१ उमेदवारांचे अर्ज पात्र ठरले. छाननीवेळी कोणीही एकमेकांविरुध्द हरकत येतली नाही.

इस्माईल पठाण, शोएब साबीर सय्यद, गुरुदास कांबळे, धीरज साबळे, बाबासाहेब गायकवाड, रविशंकर गोदणे या सहा उमेदवारांचे अर्ज अवैध ठरले. अर्जा सोबत शपथपत्र, विहित कागदपत्रे नसल्याने अर्ज अवैध ठरले.

छाननी वेळी उमेदवार व उमेदवारांचे प्रतिनिधी उपस्थित होते. निवडणूक निर्णय अधिकारी प्रमोद गायकवाड यांनी प्रत्येक उमेदवाराचे नांव वाचून दाखवले.

यावेळी उपस्थित उमेदवार तसेच प्रतिनिधींनी छाननी वेळी कोणतीही हरकत येतली नाही. अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यानंतर सोमवारी दुपारी निवडणुकीचे चित्र स्पष्ट होईल.

'सिंघम अगेन अन् भूल भुलैया ३' आज प्रदर्शित होणार

सोलापूर : दिवाळीत बॉक्स ऑफिसवर मोठी टक्कर पाहायला मिळणार आहे. एका बाजूला अजय देवगण आणि रोहित शेट्टीचा 'सिंघम अगेन' रीलिज होतो आहे, तर दुसरीकडे कार्तिक आर्यनचा ' भूल भुलैया ३'देखील रीलिजसाठी सज्ज आहे. दोन्ही चित्रपट १ नोव्हेंबर रोजी सोलापूरसह सर्वत्र हे चित्रपट प्रदर्शित होत आहेत. या सिनेमांच्या निर्मात्यांना दिवाळी सणाचा फायदा करुन घ्यावचा असून, सुट्टीनिमित्त प्रेक्षकांची जास्त गर्दी होईल अशी अपेक्षा निर्मात्यांना आहे. त्यामुळे दोन्ही चित्रपटांच्या स्क्रीन्सबाबत निर्मात्यांमध्ये जोरदार वादही झाला होता. आता 'सिंघम अगेन' आणि 'भूल भुलैया ३'चे आगाऊ बुकिंग सुरू झाले आहे. दोन्ही चित्रपटांना प्रेक्षकांचा प्रतिसाद चांगला मिळाला आहे. हे दोन्ही चित्रपट शहरातील भागवत ॲडलॅब, ई-स्क्वेअर, आर. मिनीफ्लेक्स, लक्ष्मीनारायण, श्रीनिवास, उमा चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहेत. सकाळी ९ वाजल्यापासून शो सुरू होणार आहेत. 'सिंघम अगेन' मध्ये अजय देवगणसह करीना कपूर खान, दीपिका पादुकोण, रणवीर सिंह, टायगर श्रॉफ, जॅकी श्रॉफ, अर्जुन कपूर अशी स्टारकास्ट आहे.

शहराच्या विकासासाठी देवेंद्र कोठे यांना निवडून द्या

सोलापूर : महायुतीचे अधिकृत उमेदवार देवेंद्र कोठे यांनी गुरूवारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हा नियोजन समितीचे विशेष निमंत्रित सदस्य किसन जाधव यांची सदिच्छा भेट घेतली. याप्रसंगी इच्छा भगवंताची समूहाचे संस्थापक लक्ष्मण जाधव व नगरसेवक नागेश गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. शहराच्या विकासासाठी देवेंद्र कोठे यांना निवडून देण्याचे आवाहन यावेळी किसन जाधव यांनी केले.

सोलापूर : देवेंद्र कोठे यांचा सत्कार करताना लक्ष्मण जाधव, किसन जाधव, नगरसेवक नागेश गायकवाड व इतर.

किसन जाधव म्हणाले, स्वर्गीय विष्णुपंत कोठे यांचे सोलापुरच्या जडणघडणीत मोलाचे योगदान आहे. त्यांचीच कार्यपद्धती अवलंबणारे कोठे यांनी आपल्या नगरसेवक पदाच्या कार्यकाळात त्यांची कार्यक्षमता आणि तत्परता सिध्द केली आहे. त्यांच्यासारखा सक्षम उमेदवारच शहराचा सर्वांगीण विकास करू शकतो. त्यामुळे मतदारांनी त्यांच्या मागे उभे रहावे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व जाधव मित्रपरिवार यांच्यावतीने देवेंद्र कोठे यांचा नगरसेवक नागेश गायकवाड यांच्या हस्ते सन्मान करून शुभेच्छा देण्यात आला. याप्रसंगी अंबादास गायकवाड, राष्ट्रवादी युवक प्रदेश सरचिटणीस चेतन नागेश गायकवाड, राष्ट्रवादी शहर उपाध्यक्ष उमेश जाधव, अभिजीत कदम, किरण शिंदे, अमोल जगताप, सचिन राऊत, विक्रांत गजु शिंदे, माऊली जरग, हुलगप्पा शासम, माणिक कांबळे, महादेव राठोड, शितल शिरसागर, श्रीशैल चौगुले, पवन बेरे, ऋषब प्याटी व ईच्छा भगवंताची मित्रपरिवारचे सदस्य होते.

प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांचे आवाहन

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!
सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.
प्रधान कार्यालय, २०७/८/९, गोल्डफिंच पेठ, सोलापूर-७
सोलापूर जिल्ह्यात एकूण २०८ शाखा कार्यरत
www.solapurdccb.com

8911.77 कोटी एकूण व्यवसाय
4846.06 कोटी एकूण ठेवी
4065.71 कोटी कर्ज वाटप
ज्येष्ठ नागरिक व बँक, पतसंस्था, बाजार समित्या यांना ०.५०% ज्यादा व्याजदर

सांपत्तिक स्थिती (३१ मार्च २०२४)	
ठेवी	४८४६.०६ कोटी
कर्ज	४०६५.७१ कोटी
भागभांडवल	२२८.०७ कोटी
स्व निधी	१००६.३० कोटी

गुंतवणूक व बँक शिल्लक : ११०७.३६ कोटी व ३४६.६२ कोटी
एकूण व्यवसाय : ८९११.७७ कोटी

6000 कोटींच्या ठेवीकडे वाटचाल व सर्व प्रकारची कर्ज उपलब्ध

ठेवीवरील आकर्षक व्याजदर

अ.नं.	तपशील	व्याजदर
१	७ ते १४ दिवस	४.००%
२	१५ ते २९ दिवस	४.००%
३	३० दिवस ते ४५ दिवस	५.००%
४	४६ दिवस ते ९० दिवस	५.५०%
५	९१ दिवस ते १८० दिवस	६.००%
६	१८१ ते ३६४ दिवस	६.५०%
७	३६५ दिवस ते ४५५ दिवस	७.२५%
८	४५६ दिवस ते ७३० दिवस	८.००%
९	७३१ दिवस ते त्यापेक्षा जास्त दिवसासाठी	८.२५%

बँकेकडील सुविधा
१) आकर्षक व्याजदर
२) ठेवीवर ५ लाखापर्यंत विमा संरक्षण
३) सोनतारण कर्ज
४) वैयक्तिक कर्ज
५) लॉकर सुविधा
६) ATM / Micro ATM
७) Light Bill भरणा
८) सार्वजनिक वित्त व्यवस्थापन प्रणाली
९) प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना व प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना

बँकेचे ग्राहक, खातेदार, ठेवीदार व सहकारी संस्था सभासद व हितचिंतक यांना दीपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा!
आर. डी. गोटे- व्यवस्थापक | राजेंद्र शिंदे- सीईओ | कुंदन भोळे- प्रशासक

निवडणूक निरीक्षक जेयकर यांच्याकडून कामकाजाची पहाणी

पंढरपूर : विधानसभा निवडणूक २०२४ अंतर्गत भारत निवडणूक आयोगाने नियुक्त केलेले निवडणूक खर्च निरीक्षक के. पी. जेयकर यांनी पंढरपूर विधानसभा मतदार संघातील नियंत्रण व समन्वय कक्षास भेट देवून कामकाजाची पाहणी केली.

यावेळी पंढरपूर विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सचिन लंगुटे, मदन जाधव, चरण कोल्हे, आचारसंहिता कक्ष नोडल अधिकारी प्रशांत जाधव, सहा.नोडल अधिकारी सुनिल वाळूंजकर, संपर्क अधिकारी बाळासाहेब लांडगे उपस्थित होते. उपस्थित होते.

निवडणूक कामाकाजाबद्दल माहिती देताना जेयकर.

निवडणूक खर्च निरीक्षक जेयकर यांनी आचारसंहिता कक्ष, खर्च नियंत्रण कक्ष, एक खिडकी कक्ष, भरारी पथक, स्थिर सर्वेक्षण, व्हिडीओ पाहणी पथक या कक्षांस भेट देऊन कामकाजाचा आढावा घेवून सूचना केल्या. नियुक्त सर्व नोडल अधिकाऱ्यांना निवडणूक खर्च निरीक्षक जेयकर यांनी कामकाजाबाबत आवश्यक त्या सूचना व मार्गदर्शन केले.

पंढरपूर विधानसभा मतदारसंघामध्ये यापुढेही निवडणूक खर्च निरीक्षक यांचा पाहणी दौरा चालू राहणार असून, संपूर्ण विधानसभा निवडणूक कालावधीमध्ये निवडणूक खर्च विषयक बाबींवर नियंत्रण ठेऊन ते आयोगास वेळोवेळी अहवाल सादर करणार आहेत, अशी निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी दिली. त्याचबरोबर निवडणूक खर्च निरीक्षकांनी दिलेलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करावे असेही त्यांनी यावेळी सांगितले.

तिसरा डोळा
– प्रकाश पोरे

आता येतंच नसतो मी..!!!

आत्मविश्वासाचे संकेत

ब्रिटिशांनी भारत देश सोडताना सोन्याचा धूर नेला म्हणे, असे इतिहास सांगतो. स्वातंत्र्य मिळून ऐंशी वर्षे होत आली. आजही भारतीयांचे सोन्यावरील प्रेम बिलकूल कमी झालेले नाही. सूर्य उजाडल्यानंतर आज सोन्याचा भाव काय आहे हे पहिल्यांदा गृहिणींकडून पाहिले जाते.वेगवेगळ्या जाती, धर्म आणि संस्कृतींम ध्ये वेगवेगळे स्थान आहे. त्यामुळे भारतीयांची सोन्यामध्ये नुसती आर्थिक नव्हे, तर भावनिक गुंतवणूकही असते. आता रिझर्व्ह बँकेनेदेखील धनत्रयोदशीच्या दिवशी, म्हणजे सोने खरेदीसाठी शुभमुहूर्तावर लंडनमधील बँक ऑफ इंग्लंडच्या तिजोरीतून १०२ टन सोने मायदेशी आणल्याचे जाहीर केले. त्यामुळे रिझर्व्ह बँकेकडील सोन्याचा साठा वाढला आहे. पण हा निर्णय का घेतला गेला याविषयीची चर्चा देशात होऊ लागली आहे. कदाचित त्यावर राजकारणही व्हायला लागेल. एप्रिल ते सप्टेंबर या सहामाहीत रिझर्व्ह बँकेने तिच्या देशांतर्गत सोन्याच्या साठ्यात १०२ मेट्रिक टनांची भर घातली आहे. मध्यवर्ती बँकेच्या तिजोरीत असलेल्या सोन्याचे एकूण प्रमाण ३० सप्टेंबरपर्यंत ५१०.४६ मेट्रिक टनांवर पोहोचले आहे, जे ३१ मार्च २०२४ अखेर ४०८ मेट्रिक टनांपेक्षा अधिक होते. परकीय चलन साठा व्यवस्थापनासंबंधी अर्धवार्षिक अहवालानुसार, सहा महिन्यांच्या कालावधीत एकूण ८५४.७३ मेट्रिक टन सोन्याच्या साठ्यात आणखी ३२ मेट्रिक टनांची भर पडल्याचे मध्यवर्ती बँकेने म्हटले आहे. गेल्या काही वर्षांपासून भारत हळूहळू सोन्याचा साठा देशांतर्गत स्थानिक तिजोरीत हलवत आहे, जी आर्थिक राजधानी मुंबई आणि नागपुरात स्थित आहे. गेल्या वर्षी इंग्लंडमधून देशात १०० मेट्रिक टन सोने मायदेशी आणले गेले होते. बँक ऑफ इंग्लंड आणि बँक फॉर इंटरनॅशनल सेटलमेंट्स (बीआयएस) यांच्याकडे भारताने ३२४.०१ मेट्रिक टन सोने सुरक्षित ठेवले होते आणि २०.२६ मेट्रिक टन सोन्याच्या ठेवींच्या स्वरूपात ठेवण्यात आले होते, असे रिझर्व्ह बँकेच्या खुलाशात म्हटले आहे. एकूण परकीय चलनाच्या साठ्यातील सोन्याचा वाटा मार्च २०२४ च्या अखेरीस ८.१५ टक्क्यांवरून

सप्टेंबर २०२४ च्या अखेरीस सुमारे ९.३२ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. रिझर्व्ह बँकेच्या वार्षिक अहवालानुसार, यावर्षी मार्चअखेरीस ४१३.७८ मेट्रिक टन सोने परदेशात होते. वर्ष २००९ मध्ये भारताने आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून २०० टन सोने खरेदी केले होते. देशातच सोन्याची साठवणूक केल्याने बँक ऑफ इंग्लंडसारख्या परदेशी बँकेत सोने ठेवण्याच्या साठवणूक खर्चात मोठी बचत होणार आहे. याचबरोबर हे भारतीय अर्थव्यवस्थेबाबत आत्मविश्वासाचे संकेत आहेत. जागतिक पातळीवर सोन्याकडे एक सुरक्षित गुंतवणूक पर्याय म्हणून पाहिले जाते आणि ते देशांतर्गत ठेवणे हे भारतीय अर्थव्यवस्थेच्या स्थिरतेच्या विश्वासाचे संकेत देत आहे, असे जाणकार सांगतात. परदेशातील संभाव्य धोक्यांपासून देशाच्या सोन्याच्या साठ्याचे संरक्षण करण्यासाठी रिझर्व्ह बँक आणि भारत सरकारने सोने परत आणण्याचा निर्णय घेतला. सप्टेंबर २०२२ पासून, रिझर्व्ह बँकेने २०१४ टन सोने परत आणले आहे. वाढत्या भू-राजकीय अनिश्चिततेदरम्यान देशातच सोन्याची साठवणूक करणे देशाच्या आणि अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने हिताचे आहे, असे सरकारमधील अनेक अधिकारी मानतात. परकीय चलनाच्या तुटवड्यामुळे वर्ष १९९१ मध्ये अर्थव्यवस्था गंभीर संकटाचा सामना करत होती. इतर देशांकडून वस्तू व सेवांची आयात करण्यासाठी निधी उपलब्ध नसल्याने तत्कालीन केंद्र सरकारसमोर निधी उभारणीसाठी सोने गहाण ठेवण्याचा एकमेव पर्याय होता. परकीय देशाचे अजूनही ३२४ टन सोने बँक ऑफ इंग्लंड आणि बँक फॉर इंटरनॅशनल सेटलमेंट्सकडे (बीआयएस) आहे. दोन्ही इंग्लंडमध्ये असून रिझर्व्ह बँकेच्या सोन्याचा साठा राखण्याचे कार्य करतात. न्यूयॉर्क फेडरल रिझर्व्हनंतर जगातील सर्वाधिक सोने बँक ऑफ इंग्लंडकडे आहे. भारतासह अनेक देशांच्या मध्यवर्ती बँकांच्या सोन्याचा साठा संरक्षित करण्यात ती महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. बँक ऑफ इंग्लंड १९९७ पासून सोने सुरक्षित ठेवण्याचे कार्य करते. बँक ऑफ इंग्लंडच्या तिजोरीत सोन्याचे सुमारे ४,००,००० बार आहेत म्हणजेच जवळपास ५,३५० टन सोने आहे. बँक ऑफ इंग्लंडमध्ये सोने ठेवण्याचा एक महत्त्वाचा फायदा म्हणजे लंडन सराफा बाजारात प्रवेश सुलभ झाला आहे.

निवडणूक स्पेशल (भाग-१०)

अस्वस्थ करणाऱ्या आणि अस्वच्छ भाजी मंडईबाबत

श्रीनिवास वैद्य, सोलापूर

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणूक प्रक्रियेतील मध्यंतर चालू आहे. म्हणजे अर्ज मंजूर करण्यापासून अर्ज मागे घेण्यापर्यंतच्या तारखेचा कालावधी चालू आहे. त्यात काही सार्वजनिक बाबींवर भाष्य करणार आहे.

अन्न, पाणी, वस्त्र, निवारा या माणसाच्या मूलभूत गरजा. यातील पहिल्या अन्न या गरजेमध्ये, भाजी फळ फळावर खरेदी येते. भाजी खरेदी आणि फळांची खरेदी ही दैनंदिन बाब आहे असे म्हटले तर वावगे असायचे कारण नाही. लोकप्रतिनिधी निवडून दिले जातात ते व्यवस्था निर्माण करण्यासाठी, त्याच्या नियोजनासाठी आणि या व्यवस्थेच्या देखभालीसाठी. निवडून आल्यानंतर आपले लोकप्रतिनिधी नेमके यापैकी काय करतात यासंदर्भातील ज्याचा त्याचा अनुभव जास्त बोलका आहे. त्यावर दैनिक स्वगतकडून वेगळे भाष्य व्हावे, असे या क्षणी वाटत नाही. पण जनतेच्या व मतदाराच्या सर्वसामान्य अपेक्षा काय असतात या मात्र नमूद करणे आवश्यक आहे. मागण्यांची मोठी यादी नजरेसमोर ठेवण्यापेक्षा आजपासून पुढील तीन दिवस तीन विषयावरती भाष्य करण्याचा विचार केला आहे. त्यातील आजचा पहिला विषय म्हणजे भाजी मंडई.

आपण सोलापूरचा विचार केला तर इंग्रजांच्या अधिपत्याखाली सोलापुरात राणी लक्ष्मीबाई मंडई उभी राहिली होती. अत्यंत आदर्श, स्वच्छ आणि सुंदर अशी ती मंडई होती. व्यवस्था पहावी ती इंग्रजांनी असे बुजुर्ग मंडळी सांगत आली आहेत. आता अशा मंडळींची समाजातील संख्या अत्यल्प झाली आहे. सोलापुरात लक्ष्मी मंडई नंतर कस्तुरबा मंडई, सुपर मार्केट, चैतन्य मार्केट मंडई, भारतीय चौकातील भाजी मंडई, रेल्वेच्या डी आर एम ऑफिस जवळील मंडई या व अशा काही व्यवस्था निर्माण झाल्या आहेत. या साऱ्या व्यवस्था स्वातंत्र्यानंतरच्या आहेत. पण लक्ष्मी मंडईच्या निर्मितीतून जो एक आदर्श निर्माण केला गेला होता, तो पुन्हा नव्याने पाहायला मिळाला नाही.

सोलापुरात सध्या नाव येऊन सांगावे अशी कोणतीही मंडई अस्तित्वात नाही. जी लक्ष्मी मंडई होती तिचा पण फार विचका करून टाकलेला आहे. लक्ष्मी मंडई आणि परिसर याबाबत जेवढे लिहावे तेवढे कमीच. पूर्वी रमानाथ झा सोलापूर महानगरपालिका आयुक्त असताना तेथे वाहन तळाची व्यवस्था

करण्यात आली होती. त्या वाहनतळाची जागा कोण्या आजी-माजी नगरसेवकाने केंव्हा ताब्यात येऊन, वापरात आणली याबाबत कोणीही बोलायला तयार नाही. आजमितीस, पूर्वी लक्ष्मी मंडई येथे असणाऱ्या वाहनतळाची व्यवस्था आता अस्तित्वात नाही. साधारणतः २००० ते २००५ च्या आसपास श्रीनिवासन नावाचे सोलापूर महानगरपालिका आयुक्त होते. एकदा ते सहकुटुंब लक्ष्मी मंडईत भाजी खरेदीसाठी गेले होते असे सांगण्यात येते. तेंव्हा त्यांनी तेथील मारुती मंदिरापासून विजापूर वेशीपर्यंत भाजीवाल्यांनी जो रस्ता अडवून टाकला होता त्याचा अनुभव येतला होता. कार्यालयात परत आल्यानंतर कुटुंबासोबत भाजी मंडईत जाऊन आल्यानंतर वैतागलेल्या आयुक्तांनी संबंधितांवर कारवाई करण्याचे आदेश काढले. आदेशानुसार कारवाई झाली. पण त्यानंतर पहिले पाढे ५५. आजच्या तारखेला ही त्यात काही बदल झालेला नाही. वीस पंचवीस वर्षे होऊनही स्मार्ट सिटी योजनेच्या नावाखाली या मंडईची जी पुनर्निर्मिती करण्यात आली असे सांगितले जाते, ते लक्ष्मी मंडईच्या उज्वल इतिहासाला मातीमोल करणारे आहे.

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीच्या गदारोळात हा विषय काढायचे कारण म्हणजे सर्वसामान्य जनतेची होणारी अडचण मांडण्यासाठी. अर्थात भाजी मंडई हा प्रश्न फक्त सोलापुरात आहे असे म्हणावयाचे नाही. गावोगावची ही समस्या आहे. जशी ही समस्या महाराष्ट्रात आहे तशी महाराष्ट्र बाहेरही आहे. या समस्येवर उपाय शोधण्याची जबाबदारी खऱ्या अर्थाने लोकप्रतिनिधींची आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून सूचना मागवून, सर्वसामान्य जनतेच्या अडीअडचणी समजून घेऊन यावर धोरण ठरवण्याचे अधिकार लोकप्रतिनिधींचे आहे. गावोगावचे आणि राज्या-राज्यातील लोकप्रतिनिधी या विषयाकडे पहातही नाहीत आणि यावर विचारही करीत नाहीत. एकदा निवडून आले की ते आपल्या स्वप्नात गुंग असतात. ज्या राजकीय पक्षाच्या तिकिटावर आपण निवडून आलो, त्यांचे चाकर म्हणून काम करण्यात ते धन्यता मानतात. त्या राजकीय पक्षांच्या धोरणापुढे एक शब्दही बोलायचे धाडस ते करीत नाहीत. हे चुकीचे आहे. एखादी समस्या गावोगाव सारखीच असेल तर ती समस्या सामुदायिकपणे सोडवण्याची जबाबदारी लोकप्रतिनिधींची आहे. जेंव्हा सर्वच गावचे लोकप्रतिनिधी याकडे दुर्लक्ष करतात तेंव्हा सर्वसामान्य जनतेच्या आरोग्याची काळजी त्यांना करायची नसते असेच म्हणावे लागेल. यातील नियोजनात कोणताच राजकीय पक्ष पुढाकार घेत नाही. सगळे एका माळेचे मणी आहेत. ही समस्या आम्ही जशी महाराष्ट्रात अनुभवत आहोत, तशीच कर्नाटकात अनुभवली आहे. सोबतचे छायाचित्र हे गुलबर्ग्यातील रस्त्यावर असलेल्या भाजी मंडईचे आहे. सोलापुरातील छायाचित्र न देण्यामागे कारण आहे. ते म्हणजे सगळ्यांच्या डोळ्यापुढे ती दुर्व्यवस्था रोजच्या रोज पाहण्यात आहे.

मतदारांनी येणाऱ्या वीस दिवसात विचार करावा. मत कोणाला द्यायचे हा तुमचा अधिकार आहे. तुमच्या अधिकारात हस्तक्षेप करण्याचे स्वगतचे धोरण कधीच असणार नाही. पण कमीत कमी दैनंदिन गरजांचे व्यवस्थापन, स्थानिक स्वराज्य संस्थेकडून व्यवस्थित व्हावे, अशी अपेक्षा तुम्ही नक्की ठेवू शकता. ती निवडणुकीच्या निमित्ताने येणाऱ्या सर्व पक्षीय उमेदवारांना सांगू शकता. कोणी म्हणेल हा स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रश्न आहे. महाराष्ट्र विधानसभेचे निवडणुकीशी त्याचा काय संबंध. जर असा प्रश्न कोणी विचारला तर त्यांना सांगा की याविषयी धोरण ठरविण्याचे अधिकार महाराष्ट्र राज्याच्या विधिमंडळात बसणाऱ्या लोकप्रतिनिधींचे आहे. आज भावी लोकप्रतिनिधी आमच्या समोर येत आहेत म्हणून त्यांना हे सांगणे. आम्ही सांगितलेले ते ऐकतील याची आम्हाला खात्री नाही, तरीही हे सांगणे आहे. परत पुढे पाच वर्षे ते आमचे काही ऐकणार नाहीत. ऐकायचे तर सोडून द्या ते भेटायला येणार नाहीत, याची आम्हाला कल्पना आहे. नुसतीच कल्पना नाही खात्री पण आहे. म्हणून हे सांगणे.

रोजची भाजी खरेदी करण्याची आणि फळफळावळ मिळण्याची जागा स्वच्छ आणि आरोग्यदायी असली पाहिजे. येथे वाहनतळ आणि स्वच्छ असे सार्वजनिक शौचालय असले पाहिजे, याबाबत कोणाचे दुमत असावयाचे कारण नाही. आजमितीस दैनंदिन जीवनात अनुभवास येणाऱ्या अस्वस्थ करणाऱ्या आणि अस्वच्छ अशा भाजी मंडईतील अनुभवातून उतरलेला हा लेखन प्रपंच.

टुडेज् ब्लॉग

काँग्रेसची फरफट नि पक्षात असंतोष

लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातून काँग्रेसचे तेरा खासदार निवडून आल्यावर पक्षात मोठा उत्साह निर्माण झाला. विधानसभा निवडणुकीसाठी जागा मिळवताना महाआघाडीत चांगली सौदेबाजी करता येईल, अशा भ्रमात काँग्रेसचे नेते वावरत होते. देशभरातून काँग्रेसचे शंभर खासदार निवडून आले पण महाराष्ट्रात महाआघाडीत एकेक जागा मिळवताना पक्षाच्या नेत्यांना नाकीनऊ आले. त्यातही आपल्या सग्यासोयऱ्यांना उमेदवारी देण्यातच नेते आग्रही राहिल्याने पक्षात असंतोष खदखदत आहे. ज्या उबाठा सेनेने काँग्रेसच्या विरोधात वर्षानुवर्षे निवडणूक लढवली, त्या पक्षाला बरोबर घेऊन निवडणूक लढविण्याची पाळी काँग्रेसवर आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे सर्वोच्च नेते शरद पवार हे अत्यंत संयमाने व कौशल्याने महाआघाडीची एकजूट कायम राहावी म्हणून प्रयत्न करीत असले तरी गेल्या महिनाभरात उबाठा सेनेचे पक्षप्रमुख, प्रवक्ते व काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष यांच्यात 'तू तू मै मै' असे संघर्षाचे प्रसंग अनेकदा निर्माण झाले. मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा व खासदार वर्षा गायकवाड यांनीही आपल्या पक्षाला मुंबईतून जास्तीत जास्त जागा मिळाव्यात यासाठी आग्रही भूमिका घेतल्याचे दिसले नाही. उबाठा सेनेने परस्पर त्यांचे उमेदवार जाहीर केल्यानंतरही नाना पटोले व वर्षा गायकवाड यांनी मिळमिळीत भूमिका घेतली. वर्षा गायकवाड यांनी त्यांची भगिनी डॉ. ज्योती यांनाच धारावीतून उमेदवारी मिळवून दिल्याने पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये खदखद वाढली आहे.

विधानसभा निवडणुकीतील तिकीट वाटपानंतर काँग्रेस पक्षात नाराजी व अस्वस्थता वाढली आहे. काँग्रेसचा जनाधार असलेल्या जागा उबाठा सेनेने घेतल्यामुळे काँग्रेसमध्ये संताप आहे. मुंबईत काँग्रेसचा पारंपरिक मतदार मोठा आहे. सर्व जाती धर्मात व परप्रांतीय लोकांमध्ये काँग्रेसला जनाधार आहे. तरीही मुंबईतील ३६ मतदारसंघांतील केवळ ९ ते १० जागा काँग्रेसच्या वाट्याला येतात हाच काँग्रेसचा पराभव आहे. जागा वाटपाची चर्चा करताना पक्षाच्या दुबळ्या नेतृत्वाचा लाभ उबाठा सेनेने उठवला व काँग्रेसच्या पदरात मोजक्या जागांचे तुकडे टाकले. विधानसभा निवडणुकीला काँग्रेसला

मुंबईत एक तृतियांश म्हणजे किमान १८ मतदारसंघ मिळायला हवे होते. पण उबाठा सेनेच्या सौदेबाजीपुढे काँग्रेस नेत्यांनी माना तुकावल्या, असे चित्र दिसले. दक्षिण सोलापूरच्या जागेवरून उबाठा सेनेने काँग्रेसला निर्वाणीचा इशारा दिला, तेव्हा नाना पटोले यांनी उबाठाने आता जागा वाटपाचा विषय संपवावा असा सल्ला दिला. आपल्याला आपापसात नव्हे तर महायुतीच्या विरोधात लढायचे आहे. त्यामुळे उबाठा सेनेने महायुतीच्या विरोधात भूमिका मांडत राहावी असेही सांगितले. उबाठा सेनेने परस्पर उमेदवार जाहीर केल्याने काँग्रेसमध्ये संताप व्यक्त झाला आहे. जिथे उबाठा सेनेचे उमेदवार जाहीर झाले आहेत, तेथे काँग्रेसने उमेदवार देण्याची गरज नाही असे उबाठा सेनेने म्हटले आहे. जागा वाटपाची बोलणी चालू असताना लोकसभा निवडणुकीत उबाठा सेनेने सांगली मतदारसंघात असाच परस्पर उमेदवार जाहीर केला होता, पण मतदारांनी उबाठा सेनेला चांगलाच धडा शिकवला व अपक्ष उमेदवार म्हणून लढलेले काँग्रेसचे नेते व दिवंगत मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांचे नातू विशाल पाटील हे दणदणीत मतांनी विजयी झाले होते.

यंदाच्या २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत महाआघाडीतून काँग्रेसने १७ जागा लढवल्या व १३ जिंकल्या, उबाठा सेनेने २१ जागा लढल्या व ९ जिंकल्या आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटाने १० जागा लढवल्या व ८ जिंकल्या. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचा स्ट्राईक रेट ७०.५८ टक्के, उबाठा सेनेचा ४२.८५ टक्के, तर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) चा ८० टक्के होता. सांगलीचे अपक्ष खासदार विशाल पाटील यांनी नंतर काँग्रेसला पाठिंबा दिल्याने काँग्रेसच्या खासदारांची संख्या १४ झाली. एकूण मतांमध्येही काँग्रेसची मते उबाठा सेनेपेक्षा जास्त होती. तरीही विधानसभा निवडणुकीत जागा वाटपात काँग्रेसची फरफट झाली व पक्षात खदखद निर्माण झाली.

दिवंगत केंद्रीय मंत्री गुरुदास कामत यांनी त्यांच्या काळात मुंबईत उभारलेली काँग्रेसची भक्कम पक्ष संघटना व प्रत्येक वॉर्डमध्ये निर्माण केलेले कार्यकर्त्यांचे जाळे गेले कुठे? असा प्रश्न पक्षातू विचारला जातो आहे.

- डॉ. सुकृत खांडेकर.

प्लास्टिकबंद डब्यातील आभासी दिवाळी!

दिवाळी बदलली आहेच, माणसांच्या भेटीगाठी कमी झाल्यात. आपापल्या जगण्यात गुंतलेल्या माणसांना आता आभासी दिवाळी खुणावू लागली आहे. सगळं जगणंच आभासी झालंय, त्याला हा प्रकाशाचा सण तरी कसा अपवाद रहाणार? मोबाईलवरच भेटणारे, बोलणारे मित्र, स्मार्टफोनवर शुभेच्छा एका बोटानं पुढे ढकलून केवळ दखल घेण्याचा हा काळ आहे. या बदलत्या काळात कालचा सामान्य माणूस आज जरी राजा' झालेला असला तरी त्याची हक्काची दिवाळी दूर गेली आहे. प्लास्टिकबंद रेडीमेड फराळाच्या चवीने घराघरातल्या जिन्नसांचा घमघमाटही प्लास्टिकबंद केला आहे. आजच्या इतकी प्रदूषणाची चिंता तीन ते चार दशकातल्या दिवाळीला नव्हती, कारण आता आर्थिक संपन्नतेमुळे फटाळे वाजवून त्याचा आनंद घेण्यापेक्षा लोकांचा कल फटाके जाळण्याकडे वळलेला आहे.

मुंबई-ठाण्यातल्या वाडीवस्त्या बदलून उंच टॉवर उभारल्यावर दोन इमारतींमध्ये दोरखंडाने बांधलेले मोठाले कंदील लावण्याची सोय राहिली नाही. घरातल्या घरात जिलेटीन पेपर किंवा पतंगाचा कागद वापरून बांबू तासून बनवला जाणारा कंदील आता इतिहासजमा झाला आहे. घरातल्या घरात कंदील साकारणं आता मागासलेपणाचं लक्षण मानलं जातं.

'दिन दिवाळी गाई म्हशी ओवाळी' मुंबई-ठाण्यासारख्या शहरातल्या गल्लीबोळात चाळींच्या लांबच लांब गॅलऱ्यांमध्ये लहान मुलांकडून फुलबाजा गोल गोल फिरवत दिवाळीचं असं स्वागत ऐंशी ते नव्वदच्या दशकात केलं जाऊन गावाकडल्या दिवाळीची निदान आठवण काढली जात होती. आता आलेले फॅन्सी फटाके जमिनीवर फुटतच नाहीत, जे काय होतं ते अवकाशात, उंचच उंच, रंगीत प्रकाश सोडणाऱ्या ठिणग्यांचा पाऊस अवकाशात पडतो आणि विरूनही जातो. दिवाळी पुरती बदललीय, दिवेलागणीच्या वेळी तेलामातीच्या दिव्यांच्या जागेवर इलेक्ट्रिक दिव्यांच्या माळा आल्या आहेत. आता लाईटच्या एका बटणात सगळेच दिवे एकसाथ पेटवले जातात, दिव्यांचं ताट घेऊन एकेक दिवा हळूवार पायरी, ओसरीत ठेवण्याचा वेळ वाचवला गेला आहे.

मुंबईतल्या झोपडपट्ट्यांमध्ये हिरो-हिरोईनची चित्रं असलेले कंदील आता दिसेनासे झालेत. फॅन्सी पुनर्वापर होणाऱ्या कंदिलांच्या झगमगाटात कामगार वस्त्यांच्या चाळीतल्या एकाच रंगातल्या कंदिलांची रांग आता दिसत नाहीत. बऱ्याचदा भगव्या रंगाच्या कंदिलात एका बाजूला शिवसेनाप्रमुख बाळासाहेबांचे चित्र आणि दुसऱ्या बाजूला शिवसेनेचा वाघ असलेली दिवाळी आता मुंबईत पाहण्यात येत नाही. या कंदिलांची रांग चाळीतल्या घरांमध्ये राहणाऱ्या कुटुंबातील फरक मिटवणारी होती, सगळे एकाच प्रकाश रंगात रंगलेली चाळ विलोभनीय वाटे. आता दिवाळी आभाळाला टेकली आहे. दिवाळी जमिनीवर साजरी करणं सार्वजनिक मागासलेपणाचं लक्षण मानलं जातं.

किरकोळ बाजारातून आणलेल्या लवंगीची माळ सोडवून त्यातला एकेक वेगवेगळा फटाका फोडण्यातला उद्देश सात्विक होता. फटाक्याच्या प्रत्येक क्षणाचा आनंद घेण्याचा आध्यात्मिक विचार त्यामागे असावा, फटाके संपूच नयेत, यासाठी

होणारी ही तडजोड त्या काळातल्या जगण्याचा भाग होती. किरकोळ क्षणातून पुरेपूर आनंद देणारी नॉस्टेल्जिक दिवाळी अशी होती. राजाला दिवाळी माहीत नसते, त्याच्या दरबारी रोजच्या रोजच दिवे लागतात, पंचपक्वान शिजवली जातात. गोडधोड मिष्टान्नाचं अप्रूप राजाला नसतं. जागतिकीकरणानंतर मुंबईतील राहती घरं, गावाकडच्या शेतजमिनी नाईलाजाने विकल्यावर खिशात पैसा खुळखुळू लागल्यावर सगळेच राजे झाले तर नवल नाही.

मुंबई-ठाण्याच्या जुन्या रेशन दुकानांवर सगळ्याच रेशनकार्डधारकांची तीन दशकांपूर्वी रांग होती. पांढरे, पिवळे, केशरी रेशनकार्ड असा त्यात फरक नव्हता. रेशन दुकानाचं शटर उघडून रेशनिंग क्लार्ककडे दिवाळीआधीच चौकशी होत असे. पामतेल, डालडा वनस्पतीच्या पिवळ्या डब्यात चाळीच्या ओसरीत दिवाळीनंतर तुळस लावली जाई. रेशन दुकानावर मिळणारे रॉकेलही पाण्यासारखे पारदर्शकच होते, आजच्यासारखा निळा आणि बिनरंगी असा त्यात फरक नव्हता. दिवाळीआधीच रेशनवर खडूनं पाटी लिहिली जाई, ज्यावर वरच्या कोपऱ्यात कंदील आणि पणत्यांची चित्रे काढून डाळी, पिठीसाखर, तेल, तांदूळ, ज्वारी, गहू, रवा, बेसनपीठ असे जिन्नस कोणत्या तारखेला मिळतील याची वर्दी दिली जाई.

दिवाळीचा फराळ आज सातासमुद्रापार विमानाने पोहचला आहे. आजची दिवाळी 'राजा'सह 'राणी'लाही किती बजेटमध्ये बसवायची हे माहीत आहे. फराळओके, चकली या वेबसाईटवरून मागवू, त्या तिथं नको, मागल्या वेळेस मागवली होती तर भलतीच कडक निघाली. चिवडा, शंकरपाळे, लाडू, करंज्यांसाठी वेगवेगळ्या फराळ विक्री करणाऱ्या ऑनलाईन स्पेशल ऑफर दिवाळीच्या काळात दिल्या जातात. घराला रंग मारायला आता दिवाळीची वाट पाहिली जात नाही, तसेच नवे कपडे घ्यायलाही दिवाळीची गरज नसते. ऑनलाईन सगळंच मागवलं जातं. दिवाळीच्या शुभेच्छाकार्डांची दुकानं नावाला उरली असताना व्हॉट्सॲप, फेसबुकवर दिवाळीच्या एकदाच सगळ्यांना सदिच्छा देण्याची सोय झाली आहे. दिवाळीचे रिल्स, दिवाळीच्या मोबाईल बंदिस्त सदिच्छांमुळे मित्र आप्तेष्टांना प्रत्यक्ष भेटून दिवाळीच्या दिल्या जाणाऱ्या सदिच्छांचं अप्रूप उरलं नाही.

आभासी जगानं आनंदाची कारणेही बदलली आहेत. येत्या काळात कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात आर्टिफिशल इंटेलिजन्सकडूनच 'आम्ही आमची दिवाळी कशी साजरी करावी' यावर सल्ले येतले जातील. पर्यावरणपूरक आवाज, प्रदूषणविरहित दिवाळी गरजेची आहेच, मात्र हे करत असताना दिवाळी हा प्रकाश आणि आनंदाचा गोडवा वाटण्याचा सण आहे हे विस्मृतीत जायला नको.

एका दिव्यातून लाखो दिवे पेटवता येतात, असाच दिवाळीच्या एका आनंदातून अनेकांचा आनंद साकारता येऊ शकतो. हा सण प्रकाशाचा आहे. बाहेरचा प्रकाश उजळवताना मनातला अंधारही दूर व्हायला हवा, त्यासाठी दिवाळी शक्य तेवढी थेट आणि मित्रमंडळींसह प्रत्यक्षच साजरी व्हायला हवी, हा प्रकाशोत्सव प्रत्यक्ष अनुभवता यायला हवा. स्वभाव आणि फराळातल्या गोडव्याला प्रेम, आपुलकी, आनंदाला पर्याय नसतो, म्हणूनच आभासी जगात तो सापडत नाही, तिथं तो शोधायलाही नको, हे समजणं म्हणजेच अंतर्मनातला दिवा प्रज्वलित करणं असावं.

- संजय सोनवणी.

जनमानस

मुंबईमधील दिवाळीची एक आठवण

दिवाळीला सणांचा राजा संबोधले जाते. पाच दिवसांच्या दिवाळी सणाचे महत्त्व फार मोठे व लक्षवेधक आहे. वसूबारस, धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मी पूजन, बलिप्रतिपदा अशा वैविध्यपूर्ण मुहूर्तावर आनंदाने व दणक्यात साजरा केला जाणारा पाच दिवसांचा हा दिवाळीचा सण असतो.खाण्यापिण्याची रेलचेल, फराळाचा आग्रह, दिव्यांची रोषणाई, आकाशीदिवे आणि फटाक्यांच्या आतषबाजीने 'दिवाळी सण मोठा नाही आनंदाला तोटा' अशा थाटात साजरा होणारा दिवाळी सण हा सर्वांच्या आवडीचा सण आहे. दरवर्षी न चुकता गावाकडे जाऊन आनंदाने दिवाळी साजरा करणारे लोक दिवाळी सणाच्या निमित्ताने गावाकडे येतात, सर्वांच्या गाठीभेटी होतात. गोड, तिखट, चमचमीत, खमंग पदार्थांवर ताव मारला जातो. भाऊबिजेने दिवाळी सणाचा समारोप होतो.

त्यावर्षी दिवाळी सणाला मला गावाकडे जाता आले नव्हते. कारण माझे वडील बंधू नवनाथ गुळवे यांना कंपनीने सुट्टी दिली नव्हती. त्यामुळे आम्ही मुंबईतच राहिलो होतो. अंधेरी पूर्व या उपनगरात आम्ही राहत होतो. बघता बघता दिवाळी सणाला आरंभ झाला. सगळ्या घरासमोर सुरेख रांगोळी, दारावर फुलांच्या माळा, रंगीबेरंगी आकाश कंदील, तेजोमय प्रकाशाने सारी दुनिया प्रकाशमान करणारे दिवे पाहून मन प्रसन्न होत होते आणि आकाशातील फटाक्यांची आकर्षक अशी आतषबाजी बघून डोळ्यांचे पारणे फिटत होते.

दिवाळी सणाचा दररोजचा हा विलक्षण आणि लखलखीत नजारा डोळ्यांत साठवून ठेवण्यासारखा होता.शांततेत साजरा होणारा दिवाळी सण खरंच आठवणीत ठेवावा असा होता.आवाजी फटाके व ध्वनिप्रदूषण करणारे फटाके कोणीच फोडत नव्हते. विविध जातींचे व धर्मांचे लोक मिळून मिसळून दिवाळी सण साजरा करत होते. मी आणि माझे बंधू आमच्या रुममध्ये मात्र गप्प गार बसत होतो. सकाळ, संध्याकाळी वरणभात बनवायचे आणि जेवायचे असा आमचा नित्यक्रम चालू होता. बलिप्रतिपदेच्या दिवशी मात्र मुंबईमधील दिवाळीचे आणखी एक वैशिष्ट्य पाहायला मिळाले.तेथील लोक घरी बनवलेला दिवाळीचा फराळ शेजारच्या प्रत्येक घरी ताट भरून देऊ लागले. प्रत्येकांनी तोच प्रकार केला. म्हणजे फराळांची देवाणघेवाण झाली. जातिधर्म विसरून सगळ्यांनी बंधुता व माणुसकी पेरली होती. त्या दिवाळी सणामध्ये सर्व धर्म समभाव हे मूल्य मी पाहिले होते. दिवाळीचे हे दृश्य मला खूप खूप आवडले आणि बघता बघता अनेक घरातून दिवाळी सणाच्या फराळाचे ताट आम्हाला दिले गेले. कोणतीही खरेदी न करता आमचीही दिवाळी साजरी झाली.

मी व माझे बंधू दोघेही आनंदी झालो.दिवाळीला गावाकडे जाऊ शकलो नाही याचे दुःख आम्ही विसरून गेलो. मला मुंबईमधील ती आगळीवेगळी दिवाळी आजही जशीच्या तशी आठवली की मन भरून येते!

- बबन गुळवे, जि. लातूर.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाच वेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR/२००२/०९७०७. Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

यांत्रिकीकरणामुळे केरसुणीचा पारंपारिक व्यवसाय अडचणीत

सोलापूर : देशाला स्वातंत्र्य मिळण्या अगोदरपासून ते भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ही केरसुणीला देशांच्या ग्रामीण भागात लक्ष्मीचे स्थान प्राप्त झाले आहे. खेड्यापाड्यात प्रत्येकांच्या घरात तिला लक्ष्मी असे म्हटले जाते. विषेश म्हणजे केरसुणीला लक्ष्मी पूजनावेळी फारच महत्त्व असते. लक्ष्मी पूजनच्या वेळेस जास्त विक्री होती. परंतू आधुनिक यांत्रिकीकरणाच्या जगात केरसुनी रूपी लक्ष्मी लोप पावत चालली आहे.

आजच्या यांत्रिकीकरणांमध्ये केरसुणीला अनेक पर्यायी साधने उपलब्ध झाल्यामुळे केरसुणी आता शेवटचा घटका मोजत आहे. परंतु आजही ग्रामीण भागामध्ये केरसुणीचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. केरसुणी तयार करण्यासाठी आवश्यक असणारा कच्चामाल अर्थात शेंदुळीची झाडे नष्ट झाली आहे. त्यामुळे केरसुणी करण्यासाठी आवश्यक असणारा कच्चामाल आता ग्रामीण भागातही उपलब्ध होत नसल्याने केरसुणीचा पारंपरिक व्यवसाय हा डबघाईस आला आहे.

सोलापूर : दिवाळीनिमित्त केरसुणी तयार करताना पवार कुटुंबिय.

झाडूंचे अनेक पर्याय उपलब्ध; मागणी कमी

“सिंधीच्या पानोव्यापासून झाडू बनवले जातात; पण झाडू बनवण्यासाठी जी सिधीची झाडे लागतात, ती खूप कमी झाली आहेत. त्या तुलनेत झाडू बनविण्यासाठी खर्च अधिक वाढला आहे. परंतु पूर्वी सारखी केरसुनीला मागणीही नाही राहिली. फक्त लक्ष्मी पूजन या वेळेस जास्त विक्री होते.

सनातन पवार – कारागीर, समाचार चौक सोलापूर

प्लास्टिक झाडू उपलब्ध

यापूर्वी ग्रामीण भागातील कारागीर मोठ्या प्रमाणात झाडू, केरसुणी तयार करायचे. तसेच त्याची गावोगावी फिरून विक्री करत होते. पूर्वी मातीचे घर असल्यामुळे घर झाडूने फरफर झाडले जायचे; पण आता सगळीकडे सिमेंटची घरे झाली.त्यामुळे पूर्वीच्या झाडूने ते सिमेंटचे घर नीट झाडता येत नसल्यामुळे आणि बाजारात विविध प्रकारचे प्लास्टिक झाडू उपलब्ध असल्याने जुन्या झाडूकडे बहुतांश गृहिणींनी पाठ फिरवल्याचं दिसून येते

संक्षिप्त वृत्त

मतदान अन् मोजणीच्या दिवशी मद्यविक्री बंद

सोलापूर : सोलापूर जिल्ह्यात ११ विधानसभा मतदारसंघ आहेत. सदर विधानसभा मतदार संघांमध्ये दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान व दि. २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पडणार असल्याने, या कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्याच्या दृष्टीने मतदानाची वेळ संपण्यापूर्वी ४८ तास अगोदरपासून तसेच मतमोजणीच्या दिवशी जिल्हयातील सर्व देशी, विदेशी मद्य विक्री, परमिट रूम व ताडी माडीची दुकाने बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी निर्गमित केले आहेत. जिल्ह्यात दि. १८ नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजलेपासून पुढे (मतदान संपण्याच्या ४८ तास आगोदर), दि.१९ नोव्हेंबर २०२४ रोजी मतदानाच्या पूर्वीचा संपूर्ण दिवस, दि. २० नोव्हेंबर रोजी मतदानाचा संपुर्ण दिवस व दि. २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणीचा संपूर्ण दिवस मद्यविक्री बंद ठेवण्यात यावीत. सोलापूर जिल्ह्यातील सर्व मद्य विक्री अनुज्ञप्तीधारकांनी निवडणूक क्षेत्रातील अबकारी अनुज्ञप्त्या मद्य विक्रीकरीता पूर्णपणे बंद ठेवाव्यात. सदर आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित अनुज्ञप्तीधारकाविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ व त्याअंतर्गत असलेल्या नियमातील तरतूदीनुसार तसेच लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ मधील तरतूदीनुसार कडक कारवाई करण्यात येईल व संबंधित अनुज्ञप्ती कायमस्वरुपी रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहेत.

सेना दलात अधिकारी पदाचे मोफत पूर्व प्रशिक्षण

सोलापूर : भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना सर्व्हिस सिलेक्शन बोर्ड या परीक्षेची पूर्व तयारी करून घेण्यासाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे मोफत प्रशिक्षण वर्ग घेण्यात येणार आहे. यासाठी प्रवेश घेण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण आधिकारी सोलापूर यांनी केले आहे. शासनातर्फे महाराष्ट्रातील नवयुवक व नवयुवतींसाठी दिनांक २ डिसेंबर २०२४ ते ११ डिसेंबर २०२४ या कालावधित कोर्स क्र.५९ आयोजित करण्यात आला आहे. या कालावधीत प्रशिक्षणार्थींना निःशुल्क प्रशिक्षण , निवास व भोजन दिले जाणार आहे. सोलापूर जिल्हयातील इच्छूक उमेदवारांनी सैन्य दलातील अधिकारी पदांची संधी उपभोगण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय , सोलापूर येथे दि. २६ नोव्हेंबर २०२४ रोजी मुलाखतीस हजर रहावे. अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी दुरध्वनी क्र.०२५३-२४५१०३२ किंवा व्हाटसअप क्र. ९१५६०%३३०६ वर कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा दूरध्वनीवर संपर्क करावा असे आवाहनही जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी , सोलापूर यांनी केले आहे.

‘महायुध्दातील लाभार्थ्यांनी हयातीचे दाखले जमा करावेत’

सोलापूर : जिल्ह्यातील दुसऱ्या महायूध्द लाभार्थ्यांनी शसानाच्या प्रचिलीत नियमानुसार माहे नोव्हेंबर २०२४ अखेर पर्यंत आपले हयातीचे दाखले जमा करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील दुसरे महायुध्द लाभार्थ्यांनी आपले हयातीचे दाखले व एक पासपोर्ट साईज फोटो या कार्याल्यामध्ये प्रत्यक्ष अथवा पोस्टाने दि. ३० नोव्हेंबर २०२४ पर्यंत जमा करावे . ज्या लाभार्थींचे हयातीचे दाखले दिलेल्या मुदतीत कार्यालयास प्राप्त होणार नाहित त्यांचे अनुदान माहे डिसेंबर २०२४ पासुन बंद करण्यात येईल व हयातीचे दाखले प्राप्त झालेनंतर फरकासह अनुदान देण्यात येईल. जिल्ह्यातील दुसरे महायूध्द लाभार्थ्यांनी लवकरात लवकर आपले हयातीचे दाखले जमा करावेत. तसेच ज्या लाभार्थ्यांचा मृत्यू झाला आहे. अशा लाभार्थ्यांच्या मृत्यूचा दाखला अर्जासहित त्यांच्याअवलंबितांनी जमा करावा असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी केले आहे.

लिपिक टंकलेखक पदासाठी अर्ज करण्याचे आवाहन

सोलापूर : जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात १ लिपिक टंकलेखकाचे अशासकीय पद भरावयाचे असून सोलापूर जिल्हयातील माजी सैनिक यांनी आपले अर्ज सैनिक सेवेची व इतर शैक्षणिक कागदपत्रासह दिनांक १३ नोव्हेंबर २०२४ रोजी प्रत्यक्ष या कार्यालयात सादर करावेत असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी केले आहे. या पदाकरिता त्याच दिवशी मुलाखती घेण्यात येणार असून, उमेदवारांनी स्वतःची मुळ कागदपत्रे सोबत आणावीत. सदर पदाकरीता उमेदवारास मराठी व इंग्रजी टंकलेखन व संगणक हाताळणीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. या पदाकरीता मासिक एकत्रित मानधन रूपये २४८७५/- देय राहील. सदर पद हे फक्त माजी सैनिक संवर्गातून भरण्यात येणार आहे. तसेच सदर पदाकरीता सैन्यातील लिपिक संवर्गातील माजी सैनिकास प्राधान्य देण्यात येईल. तरी सदर संधीचा सोलापूर जिल्हयातील माजी सैनिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी केले आहे.

महिलेच्या पर्समधील ४० हजारांचे दागिने पळवले

बार्शी : बसमध्ये प्रवेश करताना गर्दीचा फायदा घेऊन चोरट्याने एका महिलेच्या पर्समधून रोख रकमेसह ४० हजार ७०० रुपयाचे दागिने पळविले. ही चोरी बुधवारी दुपारच्या सुमारास घडली. यासंदर्भात संजीवनी पंडित वायमारे (रा. कवठाळी ता.उत्तर सोलापूर) यांनी बार्शी शहर पोलिसात फिर्याद दाखल केली. त्या काल दुपारी २ वाजेच्या सुमारात बार्शी बस स्थानकात येऊन बसमधे प्रवेश करीत होत्या . त्यावेळी गर्दीचा फायदा घेऊन चोरट्याने त्यांच्या हातातील पर्समधील १२ ग्राम सोन्याचे मंगळसूत्र आणि ७०० रुपये रोग असा ऐवज पळवला. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास हवालदार घाडगे करीत आहेत.

लक्ष्मीपूजनासाठी विविध फळांची आवक वाढली

डाळिंब, सिताफळ, पेरू, सफरचंदाची मोठी विक्री

सोलापूर/प्रतिनिधी

दिपावली सणातील लक्ष्मीपूजनाला फळाची मोठी आवक झाल्याने भाव कमी झाला आहे. फूल उत्पादन करणारे शेतकरी, व्यापाऱ्यांना आर्थिक फटका बसला आहे असून दसऱ्याच्या मुहूर्तावर जो भाव मिळाला त्याच दराने विक्री न झाल्याने आथिर्क फटका बसला असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.

सोलापूर कृषी उत्पन्न व शहरातील बाजार पेठेमध्ये मोठ्या प्रमाणात फळांची आवक झाली आहे.ऐन दिवाळीच्या मुहूर्तावर फळांची आवक झाली आल्याने दर गड गडाला आहे. पूजेसाठी लागणारे पाच फळ प्रत्येकी ५ रुपये एक नगावार विक्री केली गेली आहे. पाच फळांच्या किमती २५ रूपये आहेत. त्यामुळे फळ उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला आहे. हिवाळ्यात फळांची मागणी जास्त असते. त्याप्रमाणे शहरात सध्या फळांचा सुकाळ आहे. बाजारात

विविध प्रकारची फळे उपलब्ध आहेत. मंत्री, मोसंबी, सीताफळ, सफरचंद, पेरू, केजी, ड्रगनफ्रूट, चिक्कू, किवी, आवळा अशी विविध फळे मोठ्या प्रमाणात विक्रीस उपलब्ध झाली आहेत. बाजारात फळांची मोठी आवक होत असल्याने दर देखोल कमी झाली आहेत.सोलापूर शहर परिसरात विविध भागात फळे ,फुले विक्री होत आहे, ती खरेदी करताना ग्राहक पूजेसाठी लागणारे आणि नेहमी खाण्यासाठी फळे चौकशी करून घेताना दिसत आहे.

केळी–५० रुपये डझन, सफरचंद–६० रुपये किलो,पेरू–२० ते ४० रुपये किलो,मोसंबी–१० रुपये नग, चिक्कू–६० रुपये किलो,सीताफळ –५ रुपये नग.

मारोळी येथे पत्नीस कोयत्याने मारहाण : पतीवर गुन्हा

मंगळवेढा : माहेरी राहण्यास आलेल्या पत्नीस कोयत्याने मारहाण करून जखमी करण्यात आले . ही घटना मारोळी (ता. मंगळवेढा) येथे बुधवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणी मंगळवेढाच्या पोलिसांनी जखमीचा पती विकास दत्ता ठोंबरे (वय ३०) याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. या संदर्भात रंजना विकास ठोंबरे (वय २१ रा.मारोळी) हिने पोलिसात फिर्याद दाखल केली. ती आपल्या मुलासोबत मारोळी येथे माहेरी राहण्यात आली होती . बुधवारी दुपारच्या सुमारास तिचा पती विकास ठोंबरे हा मद्य प्राशन करून घरी आला. तू माझ्यासोबत घरी का येत नाही? मुलांना का पाठवत नाही ? म्हणून शिवीगाळ केली. मी तुमच्यासोबत येणार नाही असे म्हणाली असता त्याने कोयत्याने हातावर मारून पत्नीला जखमी केले. आणि सासू नंदा हाके यांना ४ दिवसात ठार मारण्याची धमकी दिली. तपास हवालदार बनकर करीत आहेत.

पद्मा नगरातून दुचाकी लंपास

पद्मा नगर येथे पार्क करून ठेवलेली एमएच.१३.बीवाय.७४१३ ही दुचाकी चोरट्याने चोरून नेली. या प्रकरणी भुवनेंद्र नारायण नुत्ती (वय-३९,रा.लक्ष्मी नगर,एमआयडीसी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल पाटील हे करीत आहेत.

सोलापूर : गीत गुंजन मैफिलीत सहभागी झालेल्या महापालिका आयुक्त उगले व इतर.

गीत गुंजन मैफिलीत महापालिका अधिकारी, कर्मचारी मंत्रमुग्ध

सोलापूर : दीपावली निमित्त सोलापूर महानगपालिकेच्या वतीने महापालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी हुतात्मा स्मृती मंदिर येथे आज गीत गुंजन या कार्यक्रमचे आयोजन करण्यात आले होते. महापालिका अधिकारी, कर्मचारी मंत्रमुग्ध झाले. दीपावली निमित्त प्रथमच अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महापालिकेचे आयुक्त शीतल तेली - उगले यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली.त्यानंतर आयुक्त यांच्या हस्ते स्टार्स ऑफ मेलडी ग्रुप धनंजय प्रस्तुत डॉ. जब्बार, गायक शशी बासुतकर,पूनम लाडे, महेबुब मुर्षद,निवेदक विठ्ठल गायकवाड यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, उपायुक्त तैमूर मुलाणी, मुख्य लेखा परीक्षक रुपाली कोळी, नगर रचना संचालक मनिष भिष्णूरकर, कर संकलन प्रमुख युवराज गाडेकर तसेच सर्व विभागीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

परंड्यात ४२ उमेदवार वैध

परंडा : परंडा विधानसभा मतदार संघात ४९ उमेदवरांनी ७० नामनिर्देशनपत्र दाखल करण्यात आले होते. त्यापैकी ५७ उमेदवारी अर्ज वैध ठरले आहेत. तर १३ नामनिर्देशनपत्र अवैध ठरले आहेत. यातील ४२ उमेदवार हे वैधरित्या नामनिर्देशित झाले आहेत तर ७ उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र फेटाळण्यात आले आहेत. आज ३० ऑक्टोबर रोजी दाखल केलेल्या नामनिर्देशन पत्राची छाननी दुपारी पार पडली.

छाननी प्रक्रियेनंतर ४ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारांना नामनिर्देशनपत्र मागे घेता येणार आहेत.२० ऑक्टोबर रोजी जिल्ह्यातील १ हजार ५२३ मतदान केंद्रावर प्रत्यक्ष मतदान होणार आहे.

धाराशिवचा दुहेरी मुकुटासह दिवाळी धमाका

कुमारगटात पहिले तर मुलींच्या गटात आठवे विजेतेपद

धाराशिव : यजमान धाराशिवने सुवर्ण महोत्सवी (५०वी) कुमार व मुली (ज्युनिअर) राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो खो स्पर्धेत कुमार व मुली या दोन्ही गटातून विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला. सर्वोत्कृष्ट अष्टपैलू खेळाडूसाठी असलेले सावित्री पुरस्कार तन्वी भोसले हिने व विवेकानंद पुरस्कार सोत्या वळवी या धाराशिवच्याच खेळाडूंनी पटकाविले. मुलींच्या गटात सोलापूर, ठाणे तर मुलांच्या गटात सोलापूर व पुण्याने अनुक्रमे तृतीय व चतुर्थ स्थान संपादिले.

धाराशिवने कुमारगटात पहिलेच विजेतेपद पटकावले असून मुलींच्या गटात विजेतेपदाच्या चौकारासह (२०२१-२२ पासून सलग चौथे विजेतेपद) तर एकूण आठवे विजेतेपद मिळवत सुवर्णमहोत्सवी वर्षात दुहेरी विजेतेपदासह दिवाळी धमाका साजरा केला. यापूर्वी २०१५-१६ साली जळगाव येथे झालेल्या ४३ व्या स्पर्धेत ठाण्याने दुहेरी मुकुट मिळवला होता त्यानंतर तब्बल सहा अजिंक्यपद स्पर्धांनंतर धाराशिवला हा इतिहास घडवता आला. यजमान म्हणून सुध्दा दुहेरी मुकुट मिळवणारा धाराशिव हा पहिला संघ ठरला व प्रेक्षकांनी दिवाळीत विजयोत्सव साजरा करताना आकाश आतीशबाजीच्या विविध रंगांनी भरून टाकले.

धाराशिव : खो खो स्पर्धेतील विजेता ठरलेला धाराशिव मुलींचा संघ.

सर्वोत्कृष्ट खेळाडू

अष्टपैलू: सोत्या वळवी, तन्वी भोसले (धाराशिव). संरक्षक : विलास वळवी (धाराशीव), सानिका चाफे (सांगली). आक्रमक : अश्विनी शिंदे (धाराशिव),प्रज्वल बनसोडे (सांगली).

परिते येते घरात घुसून मारहाण पाच महिलांसह ६ जणांवर गुन्हा

टेंभुर्णी : आदल्या दिवशी झालेल्या भांडणाच्या कारणावरून घरात घुसून केलेल्या मारहाणीत दोन महिला जखमी झाल्या. ही घटना परिते (ता .माढा) येथे बुधवारी दुपारच्या सुमारास घडली. याप्रकरणी टेंभुर्णीच्या पोलिसांनी ५ महिलासह ६ जणावर गुन्हा दाखल केला आहे.

कविता कैलास व्यवहारे (वय ४०) आणि त्यांची जाऊ कमल व्यवहारे (रा.परिते) अशी जखमी झालेल्या महिलांची नावे आहेत. यासंदर्भात कविता व्यवहारे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वैशाली धनाजी शिंदे (रा.रोपळे), अर्चना गोरख ढेरे (रा.कव्हे), सारिका सुरेश मिस्किन (रा. बेंबळे),रेणुका विशाल इंदलकर (रा. चव्हाणवाडी), सुरेखा ज्ञानदेव व्यवहारे (रा.परिते) आणि विशाल उर्फ अण्णा इंदलकर (रा.चव्हाणवाडी) अशा ६ जणाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. मंगळवारी दुपारी झालेल्या भांडणाचा राग धरून बुधवारी दुपारी १२ वाजे सुमारास वरील आरोपी कविता याच्या घरात घुसून तू आमच्या आईबरोबर भांडण का केली ? असे म्हणत याचा लाथाबुक्याने मारहाण केली. त्यानंतर घराबाहेर आणून पुन्हा मारहाण केली. यावेळी त्यांची जाऊ कमल या भांडण सोडवण्यात आले असतात त्यांना देखील सर्वांनी मिळून मारहाण केली. अशी नोंद पोलिसात झाली पुढील तपास सहाय्य फौजदार हजारे करीत आहेत.

कचऱ्याचे ढीग आढळल्यास आरोग्य निरीक्षकांना होणार ५ हजाराचा दंड

● संबंधित मक्तेदारावरही कारवाई होणार ● महापालिकेचे उपायुक्त तैमूर मुलाणी यांची माहिती

सोलापूर : शहरातील कचऱ्याच्या समस्येवर महापालिका प्रशासनाकडून दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. ज्या भागात कचऱ्याची समस्या असल्याच्या तक्रारी येतील आणि ज्या ठिकाणी कचऱ्याचे ढीग आढळून येतील अशा ठिकाणच्या आरोग्यनिरीक्षकास आणि मक्तेदारास ५ हजार रुपये दंड आणि असे प्रकार सतत होत असल्यास आरोग्य निरीक्षकावर निलंबनाची कारवाई करण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिकेचे उपायुक्त तैमूर मुलाणी यांनी दिली.

सोलापूर शहरात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग आढळून येत असल्याने आता महापालिका प्रशासनाने या विषयावर कडक धोरण आखले आहे. आता ज्या ठिकाणी कचऱ्याचे ढीग किंवा कचऱ्याची समस्या निर्माण होत असेल अशा ठिकाणच्या आरोग्य निरीक्षकांना आणि घनकचरा व्यवस्थापनातील कचरा संकलनातील मक्तेदाराला ५ हजार रुपये दंड करण्यात येणार आहे. याची अंमलबजावणीही सुरू करण्यात आली असल्याची आहे, असे महापालिकेचे उपायुक्त तैमूर मुलाणी यांनी सांगितले. सोलापूर शहरातील विविध रस्त्यांवर आणि अनेक भागांमध्ये मोठ्या प्रमाणात कचरा आढळून येत आहे. कचरा संकलनासाठी घंटागाडी दररोज पोहोचत नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. याकडे आरोग्य निरीक्षकांनी बारकाईने लक्ष देऊन प्रत्येक भागात दररोज घंटागाडी पोहोचते की नाही याचा अहवाल नियमित आरोग्य निरीक्षकांनी द्यायचा आहे. यामध्ये कुचराई होत असल्याचे निदर्शनास आले आहे. यातूनच शहरातील अनेक ठिकाणी नागरिक कचरा आणून टाकत आहेत.परिणामी त्या परिसरात कचऱ्याचे ढीग दिसून येतो. यामुळे महापालिका प्रशासनाने दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. ज्या भागात कचऱ्याची समस्या असल्याच्या तक्रारी येतील आणि ज्या ठिकाणी कचऱ्याचे ढीग आढळून येतील अशा ठिकाणच्या आरोग्यनिरीक्षकास आणि मक्तेदारास ५ हजार रुपये दंड आणि असे प्रकार सतत होत असल्यास आरोग्य निरीक्षकावर निलंबनाची कारवाई करण्यात येणार आहे. या संदर्भातील स्पष्ट सूचना संबंधित विभाग आणि आरोग्य निरीक्षकांना देण्यात आल्या आहेत.

संबंधित विभाग आणि मक्तेदारांची बैठक

शहरातील स्थिती सुधारण्यासाठी त्यांना पंधरा दिवसांची मुदत देण्यात आली आहे. यानंतर अशीच परिस्थिती राहिल्यास थेट दंडात्मक आणि कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर संबंधित विभाग आणि मक्तेदारांची बैठक घेतली. या बैठकीत त्यांना विविध सूचना देऊन कारवाईचा इशारा देण्यात आल्याचे मुलाणी यांनी सांगितले.

श्रीमंत लोक 'हा' देश सोडून का जात आहेत?

संपत्तीत होवू लागलीय घट

✔ **नवी दिल्ली :** आर्थिक मंदी, उद्योग क्षेत्रातील आव्हाने आणि नियामक दबावांमुळे चीनमधील अब्जाधीशांना चांगलाच फटका बसला असल्याचे चित्र आहे. अलीकडील अहवालांनुसार, चीनमधील अतिश्रीमंतांची संख्या आणि संपत्ती कमी होत आहे. या वर्षी, 'हुरुन चायना रिच लिस्ट'मध्ये यूएस डॉलरमध्ये ७४३ अब्जाधीशांची गणना करण्यात आली आहे. हाच आकडा २०२१ मध्ये १,१८५ इतका होता. त्यात आता ३६ टक्क्यांनी घट झाली असल्याचे पाहायला मिळाले आहे. पाच अब्ज युआन (अंदाजे ७०० दशलक्ष डॉलर्स) पेक्षा जास्त संपत्ती असलेल्या व्यक्तींची संख्याही मागील वर्षाच्या तुलनेत १२ टक्क्यांनी घसरून १,१०० च्या खाली आली आहे, जे चीनमधील बिघडलेल्या आर्थिक परिस्थितीचे चिन्ह आहे.

एकूण चीनमधील सर्वात श्रीमंत लोकांच्या संपत्तीमध्ये सामूहिक १० टक्क्यांनी घट झाली आहे, संपत्तीत घट होण्याचे हे सलग तिसरे वर्ष आहे. 'हुरुन रिसर्च इन्स्टिट्यूट'चे संस्थापक आणि मुख्य संशोधक रुपर्ट हूगेवर्फ यांनी नमूद केले, ''हुरुन चायना रिच लिस्टमधील व्यक्तींची घट चीनची आर्थिक परिस्थिती दर्शवतात. नेमकी ही घट होण्याची कारणं काय? श्रीमंत लोक देश सोडून का जात आहेत? त्याविषयी जाणून घेऊ.

या वर्षी चीनच्या श्रीमंतांच्या यादीत कोण अव्वल स्थानी?

'बाइट डान्स'चे संस्थापक झांग यिमिंग हे ४९.३ अब्ज डॉलर्सच्या संपत्तीसह पहिल्या स्थानावर आहेत, जे मागील वर्षी चौथ्या स्थानावर होते. 'बाइट डान्स'ची यूएस मालमत्तेवर सुरू असलेली कायदेशीर लढाई असूनही, कंपनीचा जागतिक महसूल गेल्या वर्षी ३० टक्क्यांनी वाढून ११० अब्ज डॉलर्स झाला आहे. याचे कारण म्हणजे, अमेरिकेतील सुमारे २०० दशलक्ष वापरकर्त्यांमध्ये वाढलेली 'टिकटॉक'ची लोकप्रियता. त्यांचे दुसरे प्लॅटफॉर्म आहे 'डोईन'. हेदेखील चिनी वापरकर्त्यांमध्ये लोकप्रिय आहे. चीनची सर्वात मोठी पाण्याची बाटली तयार करणारी कंपनी नॉन्गफू स्प्रिंगचे संस्थापक झोंग शानशान दुसऱ्या क्रमांकावर घसरले, कारण त्यांची संपत्ती २४ टक्क्यांनी घसरून ४७.९ अब्ज डॉलरवर आली. या यादीत तिसऱ्या क्रमांकावर हुआटेंग शेन्झेन टेक जायंट टेन्सेंटचे संस्थापक पोनी मा हुआटेंग आहेत. शीतपेय क्षेत्रातील दिग्गज वहाहाच्या केली झोंग फुली या चीनमधील सर्वात श्रीमंत महिला व्यावसायिक आहेत. परंतु, चीनमध्ये महिला अब्जाधीशांची संख्या केवळ २३.५ टक्के आहे.

चीनमधील श्रीमंतांची यादी का कमी होत आहे?

चीनची अर्थव्यवस्था दीर्घकाळापर्यंत गृहनिर्माण संकट, उच्च बेरोजगारीचा दर, वाढते स्थानिक सरकारी कर्ज आणि अपेक्षेपेक्षा कमी झालेली ग्राहक मागणी या समस्यांचा सामना करत आहे. या घटकांचा देशातील अब्जाधीशांवर जास्त परिणाम होत आहे. या वर्षी विकासाला चालना देण्यासाठी सरकारने १.४ ट्रिलियन डॉलर्सपेक्षा जास्त नवीन कर्ज उपक्रम सुरू करण्याच्या योजना आखल्या आहेत. हेन्ली अँड पार्टनर्सच्या अंदाजानुसार २०२४ मध्ये अंदाजे चीनमधील १५, या अतिश्रीमंतांनी स्थलांतर केले आहे. राजकीय तणाव, विशेषत: शी जिनपिंगच्या धोरणामुळे श्रीमंत नागरिकांना त्यांची मालमत्ता परदेशात हलवण्याचे मार्ग शोधण्यास प्रवृत्त केले आहे.

चीनमधील कोणत्या उद्योगांमध्ये घसरण होत आहे?

चीनच्या श्रीमंतांमध्ये तंत्रज्ञान आणि ग्राहकोपयोगी वस्तू ही प्रमुख क्षेत्रे आहेत आणि रिअल इस्टेटसारख्या जुन्या उद्योगांचे लक्षणीय नुकसान झाले आहे. सौर पॅनेल निर्माते आणि लिथियम बॅटरी उत्पादकांना तीव्र स्पर्धेचा सामना करावा लागला आहे; ज्यामुळे त्यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे.

ईव्ही आणि बॅटरी निर्मात्यांकडील मागणीही कमी झाली आहे. ''सोलर पॅनेल, लिथियम बॅटरी आणि ईव्ही निर्मात्यांना हे आव्हानात्मक गेले आहे; कारण स्पर्धा तीव्र झाली आहे,'' असे रुपर्ट हूगेवर्फ यांनी स्पष्ट केले. ही आव्हाने असूनही तैवानच्या अब्जाधीशांची संख्या १५ ने वाढून एकूण ९७ वर पोहोचली, याचे श्रेय त्यांच्या मजबूत सेमीकंडक्टर उद्योगाला जाते. याउलट हाँगकाँगची अब्जाधीशांची संख्या चारने कमी झाली आहे. या यादीतील केवळ ३० चिनी अब्जाधीश परदेशात राहतात; प्रामुख्याने अमेरिका आणि सिंगापूरमध्ये.

सहमतीने घटस्फोटाकरता प्रत्याक्ष हजेरी आवश्यक नाही

✔ **चेन्नई :** ज्या जोडप्यांना सहमतीने घटस्फोट हवा आहे अशा जोडप्यांचा विवाह कायद्याने संपुष्टात आणून त्यांची लवकरात लवकर सुटका करणे अपेक्षित आहे. अर्थात असे असले तरी त्यातही अनेकानेक अडचणी येतात, अशा प्रकरणातल्या जोडीदारांची न्यायालयातील भौतिक अर्थात प्रत्याक्ष उपस्थिती ही अशीच एक महत्वाची अडचण. याबाबतच्या एका सुनावणीत मद्रास उच्च न्यायालयाने वरील निकाल दिला. वैवाहिक वाद आणि त्याचे निराकारण करण्याचे दोन मुख्य प्रकार आहेत. पहिल्या प्रकारात वैवाहिक वाद एकतर्फी असतो त्यातील एका जोडीदाराला घटस्फोट हवा असतो, तर दुसऱ्याला नको असतो. अशा प्रकरणांत संपूर्ण प्रकरणाची सुनावणी आणि त्याकामी होणारा विलंब टाळता येत नाही. दुसऱ्या प्रकारच्या वैवाहिक वादात उभयता जोडीदारांना घटस्फोट हवा असल्याने त्यांना सहमतीने घटस्फोट घेता येतो. अशा प्रकरणांत वादाचे मुद्दे नसल्याने अशा प्रकरणांचा निकाल देणे तुलनेने सोपे असते. साहजिकच ज्या जोडप्यांना सहमतीने घटस्फोट हवा आहे अशा जोडप्यांचा विवाह कायद्याने संपुष्टात आणून त्यांची लवकरात लवकर सुटका करणे अपेक्षित आहे. अर्थात असे असले तरी त्यातही अनेकानेक अडचणी येतात, अशा प्रकरणातल्या जोडीदारांची न्यायालयातील भौतिक अर्थात प्रत्याक्ष उपस्थिती ही अशीच एक महत्त्वाची अडचण. याच अडचणीशी संबंधित काही प्रकरणे मद्रास उच्च न्यायालयात पोहोचली होती.या प्रकरणांतील जोडीदारांना सहमतीने घटस्फोट हवा होता, मात्र जोडीदार बाहेरगावी, बाहेरदेशी असल्याने त्यांना न्यायालयात प्रत्यक्ष हजेरी लावणे शक्य नव्हते, आणि म्हणून त्यांनी ऑनलाईन हजेरीच्या मान्यतेकरता अर्ज केला. त्यांच्या सदरहू अर्जाच्या कारवाईस यश न आल्याने मद्रास उच्च न्यायालयात दाद मागण्यात आली.

मद्रास उच्च न्यायालयाने- १. मद्रास उच्च न्यायालय व्हिडीयो कॉन्फरन्सिंग रुल्सप्रमाणे भारतीय दुतावासा मार्फत ऑनलाईन हजेरीचा आग्रह धरण्यात आला, मात्र दोन्ही देशांतील वेळांच्या फरकामुळे हे जवळपास अशक्य होते, २. प्रत्याक्ष हजेरीकरता भारतात उपस्थित राहण्यात याचिकाकर्त्यांना व्हिसा नियम आणि रजा या दोन समस्या आहेत. ३. या प्रकरणांमध्ये तांत्रिक आणि प्रक्रियात्मक अडचणी हाच महत्त्वाचा मुद्दा आहे. ४. तांत्रिक मुद्दे आणि प्रक्रिया यांमुळे कायद्याचा उद्देश विफल न होणे हे देखिल महत्त्वाचे आहे, ५. ऑनलाईन सुनावणी प्रक्रिया जगातल्या कोणत्याही कोपऱ्यातून दाद मागायची सोय पक्षकारांकरता देत असल्याने ही प्रक्रिया अत्यंत सोयीची आहे. ६. सहमतीने घटस्फोट प्रकरणात अशी सहमती दबावाखाली किंवा धाकदपटशाने घेतलेली नसल्याची खात्री करण्यापुरती न्यायालयाची भूमिका मर्यादित आहे आणि हे काम ऑनलाईन करणे शक्य आहे, अशी महत्वाची निरीक्षणे नोंदविली आणि सहमतीने घटस्फोटाच्या प्रकरणांबाबत पुढील महत्वाचे निर्देश दिले.

१. सहमतीने घटस्फोट याचिका दाखल करताना आणि पुढील सुनावणीकरता कौटुंबिक न्यायालयांनी पक्षकारांच्या भौतिक हजेरीचा आग्रह धरू नये. **२.** अशा याचिका व्यक्तिश: किंवा रीतसर कुलमुखत्यापत्राद्वारे नेमलेल्या कुलमुखत्यार व्यक्तीद्वारे दाखल केल्या जाऊ शकतात. **३.** अशा प्रकरणांत याचिकाकर्त्यांद्वारे त्यांचा कुलमुखत्यार / प्रतिनिधी प्रकरण चालवू शकतो, मात्र असा कुलमुखत्यार / प्रतिनिधी कायदेशीर सल्लागार, वकील नसावा. **४.** अशा प्रकरणांत याचिकाकर्त्यांद्वारे त्यांचा कुलमुखत्यार याचिका, कागदपत्रे, पुरावा इत्यादी सादर करू शकतो. **५.** अशा प्रकरणांत याचिकाकर्ते ऑनलाईन हजर राहू शकतात, त्यांच्या ऑनलाईन हजेरीचे ठिकाण आणि त्यांची ओळख पटविण्याकरता संबंधित कागदपत्रे दाखल करावी. **६.** न्यायालये याचिकाकर्ते, कागदपत्रे, सत्याप्रतिज्ञापत्रे इत्यादींची खात्री ऑनलाईन करू शकतात आणि त्यायोगे योग्य ते आदेश करू शकतात.

हा निकाल मद्रास उच्च न्यायालयाचा असल्याने सध्या तरी तामिळनाडू राज्यापुरता मर्यादित आहे. बदलत्या काळातील बदलती परीस्थिती लक्षात घेऊन याचिकाकर्त्यांची भौतिक हजेरी आणि तांत्रिक समस्येतून सुटका करणारा म्हणून हा निकाल निश्चित कौतुकास्पद आहे.

मुदतीपूर्वीच कारखाने सुरू केल्यास कारवाई

साखर आयुक्तांनी दिला इशारा

✔ **पुणे :** राज्यातील साखर कारखाने १५ नोव्हेंबरला सुरु करण्याचा निर्णय मंत्री समितीने घेतला. त्याची अंमलबजावणी करत साखर आयुक्तांनी वेळेच्या आधी साखर कारखाने सुरू केले तर गुन्हे दाखल करण्याचा सज्जड दम राज्यातील साखर कारखान्यांना दिला आहे.

ऊस उत्पादक शेतकरी मात्र ऊस तुटून जाण्याच्या प्रतीक्षेत आहेत, तर हातावर पोट असणारा ऊस तोडणी कामगार कारखान्याकडे येण्याची तयारी करत आहे.

मात्र, यामध्ये कारखाने उशिरा सुरू करून राज्यातील शेतकऱ्यांचे करोडो रुपयांचे नुकसान कोणी केले. यामध्ये नक्की कोणाला राजकीय पोळी भाजून घ्यायची आहे. याची ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्यात दबक्या आवाजात चर्चा आहे.

दरवर्षी १ नोव्हेंबरला राज्यातील साखर हंगाम सुरू होतो. १० नोव्हेंबरपर्यंत हंगाम सुरळीत सुरू होतो. मात्र, यावर्षी अचानक मंत्री समितीने साखर हंगामाची तारीख पुढे ढकलली आहे.

त्या सध्या विधानसभा निवडणुका आहेत. त्यामुळे मतदान आणि निकाल लागेपर्यंत ऊसतोडणी कामगार गाव सोडण्याची चिन्हे दिसत नाहीत. विधानसभेच्या निकालानंतर ऊस तोडणी कामगार कारखान्यांवर दाखल होण्याची चिन्हे आहेत, त्यामुळे कारखाने सुरळीत सुरू होण्यासाठी १ डिसेंबर उजडणार आहे.

यावर्षी पावसाचे प्रमाण चांगले असल्याने उसाची वाढ चांगली झाली आहे. आज रोजी ऊस तुटून जाणे गरजेचे होते. मात्र, अजून एक महिना उसाला तोडी येत नसल्याने उसाचे वजन घटून ऊस उत्पादकांचे नुकसान होणार आहे.

दुसरीकडे ३० टक्के ऊस उत्पादक शेतकरी उसाचे पीक गेल्यानंतर त्याच शेतात गहू व हरभऱ्यासारखी पिके घेतो. आता ऊसच उशिरा तुटून जाणार असल्याने ही शेतकऱ्यांची पिके होणार नसल्याने आर्थिक नुकसान होणार आहे.

विधानसभा निवडणुकीचे मतदान २० नोव्हेंबरला होणार असल्याने कारखान्यांपुढे ऊसतोड मजूर तत्पूर्वी कसे घेऊन जायचे, याचे आव्हान आहे, तर उमेदवारांना ऊसतोड मजूर मतदानाला परत आणायचे कसे, याची कसरत करावी लागणार आहे.

१ नोव्हेंबरऐवजी राज्य सरकारने साखर हंगाम १५ नोव्हेंबरवर ढकलून आधीच आर्थिक कचाट्यात सापडलेल्या साखर उद्योगापुढे ऊस गाळपाचे आव्हान उभे केले आहे.

अशात २० नोव्हेंबरला मतदान आणि २३ नोव्हेंबरला निकाल जाहीर होणार असल्याने अडथळ्यांचे रूपांतर संकटात होइल. महाराष्ट्रातून ऊसतोड कामगार इतरत्र जातात.

कारखाने कधी चालू होणार याकडे नजरा

वाहतूकदारांनी लाखो रुपये उचल मजुरांना दिली आहे. मजूर कारखान्यावर पोचले नाही किवा पळवापळवी झाली तर कोट्यवधी रुपयांचे नुकसान होणार आहे. अशात १५ नोव्हेंबरला तोडी सुरू करायच्या आणि चारच दिवसात कारखाना बंद करून मजूर पाठवायचे, अशी सर्कस होणार आहे. यामुळे हंगाम सुरळीत व्हायला कदाचित १ डिसेंबर उजाडणार आहे. तसेच शेतकऱ्यांचे ऊस उशिरा तुटून वजने कमी होणार, शिवाय दुबार पिकाची संधी तर गेल्यात जमा आहे. उसाची वाढ होऊन ऊस जमिनीवर लोळू लागल्याने उंदरांसह हुमणी ऊस पीक उध्वस्त करत असताना कारखाने कधी चालू होणार याकडे ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या नजरा लागल्या आहेत.

मजुरांना रोखण्याचे ठरेल मोठे आव्हान

आमदारकीच्या स्थानिक उमेदवारांपुढे मजुरांना जाण्यापासून रोखण्याचे आव्हान तर आहेच. याशिवाय कारखान्यावर पोचलेल्या मजुरांना मतदानासाठी आणायचे कसे, असा प्रश्न त्यांच्यापुढे आहे. दुसऱ्या बाजूला १५ नोव्हेंबरपूर्वी ऊसतोड मजूर कारखान्यावर कसे आणायचे, असा प्रश्न कारखानदारांपुढे उभा आहे. कारखान्यांनी करारबध्द केलेले वाहतूकदार आणि मुकादम हेही भांबावून गेले आहेत. कारण महाराष्ट्रासह कर्नाटक, गुजरातमध्ये ऊसतोड मजूर लाखोंच्या संख्येने जातात.अमेरिकेचा भारतासह १५ देशांना धक्का! कट्टर शत्रूला मदत केल्याचा आरोप करत केली कारवाई

अमेरिकेचा भारतासह १५ देशांना धक्का!

कट्टर शत्रूला मदत केल्याचा आरोप करत केली कारवाई

✔ **वॉशिंग्टन :** सध्या अमेरिकेत अध्यक्षपदाची निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. एकीकडे युक्रेन आणि रशियाचेयुद्ध २ वर्षांपासून सुरू आहे. तर दुसरीकडे इराण आणि इस्रायलमध्येही संघर्षाची ठिणगी पडलीय. अशात अमेरिकन सरकारने मोठा निर्णय घेतला. बुधवारी अमेरिकेने भारत, रशिया आणि चीनसह सुमारे १५ देशांतील ३९८ कंपन्यांवर बंदी घातली. युक्रेनविरुद्ध रशियाच्या प्रयतांना मदत करण्यासाठी उत्पादने आणि सेवा पुरवल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. अमेरिकेच्या ट्रेझरी आणि स्टेट डिपार्टमेंट्सने ही संयुक्त कारवाई केली आहे. रशियाला युद्धात अप्रत्याक्षरित्या मदत करणे आणि पाश्चात्या देशांनी लादलेल्या निर्बंधांपासून बचाव करण्यासाठी प्रयत केल्याने ही कारवाई केल्याचे सांगण्यात येत आहे.

फेब्रुवारी २०२२ मध्ये रशियाने युक्रेनवर हल्ला केला. त्यानंतर अमेरिकेच्या नेतृत्वाखालील अनेक पाश्चात्या देशांनी रशियावर विविध आर्थिक निर्बंध लादले आहेत. अमेरिकेच्या वित्त विभागाने रशियाला अप्रत्याक्षपणे पाठिंबा देणाऱ्या देशांशी संबंधित ३९८ कंपन्यांवर निर्बंध लादले आहेत. यापैकी २७४ कंपन्यांवर रशियाला प्रगत तंत्रज्ञान पुरवल्याचा आरोप आहे.

डेप्युटी ट्रेझरी सेक्रेटरी वॅली ॲडमो यांनी सांगितले की, युनायटेड स्टेट्स आणि त्यांचे सहयोगी देश युक्रेनच्या पाठिशी ठामपणे उभे आहेत. रशियाची युद्ध यंत्रणा कमकुवत करणे. पाश्चात्या निर्बंधांचा उल्लंघन करणाऱ्यांना रोखण्यासाठी वचनबद्ध आहे.

संरक्षण क्षेत्रातील कंपन्यांवरही बंदी

रशियास्थित संरक्षण आणि उत्पादन कंपन्यांचाही बंदी घालण्यात आलेल्या कंपन्यांमध्ये समावेश आहे. या कंपन्या युक्रेनविरुद्ध वापरल्या जाणाऱ्या शस्त्रास्त्रांशी संबंधित उत्पादने तयार करतात. याशिवाय अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने रशियन संरक्षण मंत्रालयातील अनेक वरिष्ठ अधिकारी आणि संरक्षण कंपन्यांचा समूह आणि चीनस्थित कंपन्यांवरही राजनैतिक निर्बंध लादले आहेत. या कंपन्या दुहेरी वापराच्या संरक्षण उत्पादनांच्या निर्यातीत गुंतलेल्या आहेत.

पर्यावरणपूरक फटाके म्हणजे काय?

मुंबई-संपूर्ण देशात बेरियमचे क्षार असलेले फटाके वाजविण्यावर बंदी आहे. मात्र असे असले तरी फटाक्यांमध्ये बेरियमचा वापर काही प्रमाणात करण्यात येत असल्याचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (एम पीसीबी) आणि आवाज फाउंडेशन यांनी केलेल्या फटाक्यांच्या चाचणीत उघड झाले आहे. दिवाळीनिमित्त दरवर्षी एमपीसीबी आणि आवाज फाउंडेशनतर्फे संयुक्तपणे पर्यावरणपूरक फटाक्यांची आवाज चाचणी केली जाते. त्यामुळे, फटाक्यांची आवाज चाचणी म्हणजे काय, त्यामधील रासायनिक घटक कोणते, यावर बंदी का, यामुळे होणारा त्रास, याचा घेतलेला हा आढावा.

फटाक्यांची चाचणी का केली जाते?

दिवाळीत फटाक्यांमुळे होणारे वायू प्रदूषण, पर्यावरणाची होणारी हानी आणि मानवी आरोग्यावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेऊन सर्वोच्च न्यायालयाने २०१८ मध्ये पर्यावरणपूरक फटाके निर्मिती करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार 'नॅशनल एन्व्हायर्नमेंटल इंजिनीअरिंग रिसर्च इन्स्टिट्यूटने ('नीरी') पर्यावरणपूरक फटाक्यांच्या निर्मितीचे निकष निश्चित केले. तसेच, मागील काही वर्षांपासून कानठळ्या बसविणाऱ्या फटाक्यांमुळे मुंबईत ध्वनिप्रदूषणात भर पडत आहे. यामुळे, फटाक्यांचा आवाज नियंत्रणात राहावा, तसेच बाजारात पर्यावरणपूरक फटाक्यांव्यतिरिक्त इतर कोणते फटाके उपलब्ध आहेत का, त्या कोणते रासायनिक घटक आहेत याची तपासणी करण्यासाठी गेली अनेक वर्षे प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि आवाज फाउंडेशन दिवाळीपूर्वी मुंबईत फटाक्यांची चाचणी करीत आहेत.

पर्यावरणपूरक फटाके म्हणजे काय?

पर्यावरणपूरक फटाक्यांमुळे तुलनेने वायू आणि ध्वनिप्रदूषण कमी होते. हे फटाके सर्वसामान्य फटाक्यांसारखेच दिसतात. त्यात फुलबाजा, स्काय शॉट आदींचा समावेश असतो. पर्यावरणपूरक सुगंधी फटाकेही बाजारात उपलब्ध आहेत. हे फटाके पेटवल्यानंतर त्यामध्ये पाण्याचे कण तयार होतात. परिणामी, या फटाक्यांमुळे प्रदूषण कमी होते. फटाके जळल्यानंतर तयार होणाऱ्या पाण्याच्या रेणूमध्ये सल्फर आणि नायट्रोजनचे कण विरघळतात.

पर्यावरणपूरक फटाक्यांमध्ये कोणते घटक?

पर्यावरणपूरक फटाक्यांची निर्मिती वेगळ्या पद्धतीने करण्यात येते. आवाज करणाऱ्या फटाक्यांच्या तुलनेत पर्यावरणपूरक फटाक्यांमुळे सरासरी ३० ते ४० टक्के कमी प्रदूषण होते, असा दावा विविध संशोधन अहवालांमध्ये करण्यात आला आहे. तसेच, या फटाक्यांमध्ये प्रदूषण वाढवणारी रसायने नसतात. यामध्ये, ॲल्युमिनियम, बेरियम, पोटॅशियम नायट्रेट आणि कार्बनचा वापर करण्यात येत नाही किंवा त्यांची मात्रा कमी असते. त्यामुळे, वायूप्रदूषणाचा धोका कमी होतो. यापूर्वी, काही ठराविक संस्था पर्यावरणपूरक फटाक्यांची निर्मिती

करीत होत्या. मात्र, आता मोठ्या प्रमाणावर या फटाक्यांचे उत्पादन होत आहे. त्यामुळे, सरकारमान्य नोंदणी असणाऱ्या दुकानांमध्ये पर्यावरणपूरक फटाके सहज उपलब्ध होतात. पर्यावरणपूरक फटाके इतर फटाक्यांपेक्षा थोडे महाग आहेत. म्हणजे सर्वसाधारण फटाक्यांची किंमत २५० रुपये असल्यास त्याच प्रकारचे पर्यावरणपूरक फटाके ४०० रुपयांना मिळतात.

बेरियम म्हणजे काय? ते हानिकारक का?

बेरियम हा पदार्थ रासायनिकदृष्ट्या अस्थिर असतो. यामुळे, तो मूलद्रव्याच्या स्वरूपात सापडत नाही. मात्र, त्याची संयुगे आढळतात व ती अतिशय विषारी असतात. त्यामुळे कंप सुटणे, अशक्तपणा, श्वसनात अडसर, अर्धांगवात यांसारख्या गंभीर समस्या उद्भवण्याचा धोका असतो. तसेच, डोळे, पचनसंस्था, हृदयक्रिया, श्वसनसंस्था व त्वचेवर बेरियमचे दुष्परिणाम होतात. बेरियममुळे पोट आणि आतड्यांशी संबंधित समस्या (उलट्या आणि अतिसार), तसेच चेहऱ्याभोवती सुन्नपणा, स्नायू कमकुवत होणे, रक्तदाब वाढणे किंवा कमी होणे, श्वास घेण्यास त्रास होणे असे आजार उद्भवतात.

फटाक्यांमध्ये बेरियमची क्रिया कशी होते?

फटाक्यांमध्ये बेरियम नायट्रेट सिग्नल फ्लायर म्हणून वापरण्यात येतो. याचा उपयोग फटाक्यांमध्ये प्रणोदक (प्रॉपलेंट) प्रदान करण्यासाठी केला जातो. फटाका फुटल्यानंतर बेरियम नायट्रेटमुळे चमकदार हिरवा प्रकाश बाहेर पडतो. बेरियमचा रंग पांढरा आहे. यामुळे, फटाक्याचा जोरदार स्फोट होतो आणि हिरवा रंगही निर्माण होतो. बेरियम नायट्रेटला 'कलर स्पार्कलर' म्हणतात. फटाक्यात क्षारयुक्त तांब्याचा वापर केल्याने निळा रंग येतो आणि लिथियमपासून लाल रंग मिळतो. भारतात २०१८ मध्ये बेरियम तसेच बेरियम क्षारांवर बंदी घालण्यात आली होती. तरीही फटाक्यांमध्ये या रसायनांचा वापर केला जात आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश काय?

सर्वोच्च न्यायालयाने बेरियम आणि प्रतिबंधित रसायनांपासून तयार करण्यात येणाऱ्या फटाक्यांवर बंदी घातली आहे. फटाक्यांवरील बंदीचे निर्देश केवळ दिल्लीतच नाही, तर प्रत्येक राज्यासाठी लागू आहेत, असेही न्यायालयाने हे निर्देश देताना स्पष्ट केले होते. फटाक्यांमुळे होणाऱ्या प्रदूषणाबाबत दाखल करण्यात आलेल्या एका याचिकेवरील सुनावणीच्या निमित्ताने सर्वोच्च न्यायालयाने हे आदेश दिले होते. बेरियमचा वापर होत असलेल्या फटाक्यांमुळे प्रदूषण वाढते. त्यामुळे, फटाक्यांमध्ये प्रतिबंधित रसायनांचा वापर करण्यास बंदी घालण्यात आली आहे.

फटाके आणि वायूप्रदूषण हे समीकरण काय?

मुंबईतील हवेचा दर्जा हा सातत्याने ढासळत आहे. त्यामुळेच, मुंबई उच्च न्यायालयाने बृहन्मुंबईत रात्री ८ ते १० या वेळेत फटाके वाजवण्याची मुभा गेल्या वर्षी दिली होती. इतर वेळी मुंबईत फटाके फोडण्यावर बंदी आहे. हवेतील धुलीकणांचे पीएम २.५ आणि पीएम १० अशा दोन आकारांत वर्गीकरण केले जाते. अडीच मायक्रॉनपेक्षा कमी व्यास असणाऱ्या कणांना पीएम २.५ म्हणतात, तर २.५ ते १० मायक्रॉन एवढा आकार असणाऱ्या प्रदूषकांना पीएम १० म्हणतात. हे कण दिसत नाहीत. त्यामुळे, ते अगदी सहज नाकावाटे किंवा घशामधून शरीरात जातात आणि दमा, हृदयविकार, ब्रॉंकायटिस आणि श्वसनाचे इतर आजार होऊ शकतात. फटाके फोडल्यानंतर त्यातून मोठ्या प्रमाणावर पीएम २.५ चे कण हवेत पसरतात आणि ते दीर्घकाळ हवेतच साचून राहातात, जे अपायकारक असतात.

सावळे सुंदर रुप मनोहर! विठ्ठल रुक्मिणी सजले हिरेजडीत दागिन्यांमध्ये

पंढरपूर : सणांचा राजा दिपावलीनिमित्त तीर्थक्षेत्र पंढरपूरच्या श्री विठ्ठल मंदिराला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

दिवाळीनिमित्त मंदिराला आकर्षक विद्युत रोषणाई

पंढरपूर/प्रतिनिधी

नरकचतुर्दशी निमित्त परंपरेप्रमाणे श्री विठ्ठल आणि रुक्मिणीला ठेवणीतील हिरेजडित अलंकार परिधान करण्यात आले आहेत. दीपावलीनिमित्त विठ्ठल मंदिराला आकर्षक विद्युत रोषणाई देखील करण्यात आली आहे. विठ्ठल भक्तांनी मंदिरात रांगोळ्याच्या पायघड्याही घातल्या आहेत. विठ्ठल आणि रुक्मिणीला दागिने परिधान केल्यानं देवाचं रुप 'सावळे सुंदर रुप मनोहर' या उक्तीप्रमाणे अधिकच सुंदर दिसत आहे.

श्री विठ्ठलास सोन्याचा मुकुट, कौस्तुभ मणी, दंडपेठया, हिऱ्याचे कंगन जोड, मोत्याचा तुरा, मारवाडी पेठांचा मोत्यांचा हार, मोत्याची कंठी, शिरपेच, मोहरांची माळ, तुळशीची माळ, तोडे जोड, मत्स्य जोड, पदकासह लॉकेट असे हिरेजडित दागिने परिधान केले आहेत. तर श्री रुक्मिणी मातेस सुवर्ण मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवामनी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मी हार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा इत्यादी अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत. नरकचतुर्दशी निमित्ताने श्री.विठ्ठल सभामंडप येथे नंदू शिंदे, मुंबई यांनी श्री. विठ्ठलाची आकर्षक रांगोळी साकारली असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

नरकचतुर्दशी निमित्ताने श्री. विठ्ठल सभा मंडप येथे श्री.नंदू शिंदे, मुंबई यांनी श्री. विठ्ठलाची आकर्षक रांगोळी साकारली आहे. विठ्ठल मंदिराला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आलेली असून दिवाळीनिमित्त विठ्ठल मंदिर विविध रंगाने उजळून निघाले आहे. दरवर्षी दिवाळी सणाच्या निमित्तानं विठ्ठल रुक्मिणी मंदीरावर आकर्षक रोषणाई केली जाते. तसेच देवाला दागिणे परिधान केले जातात.

विठ्ठल मंदिरातही टोकन दर्शन व्यवस्था सुरु होणार

कार्तिकी एकादशी १२ नोव्हेंबर रोजी होणार आहे. त्या निमित्ताने ४ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर या काळात श्री विठ्ठल रुक्मिणीचं २४ तास दर्शन सुरू राहणार आहे. यंदाच्या कार्तिकी यात्रेत आयोध्या येथील राम मंदिराच्या दर्शन व्यवस्थेप्रमाणे विठ्ठल मंदिरातही टोकन दर्शन व्यवस्था सुरू होणार आहे. यामुळे विठुरायाची लांबच लांब दर्शन रांग आता इतिहास जमा होणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या व्यवस्थेसाठी मंदिराला निधी देत चार मजली दर्शन मंडप बांधण्याच्या कामास हिरवा झेंडा दाखवला आहे. त्यामुळे आता देशभरातील लाखो भाविकांना विठुरायाचे सुलभ व झटपट दर्शन होणे शक्य होणार आहे.

संक्षिप्त वृत्त

अक्कलकोट : दिपोत्सव कार्यक्रमात विद्यार्थ्यांसमवेत शिक्षिका रिंकु जाधवर आदी.

उमरगे जिल्हा परिषद शाळेत 'दीपोत्सव' कार्यक्रम

अक्कलकोट : तालुक्यातील उमरगे जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेमध्ये 'दीपोत्सव' चा कार्यक्रम राबवून विद्यार्थ्यांनी प्रदूषण मुक्त दिवाळी साजरी करत दीपोत्सवाचा आगळा वेगळा कार्यक्रम जल्लोषात साजरी केला. शिक्षिका रिंकु अनंतराव जाधवर (धस) यांनी विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांचा विकास होऊन स्वनिर्मितीचा कलागुणांना वाव देण्यासाठी विद्यार्थ्यांकडून मातीच्या विविध आकारांच्या पणत्या तयार करून घेतल्या. विद्यार्थ्यांना आकाश कंदील व भेट कार्डचे प्रात्यक्षिक करून घेतले. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या दिव्यांची आरास करून दिपोत्सव साजरा केला. विद्यार्थ्यांनी प्रदूषण मुक्त दिवाळी साजरी करत पर्यावरणाचे संरक्षण करण्याचा संदेश दिला. दीपोत्सव या उपक्रमामुळे खरोखरच विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव मिळाला असून संस्कृती व पर्यावरणाचे संरक्षण जतन संवर्धन करत विद्यार्थी स्वनिर्मितीचा आनंद लुटला आहे.

अक्कलकोट निवडणूक निरीक्षकपदी रघुवंशी

अक्कलकोट : आगामी होऊ घातलेल्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीकरिता भारत निवडणूक आयोगाने २५० अक्कलकोट विधानसभा मतदारसंघाकरिता विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निरीक्षक म्हणून ऋतुराज रघुवंशी (भाप्रसे) यांची नियुक्ती करण्यात आले आहे. अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील नागरिकांनी निवडणूक विषयी काही अडचणी व तक्रारी असल्यास तसेच संबंधित निवडणूक निरीक्षक यांची भेट घ्यावयाची असल्यास शासकीय विश्रामगृह सोलापूर सात रस्ता येथील उत्तरा या कक्षात वास्तव्यास आहेत. त्यांचा भ्रमध्वनी क्रमांक ९२०९९४७२९० असून निवडणूक निरीक्षक हे सदर ठिकाणी उपलब्ध असल्यास नागरिकांना सकाळी ११ ते दुपारी १ पर्यंत भेटतील त्यांचे अनुपस्थित महेश कोठणे लघुलेख स्टेनो हे निवेदन स्वीकारतील त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ९६६५६८५५०४ हा आहे.

सेंट्रल बँकेचे एटीएम मशीन फोडण्याचा प्रयत्न

सोलापूर/प्रतिनिधी

शहरातील दावत चौक येथे असलेल्या सेंट्रल बँक ऑफ इंडिया या बँकेचे एटीएम मशीन फोडण्याचा अज्ञात चोरट्याने प्रयत्न केला. ही घटना बुधवार दि. ३० ऑक्टोबर रोजी रात्री १.१५ वाजेच्या दरम्यान दावत चौक सोलापूर येथे घडली. याप्रकरणी अमित रमेश गोडभरले (रा. विजापूर रोड, सोलापूर) यांनी अज्ञात चोरट्याविरुध्द विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. बुधवार रात्री एक वाजेच्या दरम्यान ही घटना घडली.यावेळी चोरट्यांनी मशीन रूममध्ये प्रवेश केल्यानंतर तोंडावर काळ्या रंगाचे टी-शर्ट पांघरून तसेच हातामध्ये कटवणीसारखी वस्तू घेऊन मशीनचे कॅश लोडिंगचे बाहेरील दार काढून त्यामधील रोख रक्कम असलेले आतील डोअर कटवणीच्या साह्याने उघडण्याचा व त्यामधील रोख रक्कम चोरी करण्याचा प्रयत्न केला. तसेच मशीनचे स्क्रीन पॅनल व मेटेनस रूमचे दार तोडून त्याचे नुकसान केले. पुढील तपास पोलीस हवालदार भांगे हे करत आहेत.

विडी घरकुल येथून मोटरसायकलची चोरी

विडी घरकुल येथे राहत्या घरासमोर लावलेली मोटरसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना सोमवार २८ ऑक्टोबर रोजी रात्री १० वा. ते मंगळवार २९ ऑक्टोबर दरम्यान सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास विडी घरकुल सोलापूर येथे घडली.

याप्रकरणी श्रीनिवास ईस्तारी कोटा (वय-३० रा. विडी घरकुल, सोलापूर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.यात फिर्यादी यांनी स्वमालकीची मोटरसायकल (एम.एच.१३.डी.डी.१६३८) ही विडी घरकुल येथे असलेल्या घरासमोर हँडल लॉक करून ठेवली असताना कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. अधिक तपास पोलीस हवालदार गायकवाड हे करत आहेत.

तरुणींचे दोन लॅपटॉप पळवले

दोघी मैत्रिणी मिळून एसटी स्टँड सोलापूर येथे बसमधून खाली उतरताना अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेऊन दोन लॅपटॉप, हेडफोन, आय कार्ड आणि काळी सॅक असा एकूण ६० हजारांचा ऐवज चोरून नेल्याची घटना २६ ऑक्टोबर रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास सोलापूर एसटी स्टँड येथे घडली. याप्रकरणी वैष्णवी शामराव लोंढे (वय-२३, रा. न्यू बुधवार) पेठ हिने फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

सोलापूर : अभिवादनप्रसंगी नरसिंग चिप्पा, माहेजबीन शेख यांच्यासह महापालिकेचे कर्मचारी.

मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात गांधी, पटेल यांना अभिवादन

सोलापूर/प्रतिनिधी

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळात सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त आणि माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे कर्मचारी नरसिंग चिप्पा यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक माहेजबीन शेख, लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, पर्यवेक्षक संतोष बुलबुले, भगवान मुंढे, सुरेश कासार, रजनी राऊळ, निलोफर सय्यद, महेश वालावलकर, भालचंद्र साखरे, नासिर खान आदी उपस्थित होते.

विना अपघात दिवाळी साजरी करा : माने

सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर शहर हे उत्सवाचे शहर आहे. सोलापुरात प्रत्येक सण उत्साहात साजरा केला जातो. त्याप्रमाणे महावितरणच्या कर्मचाऱ्यांनीही उत्साहात दिवाळी साजरी करावी. दिवाळीच्या काळात विद्युत पुरवठा खंडित होऊ नये, यासाठी दक्षता घ्यावी. त्याचबरोबर विद्युत पुरवठा सुरळीत ठेवण्याचे आवाहन महावितरणचे अधीक्षक अभियंता सुनील माने यांनी केले.

शहरातील महावितरणच्या मुख्य कार्यालयात पहिल्यांदाच अधीक्षक अभियंता माने यांच्या पुढाकाराने महावितरण कर्मचाऱ्यांसाठी दीपोत्सव, दिवाळी फराळ आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

पुढे ते म्हणाले, 'वीज ग्राहकाच्या आलेल्या अडचणी तात्काळ सोडवून द्या. त्याचबरोबर सुरक्षेच्या दृष्टीने दक्ष राहून विना अपघात सेवा बजावा, महावितरणकडे सर्व ग्राहकांनी चांगल्या दृष्टीने पाहावे, यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम करून ग्राहकांना न्याय देण्याचे काम करावे', असे आवाहन करण्यात आले. यावेळी उपकार्यकारी अभियंता नागनाथ गयाळे, रमेश राठोड, आशिष मेहता, विजय पाटील, अकलूजचे काळे, चाचणी विभागाचे राबती लांबचाने, प्रशासनाचे कार्यकारी

राज ठाकरेंना महायुतीत येण्याचा स्कोप नाही

मुंबई : राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने जवळपास सर्वच विधानसभा मतदारसंघात उमेदवार उभे केले आहेत. माहीम विधानसभा मतदारसंघातून त्यांचे पुत्र अमित ठाकरे निवडणूक लढवत असल्याने मुख्यमंत्री शिंदे यांनी शिवसेनेचे उमेदवार सदा सरवणकर यांना निवडणुकीच्या रिंगणातून माघार घ्यावी, अशी विनंती केल्याची चर्चा आहे. या जागेवरून सध्या राज्यात चांगलाच वाद निर्माण सुरू असला तरी मनसे महायुतीत सहभागी होईल याचा कुठलाच स्कोप नसल्याने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. राज ठाकरे आमचे मित्र आहेत. सध्या तरी ते महायुतीत नाही. त्यांनी अनेक ठिकाणी महायुतीच्या विरोधात उभे केले आहे. यावरून ते महायुतीत सहभागी होतील, असे दिसत नाही. सध्या भाजप,शिवसेनेने, राष्ट्रवादी आणि रिपाइं अशी युती आहे. आम्ही एकत्र लढत आहोत, असे फडणवीस म्हणाले.

राज ठाकरे यांनी लोकसभेच्या निवडणुकीत महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिला होता. विधानसभेच्या निवडणुकीमध्ये त्यांची भूमिका वेगळी आहे. त्यांनी महायुतीच्या विरोधात देखील उमेदवार उभे केले आहेत. हे बघता ते महायुतीत सहभागी होतील याचा कुठलाही स्कोप आपल्याला दिसत नसल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

मनसेचे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणातून मायार येणार नसल्याने महायुतीच्या विरोधात ते लढणार आहे. महायुती असो महाविकास आघाडी आणि मनसे इतर पक्ष आघाड्यांसोबत स्वतंत्रपणे लढत आहे. एखाद दोन जागी मुख्यमंत्र्याच्या मान्यतेने मदत करता येईल. उदाहरणार्थ शिवडीच्या जागेवर मुख्यमंत्री यांनी भूमिका घेतली आहे याकडे फडणवीस यांनी लक्ष वेधले. राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार येणार आहे. मुख्यमंत्री कोणाचा होणार हा प्रश्न नाही. सध्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारमध्ये आम्ही काम करीत आहोत. त्यांच्या नेतृत्वात निवडणुकीला सामोरे जात आहोत. जरांगे पाटील दिवसातून तीन वेळा माझे नाव घेतात.

निधन वार्ता

अनिल अंकुशराव

सोलापूर : विजापूर रोड येथील शांती नगर हौसिंग सोसायटी मधील रहिवाशी व ह. दे. प्रशालेचे माजी शिक्षक, पर्यवेक्षक अनिल अंकुशराव यांचे हृदयविकाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले, सुन, मुलगी जावई असा परिवार आहे. त्यांच्यावर १ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता मोदी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार होणार आहेत.

देवीदास चव्हाण

माढा : माढ्यातील देविदास रामचंद्र चव्हाण वय - ८२ यांचे आजारपणामुळे बुधवारी दि. ३० रोजी रात्री निधन झाले. जाधववाडी (मा) या त्यांच्या मुळगावी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन विवाहित मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

शिवचलप्पा दिवटे

अक्कलकोट : मैंदर्गी येथील शिवचलप्पा सायबण्णा दिवटे (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा व दोन मुली असा परिवार आहे. वीरशैव लिंगायत माळी समाजाचे अध्यक्ष काशिनाथ दिवटे यांचे बंधू होत.

रमेश वीर

करमाळा : शहरातील शहाजी उर्फ रमेश विश्वनाथ वीर यांचे अल्पशा आजाराने गुरुवारी निधन झाले. करमाळा तहसील आवारात ते महा-ई-सेवा केंद्र चालक होते. शहरातील ॲड. कमलाकर वीर यांचे ते धाकटे बंधू होत. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, एक मुलगा व बंधू व इतर परिवार आहे.

मोटरसायकलची चोरी

सोलापूर : राहत्या घरासमोर लावलेली मोटरसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २७ ऑक्टोबर रात्रीच्या सुमारास गुरुवार पेठ येथे घडली.

याप्रकरणी संजय नागनाथ वाकळे (वय-५६ रा. गुरुवार पेठ सोलापूर) त्याने अज्ञात चोरट्या विरोधात जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. यात वाकळे यांनी स्वतःची डिलक्स या कंपनीचे मोटरसायकल (एम.एच.१३.सी.वाय.५१५०) ही राहत्या घरासमोर लॉक करून ठेवली असताना कोणीतरी अज्ञात चोरट्याने ते चोरून नेली.पुढील तपास पोलीस हवालदार नदाफ हे करत आहेत.

अक्कलकोटमध्ये पोलिसांचा रूट मार्च

अक्कलकोट : उत्तर पोलीस ठाणे हद्दीत आगामी विधानसभा निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने दि. ३० ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० ते ११.३० या वेळेत अक्कलकोट शहरातील प्रमुख मार्गावरून रूट मार्च घेण्यात आला. रूट मार्च करिता पोलीस ठाणे कडील ०५ पोलीस अधिकारी, २५ पोलीस अंमलदार, S.S.B.चे ०२ अधिकारी व ७० जवान सहभागी होते.

कुत्रा आडवा आल्याने महिला जखमी

सोलापूर : दुचाकीच्या पाठीमागे बसून प्रवास करताना अचानक कुत्रा आडवा आल्याने खाली कोसळून ३६ वर्षीय महिला जखमी होऊन बेशुध्द झाली. ही घटना सांगोला येथील भीमनगर येथे बुधवारी सायंकाळच्या सुमारास घडली.

कालिका रघुनाथ बनसोडे (वय ३६ रा. मेथवडे ता. सांगोला) असे बेशुध्द झालेल्या महिलेचे नाव आहे. त्यांना सांगोला येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात सुरज भोसले (पुतण्या) यांनी दाखल केले.

कालिका बनसोडे या बुधवारी सायं. ७ च्या सुमारास दुचाकीच्या पाठीमागे बसून सांगोला एसटीस्टँड ते भीमनगरच्या दिशेने निघाल्या होत्या. वाटेत दुचाकीसमोर कुत्रा आडवा आल्याने त्या तोल जाऊन दुचाकीवरून कोसळून जखमी

एसएनडी इंटरनॅशनल स्कूलला दिल्ली बोर्ड सीबीएसईची मान्यता

नातेपुते/प्रतिनिधी

नातेपुते तालुका माळशिरस येथील समाजभूषण नानासाहेब देशमुख एज्युकेशन सोसायटी संचलित एसएनडी इंटरनॅशनल स्कूलची नुकतीच सीबीएसई दिल्ली बोर्ड केंद्रीय पथकाकडुन या स्कूलची इमारत, क्रीडांगण, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, ग्रंथालय, संगणक कक्ष, प्रयोगशाळा, डिजिटल वर्ग खोल्यासह गुणवत्तावर्धक सर्व शिक्षण सुविधाची तपासणी करण्यात आली होती. तपासणी दरम्यान कोणत्याही त्रुटी आढळून न आल्याने एसएनडी इंटरनॅशनल स्कूलला केंद्रीय माध्यमिक शिक्षा बोर्ड, दिल्ली द्वारा सीबीएसई बोर्ड अभ्यासक्रमाला अधिकृत प्रशासकीय मान्यता दिली आहे. याबाबतचे पत्र नुकतेच संस्थेला प्राप्त झाले आहे.

एसएनडी इंटरनॅशनल स्कूलला केंद्रीय माध्यमिक शिक्षा बोर्ड दिल्ली द्वारा सीबीएसई मान्यता मिळाल्याबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख यांनी मुख्याध्यापक संदीप पानसरे, उप-मुख्याध्यापक शकूर पटेल, संस्थेचे पीआरओ मनोज राऊत व शिक्षक कर्मचारी यांना गुलाब पुष्प देऊन अभिनंदन केले. व पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी स्कूलचे संस्थापक अध्यक्ष बाबाराजे देशमुख बोलत असताना म्हणाले की, 'स्कूल सीबीएसई बोर्ड संलग्न झाल्याने संस्थेचा गुणवत्तेचा स्तर आणखीन वाढण्यास मदत होणार आहे. सीबीएसई मान्यताप्राप्त झाल्याने संस्थेच्या दृष्टीने ही अभिमानास्पद बाब आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना देखील आधुनिक शिक्षण देण्यासाठी डिजिटल क्लासरूमद्वारे दर्जेदार शाळा उभारण्याचा मनोदय आहे.

नातेपुते : मुख्याध्यापक संदीप पानसरे, उप-मुख्याध्यापक शकूर पटेल, मनोज राऊत यांचे अभिनंदन करताना बाबाराजे देशमुख.

यावेळी स्कूलचे चेअरमन मालोजीराजे देशमुख बोलत असताना म्हणाले की, 'नातेपुते सारख्या ग्रामीण भागात समाजभूषण नानासाहेब देशमुख एज्युकेशन सोसायटी संचलित एसएनडी इंटरनॅशनल स्कूलची उभारणी करून या ठिकाण सर्व शैक्षणिक भौतिक सुविधा संस्थेने उपलब्ध करून दिल्याने अल्पावधित एसएनडी इंटरनॅशनल स्कूलने मोठी झेप घेतली आहे. शाळेला सीबीएसई बोर्डची मान्यता मिळाल्याने संस्थेची जबाबदारी आणखीन वाढली असल्याचे मत स्कूलचे चेअरमन मालोजीराजे देशमुख यांनी व्यक्त केले.

यावेळी मुख्याध्यापक संदीप पानसरे, उप-मुख्याध्यापक शकूर पटेल, पीआरओ मनोज राऊत, शिक्षिका सारिका पानसरे, मोनिका बरडकर, ज्योती मोरे, तहसीन शेख, जारमीन काझी यांनी मनोगते व्यक्त केली.

द फार्म

वनस्पतीच्या शरीरिक क्रियांवर ताबा ठेवणारी काही रासायनिक द्रव्ये नैसर्गिकरीत्या वनस्पतींमध्ये तयार होत असतात. या द्रव्यांना संजीवके या नावाने ओळखले जाते. वनस्पतीच्या विविध शरीरक्रियांत वाढ करणे. त्या थांबविणे, त्यांचा वेग मंदावणे किंवा त्यांच्यात बदल घडवून आणणे अशा प्रकारचे अनेक परिणाम कृत्रिमरित्या संजीवके तयार करून आणि त्यांचा पिकांवर वापर करून घडवून आणता येतात.

संजीवकांच्या अंतरंगात...

संजीवकांचे प्रमुख चार प्रकार असतात.

✻ **ऑक्झिन्स** : ऑक्झिन्सच्या वापरामुळे वनस्पतीच्या पेशींची लांबी वाढते. तसेच फुलांची आणि फळांची गळ थांबविणे, कलमांना मुळे येणे, फलधारणा करण्यास मदत करणे हे सुद्धा ऑक्झिनचेच कार्य आहे. उदाहरणार्थ आय. ए.ए., आय. बी. ए., टी. आ., बी.सी.ए., सी.पी.ए.

✻ **सायटोकायनिन्स** : या संजीवनीकांच्या अंगी वनस्पती पेशा विभाजनाची क्षमता आढळते. याशिवाय प्रजनन वाढीस मदत करणे, हिरवा भाजीपाला अधिक काळापर्यंत ताजा ठेवणे या कार्यातही सायटोकायनिन्स उपयुक्त असतो. उदा-कायनेटिन, कायनीन, प्युटीन, झियाटीन इत्यादी.

✻ **जिबरेलिन्स** :या संजीवकात पेशी विभाजनाची आणि त्यांची लांबी वाढविण्याची अथवा या दोन्ही क्रिया करण्याची क्षमता आढळते. तसेच बियांची सुप्तावस्था नष्ट करणे आणि बियांचे प्रमाण कमी करणे, फळांचा आकार वाढविणे या कार्यातही हे संजीवक उपयुक्त असते. उदाहरणार्थ : जी. ए. १, जीए-२, जीए-५९

✻ **वाढरोधक नियंत्रके** : वनस्पतीच्या शरीरांतर्गत चालणाऱ्या क्रिया कमी करण्याची अगर पूर्णपणे थांबविण्याची क्षमता (जसे कोंब येण्यास विलंब करणे, पानांमधून पाण्याचे उत्सर्जन कमी करणे इत्यादी या गटातील संजीवकांच्या अंगी आढळते. उदाहरणार्थ. ए.बी.ए., सी.सी.सी.बी.-९ इत्यादी

✻ **इथिलीन** : उत्पादन वाढविणे, फलधारणा वाढविणे, अवर्षणात प्रतिकारशक्ती वाढविणे, फळांचा आकार आणि वजन वाढविणे, फुलांचे प्रमाण वाढविणे आदी कार्यांसाठी हे संजीवक उपयुक्त असते. उदाहरणार्थ : सी.सी.सी., अलार, मॉरफॅक्टीन.

शारीरिक पद्धतीने वनस्पतीची अभिवृद्धी करण्यास अथवा बियांपासून अभिवृद्धी करण्यास संजीवकांचा वापर लक्षणीय ठरतो. कलम करताना भिन्न वनस्पतींच्या पेशींचा एकजीव करण्याचा उद्देश असतो. अशा वेळी ऑक्झिनसारख्या संप्रेरकाचा वापर केल्यास पेशी विभाजनाचे काम होऊन इच्छित भागास मुळे फोडणे किंवा त्यांचे एकमेकांत मिसळणे शक्य होऊन कमी वेळात अधिक प्रमाणात अभिवृद्धीचे काम होऊ शकते. फ ळपिके, विविध शोभेच्या झुडपांच्या व फुलझाडांच्या अभिवृद्धीमध्ये ऑक्झिनचा वापर यशस्वितेने करता येतो. बीजाची सुप्तावस्था मोडण्यासाठी जिब्रेलिन्स गटातील संजीवकामध्ये बिया काही काळ भिजविल्यास बियांची उगवण चांगली व लवकर झालेली आढळते.

संजीवकाचा वापर करताना काही गोष्टींची काळजी घेणे आवश्यक असते.

कोणत्याही संजीवकाची फवारणी ही तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसारच करावी. जमिनीवरून एखाद्या संजीवकाचा वापर करावयाचा असेल, तर द्रावणाचे प्रमाण जास्त असावे. हवेतून फवारणीमार्फत द्यावयाचे असेल, तर द्रावणाचे प्रमाण कमी असावे. संजीवकांचा वापर शक्यतो सकाळी किंवा संध्याकाळी उष्णता व वाऱ्याचे प्रमाण कमी असताना करावा. संजीवकांचा वापर करताना जास्तीत जास्त भाग वनस्पतीच्या आवश्यक त्या भागावर पडेल यांची दक्षता घ्यावी. कोणत्याही संजीवकाची अभिक्रिया करताना त्याचे द्रावण ताजे तयार केलेले वापरावे. उदा. जिब्रेलिन्स ४०० पी.पी.एम. तीव्रतेचे करावयाचे असेल, तर चार ग्रॅम जिब्रेलिक आम्लाचे दहा लिटर पाण्यात द्रावण तयार होते, या सूत्राचा वापर करून कोणत्याही संजीवकाचे वेगवेगळ्या तीव्रतेचे द्रावण तयार करू शकाल.

◆◆◆

सध्याचा कोरोनाचा काळ वगळला तर भारतामध्ये धार्मिक सणांमध्ये, अध्यात्मिक कार्यक्रमांमध्ये, विविध समारंभांमध्ये, महोत्सवांमध्ये फुलांचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. याखेरीज हल्लीच्या सेलीब्रेशन कल्चरमुळे आणि आधुनिक जीवनशैलीतील सदिच्छा व्यक्त करण्यासाठीच्या नव्या प्रथांमुळेही फुलांना मागणी वाढत आहे. याखेरीज सजावटीसाठीही फुले अनिवार्य असतात. फुलांना असलेल्या विविध रंगांच्या छटा, आकर्षकपणामुळे फुलशेतीस अलीकडच्या दशकात फार मोठी चालना मिळाली आहे. पूर्वी पारंपरिक पद्धतीने फुलशेती केली जात असल्याने उत्पन्नावर खूपच मर्यादा होत्या. त्यातच भारतीय शेतीला नैसर्गिक अनियमिततेला नेहमीच सामोरे जावे लागते. कधी अतिपाऊस तर कधी अतिथंडी आणि कधी कधी भयावह दुष्काळ. यातूनही शेतकऱ्यांनी टप्प्या टप्प्याने मार्ग काढून फुलशेती उत्पादनात प्रगती केली आहे.

फुलशेतीतून अर्थार्जन

भारतात कर्नाटक, महाराष्ट्र तमिळनाडू, बिहार, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, हरियाना, पंजाब, जम्मू-काश्मीर, आंध्र प्रदेश आणि मध्य प्रदेश ही राज्ये फुलांच्या उत्पादनात आघाडीवर आहेत. एकूणातच आजचा काळ विचारात घेतला तर केवळ अन्नधान्य उत्पादनासाठी शेती आता मर्यादित राहिलेली दिसत नाही. शेतीमध्ये आता आधुनिकता आली असून अनेक शेतकऱ्यांनी शेतीला व्यावसायिक स्वरूप दिले आहे. शेतीच्या अनेक शाखांमध्ये फुलशेतीचा नेहमीच उल्लेख होतो. परंतु फुलशेती म्हणजे फुलांची पिके घेऊन आलेली फुले बाजारात विकणे एवढाच अर्थ होत नाही. म्हणून फुलशेतीची निवड करताना शेतकऱ्यांनी फुलशेतीचे फायदे अभ्यासणे गरजेचे आहे. शोभेच्या, फुलांच्या आणि कुंडीतील झाडांची अभिवृद्धी करुन त्यापासून चांगला नफा कमविता येऊ शकतो. कारण आता घर, कार्यालय, औद्योगिक कारखान्यांचा परिसर, शाळा, विद्यालये त्यांच्या सुशोभिकरणासाठी शोभेच्या झाडांची मागणी चांगलीच वाढली आहे. तसेच ऑर्किड, ॲन्थुरियम, शेवंती, कार्नेशन यारसारख्या जास्त किंमतीच्या फुलांना देशात आणि परदेशात मागणी वाढत आहे. अशा फुलांची उति संवर्धनाद्वारे दर्जेदार रोपे तयार करूनही चांगला आर्थिक फायदा कमविता येऊ शकतो.

बोन्साय हा प्रकार हल्ली महत्त्वाचा ठरत आहे. शोभेचा डाळिंब, जुनिपर, वड, पिंपळ, चिंच इत्यादींच्या बोन्साय प्रकारातील झाडांची मागणी दरवर्षी वाढत आहे. या बोन्साया झाडांचा कार्यालयात, घरात आणि वेगवेगळ्या समारंभात शोभेसाठी उपयोग होतो. अशी विविध झाडांची विशिष्ट तंत्राने बोन्साय कलाकृती तयार करून चांगला व्यवसाय करता येऊ शकतो.अलीकडील काळात अनेक ठिकाणी विशेषतः दुकाने, कार्यालये, कॉर्पोरेट कंपन्या या ठिकाणी शोभेची झाडे भाड्याने देण्याचा कल चांगलाच जोर धरु लागला आहे. अशी भाड्याची झाडे १५ ते ३० दिवसाच्या अंतराने बदलून त्याठिकाणी दुसरी शोभेची झाडे ठेवायची असतात. या व्यवसायाकडे आजही फारशा गांभीर्याने पाहिले जात नाही. कार्यालय आणि मोठ्या बंगल्यांमध्ये दर महिन्याच्या दराने फुलदाण्या २ ते ५ दिवसांनी सजविण्याचा करार करता येऊ शकतो. फुलांचे प्रकार आणि सजविण्याचा कालावधी यावर दर निश्चित करता येऊ शकतात.

आपल्याकडे अनेक शेतकरी सुटी फुले विकतात; परंतु सुटी फुले विकण्यापेक्षा फुलांपासून, हार, तुरे, गुच्छ, माळा, वेण्या, वाळलेली फुले इत्यादी विविध आभुषणे तयार करून त्यापासून मूल्यवृद्धी करून अधिक फायदा मिळविता येऊ शकतो.

आज औद्योगिक परिसर, रस्ते, मोठ्या शहरातील नवीन वसाहती अशा ठिकाणी लॅण्डस्केपिंगची मागणी वाढत आहे. शोभेच्या आणि फुलांच्या झाडांची चांगली माहिती असणाऱ्यांना लॅण्डस्केपिंगची कामे करता येऊ शकतात किंवा लँण्डस्केपिंगची देखभाल हे कार्यही विशिष्ट आर्थिक करार करून राबविता येऊ शकते. फुलशेतीबाबत आज मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांमध्ये जागृती होण्याची गरज आहे. १९९१-९२ मधील देशाची फुलांची निर्यात १४ कोटी रुपये होती, २०११-१२ मध्ये ही निर्यात तब्बल ३६५ कोटींवर पोचली. गेल्या चार वर्षांमध्ये यामध्ये आणखी वाढ झाली आहे. येत्या काळात देशात आणि विदेशात फुलांची मागणी वाढतच जाणार असल्याने या शेतीबाबत गांभीर्याने विचार व्हायला हवा.

◆◆◆

कीडनियंत्रणाच्या विविध पद्धती

किड नियंत्रण करतांना सर्वांच्या डोळ्यापुढे रासायनिक किटकनाशकांद्वारे किड नियंत्रणाचे चित्र उभे राहते. परंतु यापेक्षा वेगळ्या अशा किड नियंत्रणाच्या पध्दती आहेत, त्यावरही गांभीर्याने विचार व्हायला हवा. राहुरीच्या कृषी विद्यापीठाने त्याबाबत माहिती उपलब्ध केली आहे. मशागतीच्या पध्दतीमध्ये विविध कामाच्या माध्यमातून किडीच्या व रोगांच्या जीवनक्रमात अडथळा निर्माण होतो.

कोरडवाहू कपाशी क्षेत्रात ह्या पध्दतीच्या उभ्या पीकांत कोळपणीच्या वापराने किड नियंत्रणात मदत होते. नांगरणी,झाडांना भर देणे, पेरणीतील अंतर झाडांची योग्य सख्या पक्षी बसण्याची मचान, पेरणीच्या वेळेत बदल, पाणी व्यवस्थापन, पीकांची फेरपालट व आंतरपिके पध्दतीचा वापर इ. च्या वेळेवर वापर करून किडीचा प्रादुर्भाव होत नाही. पीकामध्ये व बांधावर स्वच्छता ठेवणे, कीड प्रतिबंधक जातीचा वापर करणे व शिफारशीनुसार योग्य प्रमाणात खते देणे. इ.बाबी काळजी पूर्वक केल्यास किडीचा प्रादुर्भाव होत नाही. कपाशीच्या लागवडीत राळा, कडेने मक्याची लागवड किंवा मूग व तुरीचे आंतरपिके म्हणून अंतर्भाव केल्यास शेतामध्ये मित्र किटकांची संख्या वाढून बोंडअळीचे अंडी, अळ्या इ. चे नैसर्गिक नियंत्रण होते. तुरीमध्ये ज्वारीचा अंतर्भाव केल्यास पक्षांना बसण्यासाठी मचान म्हणून उपयोग होवून पक्षी तुरीच्या पिकावरील अळ्या वेचून खातात.

भौतिक कीड नियंत्रण ही कीड नियंत्रणाची ही पारंपारिक पध्दत असून त्यात भौतिक घटकांचा वापर करून कीडींना प्रतिकूल वातावरणात आणून नियंत्रित केले जाते. धान्याच्या साठवणूकीमधील सर्वात जुनी व प्रभावी पध्दतीमध्ये धान्य कडक उन्हात वाळवून त्यातील ओलावा ८ ते ९ टक्केच्या खाली राखून किडींपासून धान्याचे संरक्षण करतात. किडींपासून धान्याचे संरक्षण करतात.

वातावरणातील तापमान वाढल्याने कीडींचे नियंत्रण प्रभावी होते. दुसरा पर्याय आहे कामगंध सापळ्यांचा. बोंडअळी इ.किडींच्या मादी लिंगाच्या प्रबोधनाने नर आकर्षित होऊन सापळ्यात अडकतात. याखेरीज प्रकाश सापळेही प्रभावी ठरतात.

कीटक प्रकाशाकडे आकर्षित होऊन सापळ्यात अडकून मरतात. पांढरी माशी, तुडतुडे यांसारखे काही किटक रंगीत सापळ्यामध्ये आकर्षित होवून अडकतात. तसेच रासायनिक औषधाचा सापळाही उपयोगी ठरतो. फळमाशीसाठी रक्षक नावाच्या सापळ्यात मिथील युज्येनॉल सारखे रसायन ठेवन फळमाशीचे नियंव्ण करता येते.

◆◆◆

टोमॅटोच्या झाडांना आधार

टोमॅटोची लागवड केल्यानंतर साधारणपणे १ ते १.५ महिन्यानंतर झाडांवर फळे वाढू लागल्यानंतर वजनामुळे झाडाच्या फांद्या जमिनीला टेकतात, काही फळांचा जमिनीशी संपर्क येतो. त्यामुळे झाडांवर किडी आणि रोगांचा प्रादुर्भाव होतो. फळे खराब होतात, वरच्या बाजूंची फळे उघडी पडतात. यासाठी वेळीच झाडांना आधार देणे गरजेचे आहे. यासाठी टोमॅटोच्या झाडांना आधार देण्याची स्वस्त पद्धत सूचविली आहे.

सध्या मोठ्या प्रमाणात वापरात असलेली तारा आणि बांबू या पद्धतीत सरीच्या दोन्ही बाजूला १५० ते १८० से.मी. उंचीचे जाड बांबू अथवा लाकडाचे डांब तिरपे रोवावेत. अशा ६० से.मी. लांबीच्या तुकड्याचे एक टोक घट्ट आवळून बांधावे आणि तो दगड डांबापासून ३० से.मी. अंतरावर खोल खड्डा घेवून घट्ट गाडावा. नंतर प्रत्येक वाफ्याच्या आडव्या वंरब्यावर प्रत्येक सरीवर १८० से.मी. उंचीचा एक बांबू रोवावा आणि १४ गेज जाडीची जी. आय,. तार कडेच्या डांबाला बांधावी. अशाप्रकारे झाडांच्या उंचीनुसार तारा बांधाव्यात. ह्या तारांना झाडांच्या फांद्या जशा वाढतील त्याप्रमाणे सुतळीने बांधून घ्याव्यात.

◆◆◆

शेणातून सोने!

गोबर विकत घेण्याचा आणि सुमारे तीन हजारांहून अधिक केंद्रांमध्ये त्यावर प्रक्रिया करून कंपोस्ट खतनिर्मिती तसेच वर्मी कल्चर प्रकल्प उभारण्याचा निर्णय छत्तीसगड सरकारने घेतला आहे. त्याचबरोबर गोबर गॅस संयंत्रे, दिवाळीसाठी दिवे तयार करणे आणि अंत्यसंस्कारांसाठी शेण्यांचा वापर केला जाणार आहे. ही योजना यशस्वी झाल्यास ग्राम स्वावलंबन आणि ऊर्जासुरक्षेच्या दृष्टीने हे एक मोठे उदाहरण ठरेल. रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे शेतजमिनीचा पोत बिघडत असून, त्यापासून बचावासाठी जुन्या परंपरांना उजाळा देणे निश्चितच सुखद आहे. भारतात पूर्वी सोन्याचा धूर निघत होता, असे आपण म्हणतो तेव्हा आपल्या देशात भरपूर सोनेनाणे होते असा गैरसमज आपण करून घेतो. आपल्याकडील शेतजमीन आणि गुरेढोरे हेच आपले खरे सोने होते. हे सोने आजही मोठ्या प्रमाणात देशाच्या कानाकोपऱ्यात विखुरलेले आहे. परंतु ते चुलीत जाळले जात असून, शेतीच्या नव्या प्रयोगांमुळे जमीन उजाड होत चालली आहे. न्यूझीलंडसारख्या विकसित देशातील मोठ्या लोकसंख्येचे पालनपोषण एकट्या पशुपालनातून होते. तेथील लोक दूध आणि दुग्धजन्य पदार्थांचा व्यवसाय करतात. चाळीस वर्षांपासून तेथे जैविक शेतीचा विकास सुरू आहे. गायीच्या शिंगाची जैविक शेतीत महत्त्वाची भूमिका असते, असे तेथील तज्ज्ञांना दिसून आले आहे. सप्टेंबर महिन्यात एका खोल खड्ड्यात गायीचे शेण भरून त्यात गायीच्या शिंगाचा एक तुकडा ठेवला जातो. गायीच्या शिंगापासून तयार झालेली माती सामान्य मातीपेक्षा १५ पट तर गांडुळाने तयार केलेल्या मातीपेक्षा दुप्पट सुपीक असते. हे कम्पोस्ट पाण्यात मिसळून सूर्योदयापूर्वी शेतात त्याचा शिडकावा केल्यास पिके अधिक पौष्टिक होतात. जमिनीची उत्पादकता वाढते आणि कीटकनाशकांचा वापर करण्याची गरज उरत नाही.

भारतात गायीगुरांची संख्या सुमारे तीस कोटी आहे. त्यांच्यापासून दररोज सुमारे ३० लाख टन शेण मिळते. त्यातील तीस टक्के शेण्यांच्या स्वरूपात इंधन म्हणून वापरले जाते. दुसरीकडे ब्रिटनसारख्या देशात गोबर गॅस संयंत्रांच्या माध्यमातून दरवर्षी सोळा लाख युनिट विजेचे उत्पादन होते. चीनमध्ये दीड कोटी कुटुंबे घरगुती विजेसाठी गोबर गॅसवर अवलंबून आहेत. आपल्याकडे शेणाचा योग्य वापर झाल्यास दरवर्षी सहा कोटी टन लाकूड आणि साडेतीन कोटी टन कोळसा आपण वाचवू शकतो. देशात शेणासंदर्भात काही नवे प्रयोगही सुरू आहेत. लखनौच्या बायोवेद संस्थेने शेणापासून कुंड्या, कचरा कुंड्या, डासांचे निर्मूलन करणारी अगरबत्ती, जैविक रसायन, मेणबत्त्या आणि अगरबत्ती स्टँड एवढेच नव्हे तर मानचिन्हेही तयार केली आहेत. उत्तराखंडच्या काशीपूर येथे शेणापासून टाइल्स तयार करण्यात आल्या असून, त्या सुंदर तर दिसतातच; शिवाय खोलीत एअरकंडिशनरचे काम करतात. जयपूरच्या कुमारप्पा नॅशनल हँडमेड पेपर इन्स्टिट्यूटमध्ये तयार केले जाणारे कागद इतके मजबूत आहेत की, त्यापासून कॅरीबॅग तयार केल्या जात आहेत. आयआयटी, दिल्लीने तर शेणापासून गोवऱ्या तयार करण्याचे यंत्र तयार केले असून, अंत्यसंस्कारासाठी त्या वापरल्यामुळे लाकडाचे ज्वलन खूपच कमी झाले आहे. काही वर्षांपूर्वी भारतात गोबर निर्यात करण्याची योजना हॉलंडमधील एका कंपनीने तयार केली होती, तेव्हा मोठा वाद झाला होता. १९७६ मध्ये राष्ट्रीय कृषी आयोगाच्या अहवालात म्हटले होते की, शेणाचा चुलीत जळण म्हणून वापर करणे हा गुन्हा आहे. परंतु शेणाचा व्यावहारिक उपयोग करणाऱ्या गोबर गॅस संयंत्रांची सद्यःस्थिती मात्र चांगली नाही. उद्दिष्टाच्या १० टक्के संयंत्रांचीही उभारणी होऊ शकलेली नाही आणि सरकारी अनुदान लाटण्याव्यतिरिक्त गोबर गॅस संयंत्र मोहिमेचा फारसा उपयोग झाला नाही.

तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार, भारतात गोबर गॅसच्या मदतीने २००० मेगावॉट वीजनिर्मिती करणे शक्य आहे. शेण्यांच्या सहाय्याने चुलीवर स्वयंपाक करण्यास खूपच कमी वेळ लागतो. शेणाचा वापर शेतात केल्यास तेही फायदेशीर ठरते. त्यामुळे महागड्या रासायनिक खतांवरील खर्च कमी होतो. जमिनीची ताकद वाढते आणि पीकही अधिक शुद्ध असते. गोबर गॅस संयंत्राचा स्वयंपाकघरात मोठ्या खुबीने वापर करता येतो. त्यातून निघणारा कचरा हे उत्तम खत आहे. या पार्श्वभूमीवर, शेतकऱ्यांकडून २५०० रुपये प्रतिक्विंटल दराने तांदळाची खरेदी करण्याच्या निर्णयापाठोपाठ शेतकऱ्यांकडून गोबर खरेदी करण्याची छत्तीसगड सरकारची योजना महत्त्वपूर्ण ठरते. गोबर किती दराने विकत घेतले जाईल आणि खरेदीची प्रक्रिया कशी असेल, हे अद्याप ठरलेले नाही. परंतु अशा प्रकारची देशातील ही पहिलीच योजना ठरली आहे. भूपेश बघेल सरकारने सत्तेवर येताच 'नरवा गरवा घुरवा बाडी' हा बहुचर्चित कार्यक्रम सुरू केला. गावागावात शेणाची संकलन केंद्रे तयार करणे हा याच योजनेचा भाग आहे. सुमारे २२०० गावांमध्ये अशी केंद्रे सुरू झाली आहेत तर सुमारे २८०० गावांमध्ये त्यासाठीची प्रक्रिया सुरू आहे. ज्याअर्थी शेणापासून खतनिर्मितीची योजना सरकारने तयार केली आहे, त्याअर्थी त्याच्या आर्थिक बाजूचा सरकारने निश्चितच विचार केला असेल. छत्तीसगडमध्ये पाळल्या जाणाऱ्या देशी गायी सामान्यतः दूध कमी देतात; परंतु शेणाची निर्मिती मोठ्या प्रमाणावर होते. या गायींची देखभाल करण्याचा खर्च कमी असतो. अशा स्थितीत गोबर विकत घेण्याच्या योजनेमुळे गावोगावच्या शेतकऱ्यांना उत्पन्नाचा नवा स्रोत उपलब्ध होणार आहे.

◆◆◆

तिरुपती बालाजी मंदिरातील सर्व कर्मचारी हिंदू असावेत

नवनियुक्त TTD अध्यक्षांचे मोठे विधान

✔ हैद्राबाद/प्रतिनिधी

आंध्र प्रदेशातील जगप्रसिद्ध बालाजी मंदिरातील प्रसादात भेसळ आढळल्याची घटना काही दिवसांपूर्वी उघडकीस आली होती. तेव्हापासून बालाजी मंदिर कुठल्या ना कुठल्या कारणामुळे चर्चेत आहे. आता पुन्हा एकदा बालाजी मंदिर चर्चेत आले आहे. याचे कारण, तिरुमला तिरुपती देवस्थानम (TTD) बोर्डाचे नवे अध्यक्ष बीआर नायडू आहेत. त्यांनी गुरुवारी एक मोठे विधान केले आहे.

भगवान श्री व्यंकटेश्वराचे निवासस्थान असलेल्या तिरुमला येथे काम करणारे सर्व कर्मचारी हिंदू समाजातील असावेत, असे टीटीडी बोर्डाचे अध्यक्ष बी. आर. नायडू यांनी म्हटले आहे. तिरुमला येथे काम करणाऱ्या इतर धर्माच्या कर्मचाऱ्यांबाबत काय निर्णय घ्यावा, याविषयी सीएम चंद्राबाबू नायडू यांच्या नेतृत्वाखालील आंध्र प्रदेश सरकारशी बोलणार असल्याचेही नायडू यांनी सांगितले आहे.

ही जबाबदारी मला मिळाली हे माझे भाग्य आहे : नायडू

तिरुमला तिरुपती देवस्थानम् बोर्डाच्या अध्यक्षपदी आपली नियुक्ती झाली हे आपले भाग्यच असल्याचे त्यांनी म्हटले आहे. ही मोठी जबाबदारी दिल्याबद्दल बी. आर. नायडू यांनी आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांचे आभार मानले आहेत. तसेच, त्यांनी आधीच्या जगन मोहन रेड्डी सरकारवर हल्लाबोल केला.

नायडू म्हणाले की, 'वायएसआर काँग्रेस सरकारच्या काळात तिरुमलामध्ये अनेक अनियमितता झाल्या होत्या. तिरुमला तिरुपती मंदिराचे पावित्र्य राखले गेले पाहिजे, यावर त्यांनी जोर दिला आहे.'

दिवाळीच्या पहाटे मशालोत्सवाने उजळला सज्जनगड

✔ सातारा/प्रतिनिधी

फटाक्यांची आतषबाजी, हलगी-तुतारीचा निनाद आणि धगधगत्या शेकडो मशालींनी जणू काही अवघा आसमंतच उजळून निघाला होता. या वातावरणात दिवाळीच्या पहिल्या पहाटे सज्जनगडावर मशालोत्सव साजरा करण्यात आला. 'छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज की जय' या जयघोषात शेकडो धगधगत्या मशालींनी किल्ले सज्जनगडावर लख्ख प्रकाश पडला होता.

दुर्गनाद प्रतिष्ठानच्यावतीने आयोजित करण्यात आलेला मशालोत्सव गुरुवारी पहाटे साडेतीन वाजता किल्ले सज्जनगड येथे सुरू झाला. यावेळी सातारा जिल्ह्यातूनच नव्हे तर राज्यातून शेकडो शिवसमर्थ भक्त सज्जनगडावर दाखल झाले होते. आपला सज्जनगड आपलीच जबाबदारी, एक दिवा शिवसमर्थ चरणी या उपक्रमांतर्गत किल्ले सज्जनगड संवर्धन समूह, दुर्गनाद प्रतिष्ठानच्यावतीने हा उपक्रम आयोजित करण्यात येतो. पहाटे साडेतीन वाजता भव्य मिरवणुकीस सुरुवात करण्यात आली.

सज्जनगडावर पालखी दाखल झाल्यावर मिरवणूक अंगलाई देवी मंदिर येथे प्रदक्षिणा घालत धाब्याच्या मारुतीकडे दाखल झाली. यावेळी फटाक्यांची आतषबाजी असा हा भव्य दिव्य सोहळा पाहण्यासाठी परळी पंचक्रोशीतील युवक दाखल झाले होते. पालखीची मिरवणूक धाब्याचा मारुती मंदिर या ठिकाणी आल्यावर या ठिकाणी चित्तथरारक असे आगीचे साहसी खेळ आयोजित करण्यात आले होते. अतित येथील मावळा प्रतिष्ठानतर्फे मर्दानी खेळ संपन्न झाल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिकृती समोर ध्येयमंत्र खड्या आवाजात म्हणण्यात आला.

'फुकट'च्या फौजदाराच्या चौकशीचे आदेश

✔ मुंबई/प्रतिनिधी

ठाण्यातील कासारवडवली पोलीस ठाण्यात आणि तेथील काही अधिकाऱ्यांनी पुरवठादाराला पैसे न देताच वातानुकूलन यंत्र, चित्रवाणी संच, संगणक, प्रिंटर आणि वॉटर कूलर यासारख्या महागड्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर सुरू असल्याचे समोर आले आहे.

या प्रकारावर मुंबई उच्च न्यायालयाने आश्चर्य व्यक्त केले असून अधिकाऱ्यांची चौकशी करण्याचे आदेश राज्याच्या पोलीस महासंचालकांना दिले आहेत. चौकशीसाठी गुन्हे अन्वेषण विभागातील पोलीस उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करून तीन महिन्यांत अहवाल सादर करण्याचे आदेशही न्यायालयाने दिले.

परिचारिका अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला पुन्हा मुदतवाढ

३० नोव्हेंबरपर्यंत घेता येणार प्रवेश

✔ **मुंबई** : भारतीय परिचर्या परिषदेने परिचारिकाविषयक विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला पुन्हा मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. प्रवेश प्रक्रियेसाठी ३० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याचे परिषदेने जाहीर केले आहे. त्यानुसार बीएस्सी नर्सिंग, एम. एस्सी. नर्सिंग, सहाय्यक परिचारिका प्रसाविका (एएनएम), सामान्य परिचर्या व प्रसाविका (जीएनएम), पदवीपूर्व सामान्य नर्सिंग (पीबीबीएस्सी नर्सिंग), पोस्ट बेसिक डिप्लोमा आणि क्रिटिकल केअरमधील परिचारिका अभ्यासक्रम (एनपीसीसी) आदींसाठी ३० नोव्हेंबरपर्यंत प्रवेश घेता येणार आहे.

छातीत दुखू लागल्याने आंबेडकर रुग्णालयात

✔ मुंबई/प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांची प्रकृती बिघडली असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. वंचित बहुजन आघाडीने यासंदर्भात अधिकृत पत्रक काढत माहिती दिली. गुरुवारी, ३१ ऑक्टोबरला पहाटे पुण्यातील रुग्णालयात दाखल करण्यात आले.

प्रकाश आंबेडकरांच्या प्रकृतीबाबत वंचितच्या अधिकृत एक्स खात्यावरून माहिती देण्यात आली. बाळासाहेब आंबेडकर यांच्या छातीत दुखू लागल्याने गुरुवारी पहाटे ३१ ऑक्टोबरला पुण्यातील रुग्णालयात दाखल करण्यात आले. बाळासाहेब आंबेडकर यांच्या हृदयात रक्ताची गुठळी झाल्यामुळे त्यांच्यावर आयसीयूमध्ये उपचार सुरू आहेत. आंबेडकर कुटुंब यावेळी कोणत्याही प्रश्नांची उत्तरे देणार नाहीत. त्यामुळे आपणास विनंती आहे की कुटुंबाच्या विनंतीचा आदर करावा. कारण ते कठीण परिस्थितीला सामोरे जात आहेत, असं पोस्टमध्ये म्हटलं आहे.

बरड येथे भीषण अपघातात तीन ठार, गाडीचा चक्काचूर

✔ फलटण/प्रतिनिधी

पंढरपूर रस्त्यावर बरड ता. फलटण गावाच्या हद्दीत चार चाकी गाडीचा पहाटे तीन ते चार वाजण्याच्या दरम्यान भीषण अपघात झाला. या अपघातात तिघा जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

घटनास्थळावरून मिळालेली माहिती अशी, विजापूर (कर्नाटक) हून पाडेगाव येथील भैरवनाथ ट्रक गॅरेजचे मालक सागर चौरे (वय ३४ रा. पाडेगाव ता खंडाळा) चालक निलेश शिर्के (रा. खटाव) व भाऊसो जमदाडे (रा खेड ता खंडाळा) हे तिघेजण चाकी क्रमांक एच ५३ ए ०५१४ मधून फलटणकडे येत होते.

पहाटे ३ ते ४ वाजण्याच्या सुमारास बरडहून अर्धा किलोमीटर पुढे आल्यानंतर अज्ञात वाहनाच्या धडकेत चार चाकी गाडीचा अपघात झाला. या अपघातामध्ये गाडीचा अक्षरशः चक्काचूर झाला. यामधील जखमींना स्थानिकांच्या मदतीने बाहेर काढले व उपचारासाठी पाठवले परंतु तिघा प्रवाशांना डॉक्टरांनी मृत घोषित केले.

ऐन दिवाळीत गावावर शोककळा

ऐन दिवाळीच्या दिवशी तिघांच्याही मृत्यूमुळे पाडेगाव खटाव व खेड या गावावर शोककळा पसरली आहे. हा भीषण अपघात नेमका कसा झाला याबाबतचा तपास पोलिसांकडून शोध सुरू आहे. पोलीस निरीक्षक सुनील महाडीक यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन वाहतूक सुरळीत केली. या घटनेचा अधिक तपास सुरू आहे.

भारतीय सैन्याबरोबर पंतप्रधान मोदींची दिवाळी

✔ जम्मूकाश्मीर/प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२४ मध्ये गुजरातमधील कच्छ जिल्ह्यात भारत-पाकिस्तान सीमेजवळ सीमा सुरक्षा दल (BSF), लष्कर, नौदल आणि हवाई दलाच्या जवानांसोबत दिवाळी साजरी केली.

यावेळी त्यांनी जवानांना मिठाई भरवून त्यांच्याशी संवाद साधला. पंतप्रधान मोदींनी सलग ११ वर्षांपासून या परंपरेचे पालन करत आले आहेत.

पंतप्रधान झाल्यापासून त्यांनी प्रत्येक वर्षी सैनिकांसोबत दिवाळी साजरी केली आहे. २०१४ मध्ये पंतप्रधान बनल्यानंतर मोदींनी पहिल्यांदा सियाचीनमध्ये तैनात असलेल्या सैनिकांसोबत दिवाळी साजरी केली होती. त्यानंतरच्या वर्षांत त्यांनी विविध ठिकाणी, जसे की जम्मू-काश्मीर, कारगिल, राजस्थान आणि हिमाचल प्रदेश येथेही सैनिकांसोबत दिवाळी साजरी केली आहे. या परंपरेचा उद्देश म्हणजे भारतीय जवानांच्या मनोबलाला उंचावणे आणि त्यांच्या बलिदानाचे कौतुक करणे असल्याचे मोदी नेहमी सांगतात.

कच्छमध्ये जवानांना संबोधित करताना मोदींनी त्यांच्या शौर्याचे कौतुक केले आणि देशाच्या सुरक्षेसाठी त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. त्यांनी म्हटले की, जेव्हा जग तुमच्याकडे पाहते तेव्हा ते भारताचे सामर्थ्य पाहते. याशिवाय, त्यांनी भारतीय संरक्षण उद्योगाच्या वाढत्या क्षमतांचा उल्लेख केला, ज्यामुळे भारत आता अनेक देशांना संरक्षण उपकरणे निर्यात करत आहे.

जवानांना भरवले पेढे, साधला संवाद

अति पावसामुळे कापूस उत्पादनात घट

✔ मुंबई/प्रतिनिधी

अतिवृष्टी, चक्रीवादळामुळे गुजरातमध्ये झालेले नुकसान, परतीच्या आणि बिगर मोसमी पावसामुळे उत्तर महाराष्ट्रात झालेले नुकसान आणि आता ईशान्य मोसमी पावसामुळे दक्षिण कर्नाटकात होत असलेल्या नुकसानीमुळे देशाच्या कापूस उत्पादनात यंदा सुमारे ७.२७ टक्क्यांनी घट होऊन, ३१७.९५ लाख गाठी (एक गाठ - १७० किलो) कापूस उत्पादन होईल, असा अंदाज सीएआयने व्यक्त केला आहे.

बँक कर्मचाऱ्यांचा संप स्थगित

✔ मुंबई/प्रतिनिधी

राज्य सरकारने लाडकी बहीण योजनेवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची सुरक्षा वाढवण्याचे आश्वासन दिल्यानंतर बँक कर्मचाऱ्यांनी महाराष्ट्रात १६ नोव्हेंबरचा नियोजित संप स्थगित करत असल्याचे बुधवारी जाहीर केले. राज्याच्या निवडणुकीपूर्वी राज्यातील महायुती सुरू केलेली महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' राबवताना बँक कर्मचाऱ्यांवर हल्ले होऊ लागल्याने बँक कर्मचाऱ्यांच्या मध्यवर्ती संघटनांचा मंच 'युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्स (यूएफबीयू)'ने संपावर जाण्याचा इशारा दिला होता.

या प्रकाराचा निषेध म्हणून २१ ऑक्टोबरपासून विविध पातळ्यांवर बँक कर्मचाऱ्यांनी आंदोलनही सुरू केले होते. दि. २५ ऑक्टोबर रोजी कर्मचाऱ्यांच्या धरणे आंदोलनानंतर बँक संघटनांच्या प्रतिनिधींनी महिला व बालकल्याण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेतली.

✔ सांगली/प्रतिनिधी

सांगलीत व्यापाऱ्याला सव्वादोन कोटी रुपयांना गंडा

कोठडीची धमकी देत सांगलीतील एका व्यापाऱ्याला सव्वादोन कोटी रुपयांना भामट्यांनी गंडा घातल्याचा प्रकार समोर आला आहे.

या प्रकरणी भामट्याविरुद्ध सांगली ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत माहिती अशी, अभिनंदन सुभाष सुलाखे यांना अनोळखी नंबरच्या भ्रमणध्वनीवरून २६ मे ते १२ जून २०२४ या कालावधीत दोघांनी संपर्क साधला.

यावेळी दोघांनी तुम्ही वापरत असलेला मोबाईल क्रमांक पुढील काही तासांत बंद होणार आहे. तुमचे आधारकार्ड ड्रग्ज व मनी लॉंड्रिंगमध्ये सापडले आहे. हा फार मोठा गुन्हा असून यामध्ये अटक होऊन तुरुंगात जावे लागेल. आपली मालमत्ता जप्त होऊ शकते, अशी धमकी देत हे प्रकरण मिटविण्यासाठी २ कोटी २५ लाख २ हजार १३३ रुपये उकळले. हे पैसे आयसीआयसी बँकेच्या धामणी शाखेतून वर्ग करण्यात आले. या प्रकरणी शर्मा याच्यासह दोघां अनोळखींविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुख्यमंत्र्यांना दणका

आरोग्य विभागातील ६०० नियुक्त्यांना स्थगिती
मॅटच्या प्राधिकरणाचे ताशेरे

✔ मुंबई/प्रतिनिधी

मुख्यमंत्र्यांनी सार्वजनिक आरोग्य विभागात दिलेल्या २९० नियुक्त्या व पुढील प्रस्तावित ३१० नियुक्त्यांना महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाचे औरंगाबादचे न्यायिक सदस्य न्या. व्ही. के. जाधव यांनी अंतरिम स्थगिती दिली आहे. सहाशे उमेदवारांनी नियुक्त्यांसाठी शासन प्रमाणित नसलेला अभ्यासक्रम व संस्थेचे प्रमाणपत्र जोडले होते.

सहानुभूतीपूर्वक विचार करून नियुक्त्या देण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले होते. या प्रकरणात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ज्या प्रकारे नियुक्ती प्रकरणात आदेश दिले आहेत ते कायद्याला धरून नाहीत. त्यांना नियुक्ती प्रकरणात अशा पद्धतीने हस्तक्षेप करण्याचे अधिकार नाहीत, असे ताशेरे न्यायालयाने मारले आहेत. याविरोधात प्रक्रियेतील अठरा उमेदवारांनी मॅटमध्ये धाव घेतली होती.

जाहिरातीच्या अनुषंगाने आरोग्य पर्यवेक्षक, निरीक्षक, बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी आदी पदांसाठी स्वच्छता (पान ८ वर) (पान १ वरून) इन्स्पेक्टर प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक केले होते. संबंधित प्रमाणपत्र मान्यताप्राप्त संस्थेचे नसल्याचे पडताळणीत सिद्ध झाले होते. सहा अधिकाऱ्यांच्या समितीने ही बाब निदर्शनास आणली होती.

आरोग्य विभागातील पदासाठी जोडलेले प्रमाणपत्र विचारात घेतले जाणार नसल्याचे स्पष्ट केल्यानंतर मुख्यमंत्री यांनी १० ऑक्टोबर २०२४ रोजी निर्देश देत आदेश काढले. उमेदवारांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली. सहानुभूतीपूर्वक विचार करावा, असे सांगत नियुक्तीचे आदेश काढले. यास ॲड. सिद्धेश्वर ठोंबरे यांच्या मार्फत आव्हान दिल्यानंतर संबंधित प्रक्रियेला स्थगिती देत नियुक्त्या स्थगित करण्याचे अंतरिम आदेश देण्यात आले. पुढील सुनावणी २६ नोव्हेंबर रोजी हाणार आहे.

बॉम्ब असल्याच्या अफवेने पुणे विमानतळावर पुन्हा खळबळ

✔ पुणे/प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून पुणे विमानतळावरून उड्डाण करणाऱ्या तसेच पुणे विमानतळावर येणाऱ्या देश-परदेशातील विमानांमध्ये बॉम्ब असल्याचा संदेश समाज माध्यमांद्वारे येत असल्याचा प्रतिकूल परिणाम विमान वाहतुकीवर होत आहे. अशाच प्रकारे विस्तारा विमान कंपनीची दिल्ली ते पुणे फ्लाईट क्रमांक युके ९९१ मध्ये बॉम्ब असल्याचा संदेश डम अलंजा ६४६ ट्विटर हँडलवरून अज्ञात व्यक्तीने दिला. त्यामुळे पुणे विमानतळावर पुन्हा खळबळ उडाली. याप्रकरणी तपासानंतर ही अफवा असल्याचे निष्पन्न झाले.

याबाबत विमानतळ पोलीस ठाण्यात विजय गणपत नाणेकर (वय ३५, रा. टिंगरेनगर) यांनी अज्ञात ट्विटर हँडल विरोधात तक्रार दाखल केली आहे.

अज्ञात व्यक्तीने 'डम अलंजा ६४६ ट्विटर हँडलवरून आय प्लेरड पाईप बॉम्बस ऑन बोर्ड ऑफ द फॉलोइंग फ्लाइट्स युके' असा संदेश प्रसारित केला. धमकी असलेला मजकूर ट्विट करून विस्तारा कंपनीचे विमान दिल्ली ते पुणे या विमानामधील प्रवासी तसेच विमानतळ परिसरातील नागरिक आणि प्रवाशांमध्ये खोटी माहिती पसरवून भीतीदायक वातावरण निर्माण केले. तसेच त्यांच्या जीवितास तसेच सुरक्षेस धोका निर्माण केला आहे.

याबाबत विमानतळ पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक एन धामणे पुढील तपास करत आहेत.

दागिने चोरी प्रकरणी मोलकरीण ताब्यात

✔ मुंबई: मोलकरणीने घरातील तब्बल पावणेतीन लाख रुपये किमतीच्या हिरे आणि सोन्याच्या दागिन्यांची चोरी केल्याची घटना बुधवारी घाटकोपर परिसरात घडली. पंतनगर पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करून सदर महिलेला ताब्यात घेतले. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

घाटकोपरच्या हिंगवाला लेन परिसरात वास्तव्यास असलेले गौरव बोटारा यांच्या घरात मोलकरणीनेच चोरी केल्याचे निष्पन्न झाले. दिवाळीनिमित्त गौरव यांच्या पत्नीला दागिने घालायचे होते. त्या मंगळवारी कपाटात ठेवलेले दागिने काढण्यासाठी गेल्या असता दागिन्यांचा डब्बाच गायब झाल्याचे निदर्शनास आले. दागिन्यांचा शोध घेतला. मात्र, दागिने कुठेच सापडले नाहीत.

सोलापूर : दिवाळीनिमित्त विविध साहित्य खरेदी करण्यासाठी बाजारपेठेत मोठी गर्दी होत आहे. नवीपेठ परिसरात रोज असे चित्र दिसत आहे. दुसऱ्या छायाचित्रात पणत्यांची खरेदी करताना ग्राहक.

दिवाळीनिमित्त बाजारात चैतन्य

चार दिवसात सोलापूरकरांनी केली कोट्यवधींची खरेदी

सोलापूर/प्रतिनिधी

आनंदाचा, नात्यांचा आणि प्रकाशाचा सण दिवाळीला सुरुवात झाली आहे. वर्षातील सर्वात मोठा सण असल्याने त्याला अनन्य साधारण असे महत्त्व आहे. कपडे, दागिने, ग्राहकोपयोगी वस्तू, सजावटीचे साहित्य, पणत्या, आकाशदिवे, कंदील, रांगोळ्या, फराळ, मिठाई यांची खरेदी नागरिकांनी केली. त्यामुळे शहरात खरेदीचा उत्साह दिसून आला. दिवाळीनिमित्त बाजार पेठेत चार दिवसात कोट्यवधींची खरेदी झाल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

दिवाळी म्हणजे खरेदीचा उत्साह असतो. हाच उत्साह गेल्या आठवडाभरापासून बाजारपेठांमध्ये दिसून येत आहे. दिवाळीच्या खरेदीसाठी यामुळे सहकुटुंब नागरिक घराबाहेर पडत त्यामुळे बाजारपेठांमध्ये गर्दीचा उच्चांक पाहायला मिळाला. शहरातील नवी पेठ, मधला मारूती, बाळीवसे, जोडबसवण्णा चौक, कौंतम चौक, टिळक चौक परिसरात अक्षरक्षः नागरिकांची खरेदीसाठी झुंबड लागली आहे.

सोलापूर : बाजारपेठेत विक्रीला आलेल्या आकर्षक विजेच्या माळा.

आकाश कंदिल, विजेच्या माळांना मागणी

दिवाळी आणि आकाश कंदील एक समीकरणच आहे. घराच्या सजावटीसाठी तो हवाच असतो. तो हटके असावा, अशी अनेकांची इच्छा असते. यंदा बाजारात आकर्षक व नक्षीकाम केलेले विविध आकाश कंदील विक्रीसाठी आले आहेत. त्याचबरोबर सजावटीसाठी आवश्यक विविधरंगी विजेच्या माळा नागरिकांचे लक्ष वेधून घेत होत्या. चमचमणाऱ्या माळांसह सजावटीच्या वस्तुंनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. तसेच त्या खरेदी करण्याचा मोह त्यांना आवरला नाही.

आकाशकंदील, पणत्या, कपडे, इलेट्रॉनिक वस्तू, फर्निचर, सोने यासह विविध वस्तूंच्या खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात नागरिक घराबाहेर पडत आहेत. त्यामुळे बाजारपेठेतील आर्थिक उलाढाल वाढल्याने व्यावसायिकांमध्ये अनांदाचे वातावरण आहे. खरेदीनंतर अनेकांची पावले आवडत्या हॉटेल किंवा रेस्टॉरंटकडे वळत आहेत. संध्याकाळी अनेक हॉटेलमध्ये खवय्यांची गर्दी पहायला मिळत आहे.

विविध प्रकारच्या पणत्या बाजारात

यंदा बाजारात विविध आकाराच्या पणत्या दाखल झाल्या आहेत. यामध्ये मोर, बदक, मासा, पान, स्वस्तिक, दीपमाळ, कासव, कंदील, तुळशी वृंदावन, घर, पाच दीप, सात दीप, कलश अशा विविध प्रकारच्या कलात्मक पणत्या उपलब्ध आहेत. तसेच वॉल हैंगिंग दिवे आणि काचेच्या दिव्यांनाही पसंती मिळत आहे. पाच पाकळी फुलांच्या आकाराच्या पणत्या बाजारात दाखल झाल्या आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा २० टक्के दरवाढ झाली आहे.

सजावटीच्या वस्तूंना मागणी

दिवाळीत पणत्यांना मोठी मागणी असते. त्यामुळे ग्राहक कसबा पेठेतील कुंभार वाड्यासह विविध ठिकाणी खरेदीसाठी आले होते. पणत्या आणि मातीपासून बनविलेल्या अनेक वस्तू बाजारात विक्रीसाठी उपलब्ध आहेत. मातीपासून विविध आकारात बनविलेल्या पणत्या, सजावटीच्या साहित्यांनी बाजारपेठ फुलली आहे. तेथे खरेदीचा उत्साह दिसून येत आहे.

सवलतींचा वर्षाव; भरघोस कॅशबॅक

दुचाकी आणि चारचाकी वाहनांच्या शोरुम्समध्ये गर्दी

सोलापूर : दिवाळीनिमित्त ऑटोमोबाईल क्षेत्रातही दिवाळीच्या निमित्ताने नवचैतन्य संचारले आहे. सर्वच प्रमुख वाहन कंपन्यांनी दिवाळी बाजारपेठ काबिज करण्यासाठी विविध आकर्षक सवलती जाहीर केल्या असून ऑनलाईन व्यावहार करणाऱ्या ग्राहकांसाठी बँकांनी भरघोस कॅशबॅकच्या सवलती दिल्या आहेत. त्यामुळे ग्राहक यासंधीचा फायदा घेण्यासाठी दुचाकी आणि चारचाकी वाहनांच्या शोरुम्समध्ये गर्दी करून आपल्या पसंतीचे वाहन आवडीच्या रंगामध्ये मिळण्यासाठी आतापासूनच बुकींग करताना दिसून येत आहेत. दिवाळीत लक्ष्मीपूजन, पाडवा आणि भाऊबीज या चार मुहूर्तांवर आपली मनपसंत कार किंवा मोटारसायकलच्या बुकिंगसाठी ग्राहकांनी शहरातील वेगवेगळ्या शोरुम्समध्ये गर्दी केली आहे. शहरात दसऱ्याच्या दिवळी जवळपास एक हजारवर चारचाकी आणि दीड ते दोन हजार दुचाकींची विक्री झाली होती. हा अकडा वाढण्याची शक्यता असून दिवाळीत चार दिवसांमध्ये किमान पंधराशेहून अधिक चारचाकी व तीन हजारपर्यंत दुचाकींची विक्री होण्याचा अंदाज वाहनबाजारातील जाणकारांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे वितरक ग्राहकांच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन बुकींग झालेली वाहन तयार करून मागणीनुसार ॲक्सेसरीज करून ठेवण्याच्या प्रयत्नात आहे. दिवाळीच्या मुहूर्तावर अनेकजण आपले नवे वाहन घरी नेण्याच्या तयारीत असून गेल्या १५ दिवसांपासून बुकींग सुरू आहे. काही गाड्या उपलब्ध होत नसल्याने ग्राहक बुकींग करून प्रतिक्षेत आहे. तर अनेकजण अजूनही बुकींग करीत आहेत, असे व्यापाऱ्यांनी सांगितले.

सुलभ कर्जामुळे वाहन खरेदीत वाढ

वाहन खरेदी करण्यासाठी येणारी आर्थिक अडचण दूर करण्यासाठी अर्थसहाय्य करणाऱ्या विविध कंपन्यांचे प्रतिनिधी शोरुममध्ये अवघ्या १० ते १५ मिनिटात ऑनलाईन कर्ज मंजूर करून देतात. त्यामुळे कमीत कमी डाउन पेमेंट आणि जवळापास १०० टक्के कर्ज मिळत असल्याने ग्राहकांकडून आवडती स्कूटर, मोटारसायकलसोबतच चाकचाकी वाहन खरेदीला पसंती मिळत.

सोने ८० हजारांवर; चांदीनेही गाठला लाखांचा टप्पा

दरवाढीनंतरही खरेदीसाठी सोलापूकर सुसाट

सोलापूर : सोने, चांदी, हिरे तसेच दागिनेसारख्या मौल्यवान धातूंच्या किंमती दिवाळीत वाढूनही मागणीमुळे त्यांची विक्री यंदाच्या विक्रमी होण्याचा आशावाद सराफ बाजारातील व्यापाऱ्यांनी व्यक्त केला आहे. सोने ८० हजार रूपये प्रति तोळा असून चांदीने लाखांचा पल्ला ओलांडला आहे. तरीही खरेदी मात्र जोमात सुरू आहे.

सोमवारपासून दिवाळी सुरू झाली आहे. तर मंगळवारी धनत्रयोदशीला रात्रीपर्यंत सराफा दालनांमध्ये खरेदीसाठी गर्दी होती. सोने तसेच चांदीचे दर गेल्या काही दिवसांपासून सातत्याने वाढत असूनही ग्राहकांकडून मागणी आहे.

ग्राहक सोन्याकडे विश्वासार्ह मालमत्ता म्हणून पाहत असून तुलनेने वाढत्या मागणीमुळे चांदीला अधिक लोकप्रियता मिळत आहे. यंदाच्या दिवाळीत देशभरात मौल्यवान धातूच्या किंमती चढ्या राहूनही त्याची खरेदी मात्र वाढू शकते, असे मानले जाते. चांदीने ४० टक्क्यांहून परतावा दिला आहे. तर सोन्याने २३ टक्क्यांसह शेअर बाजारातील प्रमुख निर्देशांकालाही याबाबत मागे टाकले आहे.

सोलापुरात सराफ बाजारात गेल्या दोन दिवसांपासून ग्राहकांची गर्दी वाढत आहे. साडेतीन मुहुर्तांपैकी एक असलेल्या पाडव्यासाठी हजारो ग्राहकांनी सोने आणि चांदी बूक करून ठेवली आहे. सध्या सोलापुरात सोन्याचा भाव जीएसटीसह ८१ हजार ५०० आहे तर चांदीने लाख रूपयांचा पल्ला ओलांडला आहे. तरी ग्राहकांचा उत्साह कमी झालेला नाही.

वर्षभरात सोने ८६ हजारांवर

चांदीचा दर वर्ष-दिड वर्षात १ लाख २५ हजार रुपयांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. मौल्यवान धातूला असलेली औद्योगिक मागणी आणि सुरक्षितता यामुळे खरेदी वाढण्याची शक्यता सराफ व्यापाऱ्यांनी वर्तविली आहे. सोने ८६ हजार रुपयापर्यंत जाईल, असे निरीक्षणही नोंदविण्यात आले आहे.

विधानसभेमुळे कार्यकर्त्यांची दिवाळी जोरात

नेत्यांकडून मागेल तो पुरवठा सुरू

सोलापूर/प्रतिनिधी

विधानसभेची निवडणूक जाहीर होताच काही दिवसांपासून विविध राजकीय पक्षांतील नेते व कार्यकर्त्यांनी पक्षप्रवेशाचा धडाका लावला आहे. गेल्या पाच वर्षांपासून अडगळीत पडलेल्या कार्यकर्त्यांना पुन्हा निवडणूक प्रचारात सक्रिय करण्यासाठी नेत्यांकडून मनधरणी केली जात आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांना निवडणुकीनिमित्त अच्छे दिन आल्याचे चित्र आहे. कार्यकर्त्यांची यंदाची दिवाळी जोरात होणार आहे.

यंदा सोलापूर शहर आणि जिल्ह्यात असणाऱ्या ११ मतदारसंघात अनेक दिग्गजांच्या लढाया होणार आहेत. सर्वच नेत्यांनी आरपारची लढाई समजून तयारी सुरू केली आहे. अनेक मतदारसंघात बहुरंगी लढतीही होणार आहे. भाजप, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना, मनसे, राष्ट्रीय समाज पक्षासह अपक्ष उमेदवार निवडणुकींच्या मैदानात उतरले असल्याने त्यांना कार्यकर्त्यांची मोठी गरज भासणार आहे. त्यामुळे कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंध नसलेली मंडळी निवडणुकींच्या तोंडावर पक्षप्रवेश करीत इकडून तिकडे उड्या मारताना दिसत आहेत. सत्ताधारी पक्षातील आमदारांचा प्रभाव असल्याने त्यांच्या मागे-पुढे करणाऱ्या कार्यकर्त्यांची मोठी गर्दी नेहमी राहते. त्यामुळे प्रामाणिक आणि निष्ठेने काम केलेला कार्यकर्ता मात्र अडगळीत पडला आहे. निवडणुकीपूर्वी नेते कार्यकर्त्यांना विचारत नव्हते; मात्र सध्या आपल्या उमेदवाराच्या विजयासाठी कार्यकर्त्यांची निकडीची गरज भासू लागली आहे. त्या अनुषंगाने शहरासह ग्रामीण भागातील अडगळीतील कार्यकर्त्यांना पुन्हा मानसन्मान देऊन त्यांना निवडणुकीच्या प्रचारात उतरविण्यासाठी सत्ताधाऱ्यांसह सर्वच पक्ष तयारी करत आहेत. कार्यकर्त्यांसह त्यांच्या कुटुंबियांनाही दिवाळीनिमित्त गोंजारले जात आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांची दिवाळी जोरात सुरू आहे.

आर्थिक मदतीसह इतर सुविधांचा पुरवठा

निवडणुकीत विजय मिळविण्यासाठी सक्षम मनुष्यबळाची गरज भासत आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांना आकर्षित करण्यासाठी विविध राजकीय नेते शहरात मोर्चेबांधणी करत आहेत. काही पक्षांकडून कार्यकर्त्यांना आर्थिक मदत, प्रचार साहित्य आणि इतर सुविधा दिल्या जात आहेत.

लक्ष्मीपूजनासाठी झेंडूची विक्री जोरात

सोलापूर : लक्ष्मीपूजना पार्श्वभूमीवर बाजारपेठेत झेंडूच्या फुलांची आवक वाढली आहे. तसेच, मागणीही मोठ्या प्रमाणावर वाढली असून झेंडूच्या फुलांची जोरात विक्री सुरू आहे. फुलांना प्रति किलो १०० ते १२० रुपये असा भाव मिळत असल्याने सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लागली आहे. तर दुसरीकडे, भाव वाढूनही ग्राहकांकडून फुलांची खरेदी जोरदार सुरू असल्याने विक्रेते आनंदून गेल्याचे चित्र दिसत आहे.

दिवाळी सणात लक्ष्मीपूजनाला महत्व आहे. कोणत्याही शुभ कार्याला या दिवशी मुहूर्त केला जातो. त्यामुळे या दिवशी झेंडूच्या फुलाला विशेष मागणी असते. या दिवशी घरांना झेंडूच्या फुलांची तोरणे बांधली जातात. वाहनांना झेंडूचे हार घातले जातात. पुजेसाठी झेंडूची फुले वापरली जातात. त्यामुळे झेंडूच्या फुलांना यादिवशी विशेष मागणी असते. सोलापूरची बाजारपेठ यंदा झेंडूच्या फुलांच्या विक्रीसाठी सजली आहे. शहरातील नवीपेठ, बाळीवेस, मधला मारूती परिसर, सैफूल, विमानतळ, विजापूर रोड आदी भागात झेंडूची फुले प्रति किलो १०० ते १२० प्रति किलो रूपयांनी सुरू आहे. दर यावर्षी २० रुपयांनी वाढले आहेत. झेंडूच्या फुलांची मागणी वाढल्याने बाजारपेठत दर चढले असल्याने चाकरमान्यांचे हाल झाले आहेत.

गेल्या वर्षीच्या तुलनेत भाववाढ

मागील वर्षी झेंडूच्या फुलांचे दर ८० रुपये प्रतिकिलो होतो. ते दर यावर्षी २० ते ३० रुपयांनी वाढले आहेत. झेंडूची फुले अर्धा किलो ६० ते ७५ रुपये तर, पाव किलो झेंडूची फुले ३० रुपये दराने ग्राहकांना खरेदी करावी लागत आहेत. झेंडूच्या फुलांची मागणी वाढल्याने बाजारपेठत दर चढले असल्याने चाकरमान्यांचे हाल झाले आहेत.

दे धक्का!
सुराज्य सोलापूर
शुक्रवार, दि. १ नोव्हेंबर २०२४ । पान ११

मराठा-मुस्लिम-दलित एकत्र

जरांगेंचा पुढचा प्लॅन ठरला!

तीन नोव्हेंबरला मोठी घोषणा

जालना/प्रतिनिधी

मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटीमध्ये मुस्लिम धर्मगुरूं बरोबर दलीत नेत्यांबरोबर महत्वाची बैठक घेतली. या बैठकीत विधानसभा निवडणुकीत रणनिती काय असावी यावर चर्चा करण्यात आली. त्यानुसार आणखी जाती धर्माच्या नेत्यांबरोबर चर्चा केली जाणार आहे अशी माहिती मनोज जरांगे पाटील यांनी दिली आहे. शिवाय या माध्यमातून मराठा मुस्लिम आणि दलित एकत्र आल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत परिवर्तन नक्की होईल असा विश्वास या निमित्ताने त्यांनी व्यक्त केला. त्याच बरोबर येणाऱ्या ३ नोव्हेंबरला समाजाचे कोण उमेदवार असतील याची घोषणा केली जाईल असेही ते म्हणाले. ज्यानंतर बाकीच्यांनी उमेदवारी मागे घ्यायची आहे असेही त्यांनी स्पष्ट केले.

मराठा- मुस्लिम -दलित हे धर्म परिवर्तनासाठी नाही तर सत्ता परिवर्तनासाठी एकत्र आले असल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले. आता परिवर्तन अटळ आहे असा विश्वास त्यांना दाखवला. अनेक मतदार संघात मराठा मुस्लिम आणि दलित हे निर्णायक आहेत. त्यामुळे समाजाचे उमेदवार पडणारच नाहीत असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. हे उमेदवार कोण असतील याची अधिकृत घोषणा आपल ३ नोव्हेंबरला करणार आहोत. लोकशाही मार्गाने हा लढा लढणार असल्याचेही जरांगे म्हणाले. गोर गरिबांची लेकरं निवडणूक लढणार आहेत. त्यामुळे %५ वर्षात जे झालं नाही ते आता होणार आहे असंही त्यांनी सांगितले.

ज्यांनी मराठा समाजाला हिणवलं. त्यांना डिवचलं. त्यांच्यावर अन्याय केला. अशा लोकांना काही झालं तरी मदत करणार नाही हे आमचं ठरलं आहे असेह ही ते म्हणाले. हा लढा स्वाभिमानाचा लढा आहे. त्यामुळेच आम्ही एकत्र आलो आहोत. तीन तारखे पर्यंत आणखी काही समजाचे आणि जातीचे लोक आमच्या बरोबर येणार आहे. त्यांनाही आम्ही सामावून घेणार आहोत. शेवटी हा हक्काचा लढा आहे. आरक्षणाला ना मराठा समाजाने विरोध केला आहे ना मुस्लिम समाजाने केला आहे. आमच्या सर्वांचे लक्ष आता परिवर्तन घडवून आणणे हे आहे. दरम्यान विधानसभेसाठी जे इच्छुक आहेत. त्यांना उमदेवारी अर्ज भरण्याचे आदेश मनोज जरांगे पाटील यांनी दिले होते. त्यानुसार अर्ज दाखलही करण्यात आले आहेत. आत त्यातील अधिकृत उमेदवार कोण याचा निर्णय जरांगे तीन तारखेला घेणार आहेत. त्यानंतर सर्व चित्र स्पष्ट होईल. शिवाय या निवडणुकीचं भवितव्यही या निर्णयावर आहे. जरांगे हे किती उमेदवार आणि कुठे उभे करतात हे जास्त महत्वाचे आहे. त्याचा फटका कोणाला बसणार यावर सर्व गणितं अवलंबून असतील. राज्यात सध्या मविआ विरुद्ध महायुती अशी लढाई आहे. त्यात जरांगे यांनी आपले उमेदवार उतरवल्यास त्याचा फटका कोणाला बसेल याकडे सर्वांचे लक्ष आहे.

विजयाचा जातीय फॉर्म्युला

ज्याचा त्याचा धर्म ज्याच्या त्याच्या जवळ ठेवला पाहिजे. आम्ही हिंदू असूनही आमची गरज फक्त कुटाकुटीसाठी आहे. आरक्षणाला आम्ही सरकारला लागत नाही, आम्ही धर्म परिवर्तन नाही, सत्ता परिवर्तन करण्यासाठी एकत्र आलो आहोत. लिंगायत, बंजारा, धनगर महानुभाव पंथाचे बांधव यांनीही आमच्याकडे यावं, अशी लाट ७५ वर्षात आली नाही, अशी लाट पुन्हा पुढंचे ७५ वर्ष येणार नाही. आमच्यात शिक्कामोर्तब झाले, जिथे मराठा उमेदवार उभे राहतील तिथे दलित मुस्लिम मतदान करणार, जिथे दलित उमेदवार आहे तिथे मराठा मुस्लिम मतदान करणार आणि जिथे मुस्लिम उमेदवार असेल तिथे मराठा आणि दलितांनी ताकदीनं मतदान करावे, असा विजयाचा फॉर्म्युला मनोज जरांगे पाटील यांनी सांगितलाय. तसेच १०० टक्के मतदान करावे, लवकरच आम्ही मराठवाडा पश्चिम महाराष्ट्रात सभा लावणार आहोत, अशीही घोषणा पाटील यांनी केली.

फडणवीसांना पुन्हा केले लक्ष्य

मला राजकारणात कधीही पडायचे नव्हते. पण राजकारणात यावं लागत आहे. राजकारण कसं करायचं हे आता देवेंद्र तात्यांनी मला शिवकवलं आहे. त्यांनी फडणवीसांचा उल्लेख तात्या असा केला. मला राजकारणाच्या वाटेवर नेवू नका असे सांगितले होते. तसे केल्यास मी तुमचा पचका करेन असेही सांगितले होते. पण त्यांनी आम्हाला हलक्यात घेतलं. आता सुपडा साफ करणार म्हणजे करणार. कोणालाही सोडणार नाही असा इशाराच जरांगे यांनी या निमित्ताने दिला. आता मान कापली तरी माघार घेणार नाही असेही ते म्हणाले.

मनोज जरांगे यांनी भाजपला विरोध दर्शवला असला तरी त्यांनी सरकारमधील शिवसेना शिंदे आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीला विरोध दर्शवलेला नाही. त्याच बरोबर त्यांनी मविआलाही समर्थन दिलेले नाही. त्यामुळे ३ नोव्हेंबरला जरांगे काय निर्णय घेतात याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

मराठा, मुस्लिम आणि दलित एकत्र आले

आम्ही धोक्यात आहोत तर मग हे हिंदू का म्हणत नाहीत की गरीब मराठ्यांना आरक्षण द्या म्हणून असेही मनोज जरांगे पाटील म्हणाले. एकमेकांच्या धर्मात हस्तक्षेप करणार नाही. मी कट्टर हिंदू आहे. आम्ही सत्ता परिवर्तन करणार आहोत असेही जरांगे पाटील म्हणाले. मराठा, मुस्लिम आणि दलित एकत्र आले असल्याचे मनोज जरांगे पाटील म्हणाले.

आम्ही लोकशाही मार्गाने पुढे जात आहोत

आम्ही लोकशाही मार्गाने पुढे जात आहोत. कोणीही दादागिरी करणार नाही असेही मनोज जरांगे पाटील म्हणाले. जे नाव सांगेल त्यांनीच उमेदवारी ठेवायची, बाकीच्यांनी अर्ज काढून घ्यायचे असेही मनोज जरांगे म्हणाले. लोकशाही मार्दाने लढा, आपल्या जागा सगळ्या ठिकाणी निवडून येतील असेही मनोज जरांगे पाटील म्हणाले. आपला समाज राजकीय लोकांच्या गुंडगिरीतून बाहेर काढला असल्याचे जरांगे म्हणाले. तुम्ही मराठ्यांना, धनगरांना, मुस्लिमांना, दलितांना काय दिलं आहे असा सवालही मनोज जरांगे यांनी केला. गेल्या %५ वर्षीत वीज पाणी यावरच बोलत आहेत असे जरांगे म्हणाले. अन्याय होऊ न देण्यासाठी ही लढाई आहे. आमची सहनशक्ती संपली आहे. तुमचा सुपडा साफ करणार म्हणजे करणार असे जरांगे म्हणाले.

निवडणुकीआधीच अमित ठाकरे अडचणीत?

मुंबई/प्रतिनिधी

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकींच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत संपली आहे. आता प्रचाराची रणधुमाळी सुरु होईल. राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे हे पहिल्यांदाच निवडणुकीच्या रिंगणात उभे राहिले आहेत. माहिम मतदार संघातून त्यांना पक्षाने उमेदवारी दिली आहे. पण एका कृतीमुळे त्यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. कारण अमित ठाकरेंविरोधात निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. काय आहे हे प्रकरण? सविस्तर जाणून घेऊया.

ठाकरेंच्या शिवसेनेकडून आयोगाकडे तक्रार

विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होताच राज्यात आदर्श आचारसंहिता लागू होते. याचे पालन राजकीय पक्ष, नेत्यांना करावे लागते. दरम्यान अमित ठाकरेंविरोधात आदर्श आचारसंहितेचे उल्लंघनाची तक्रार दाखल करण्यात आले आहे. शिवसेना (उबाठा) पक्षाचे नेते,सचिव अनिल देसाई यांनी राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी चोकलिंगमजी यांची भेट घेतली आणि यासंदर्भात तक्रार दाखल केली. छत्रपती शिवाजी महाराज पार्क,दादर येथे दिपोत्सव साजरा करण्यात आला. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला पक्षाच्या बॅनरखाली दीपोत्सव साजरा करण्यात आला. याला पालिकेतर्फे परवानगी देण्यात आली. ही देण्यात आलेली परवानगी नियमबाह्य असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. तसेच या कार्यक्रमस्थळी मनसेचे स्थानिक माहीम विधानसभेचे उमेदवार अमित राज ठाकरे हे उपस्थित राहिले होते. त्यामुळे या कार्यक्रमाचा संपूर्ण खर्च त्यांच्या निवडणूक खर्चात समाविष्ट करण्यात यावा अशी मागणी पत्रातून करण्यात आली आहे.

धनंजय मुंडे यांच्याकडून शपथपत्रात अखेर पाच अपत्यांचा उल्लेख

परळी : मंत्री धनंजय मुंडे यांना अजित पवारांच्या राष्ट्रवादीने पुन्हा एकदा परळी विधानसभा मतदारसंघातून मैदानात उतरवलं आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्याविरोधात धनंजय मुंडे यांचा सामना असणार आहे. दरम्यान, धनंजय मुंडे यांच्या शपथपत्रातून महत्त्वाची माहिती समोर आली आहे. धनंजय मुंडे यांनी उमेदवारी अर्ज भरताना शपथपत्रात ५ अपत्यांचा उल्लेख केला आहे.

धनंजय मुंडे यांनी शपथपत्रात पाच आपत्यांचा उल्लेख केला आहे. पहिल्यांदाच निवडणूक उमेदवारी अर्ज भरताना दिलेल्या शपथपत्रात धनंजय मुंडे यांनी शिवानी मुंडे आणि सीशिव मुंडे या दोन अपत्यांचा उल्लेख केला आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीच्या वेळी धनंजय मुंडे यांनी जे शपथपत्र दिले होते त्यात या दोन अपत्यांचा उल्लेख नव्हता. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीवेळी दिलेल्या शपथपत्रात धनंजय मुंडे यांनी वैष्णवी धनंजय मुंडे तसेच जानवी धनंजय मुंडे आदीश्री धनंजय मुंडे या तीन अपत्यांचाच उल्लेख होता. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीच्या वेळी दिलेल्या शपथपत्रात मात्र एकूण पाच अपत्यांचा उल्लेख करण्यात आला आहे.

काँग्रेसला दिवसभरात दोन धक्के

फडणवीसांना भावी मुख्यमंत्री म्हणत रवी राजांनी प्रवेश करताच उडवला बार

मुंबई/प्रतिनिधी

काँग्रेस पक्षाचे मुंबईतील ज्येष्ठ नेते रवी राजा यांनी गुरुवारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला. रवी राजा हे मुंबई महानगरपालिकेतील काँग्रेसच्या प्रमुख चेहऱ्यांपैकी एक होते. ते मुंबईतील सायन-कोळीवाडा मतदारसंघातून लढण्यासाठी उत्सुक होते. मात्र, पक्षाने त्यांची दखल न घेतल्याने रवी राजा यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देत भाजपमध्ये प्रवेश केला. भाजपने त्यांच्याकडे संघटनेच्या उपाध्यक्षपदाची सूत्रे दिली आहेत. रवी राजा यांनी मुंबईतील पत्रकार परिषदेत काँग्रेस पक्ष सोडण्यामागील आपली भूमिका स्पष्ट केली. यावेळी रवी राजा यांची एक कृती चर्चेचा विषय ठरली.

रवी राजा यांनी पत्रकार परिषदेत आपल्या भाषणाला सुरुवात करताना देवेंद्र फडणवीस यांचा उल्लेख राज्याचे भावी मुख्यमंत्री असा केला. तेव्हा देवेंद्र फडणवीस यांनी रवी राजा यांना लगेच थांबवत प्रसारमाध्यमांच्या दिशेने पाहत, हे वाक्य सेन्सॉर करा, असे म्हटले. देवेंद्र फडणवीस यांच्या या वक्तव्यावर एकच हशा पिकला.

रवी राजा आणि आमचा संबंध संपला : वर्षा गायकवाड

आता त्यांना भाजपमध्ये कुठले पद दिले त्याच्याबद्दल मला माहीत नाही. रवी राजा आणि आमचा आता संबंध संपला. त्यांनी आता जिथे आहे तिथे राहावं. त्यांना काँग्रेस पक्षाने विरोधी पक्ष नेतेपद दिलं, हे पद हे आमदाराच्या बरोबरीने होतं. मात्र, आता तुम्हाला आमदारकीचे तिकीट मिळत नाही म्हणून तुम्ही पक्ष सोडून जाता. त्यांचे काही मागचे प्रकरण सुद्धा याला कारणीभूत होते. त्यांनी हा निर्णय घेताना या प्रकरणाचा सुद्धा विचार केला असणार, असेही त्यांनी म्हटले.

विधानसभा निवडणुकीमुळे महायुतीचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण, याची सतत चर्चा सुरु आहे. त्यामुळे रवी राजा यांनी देवेंद्र फडणवीस यांचा भावी मुख्यमंत्री, असा केलेला उल्लेख अनेकांचे लक्ष वेधून घेणारा ठरला.

यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. त्यांनी म्हटले की, अतिशय आनंदाची गोष्ट आहे की रवी राजा आमच्यासोबत येत आहेत. मोठा जनसंपर्क आहे. भाजपला त्यांच्या अनुभवाचा फायदा मिळणार आहे. पुढच्या आठवड्यात काँग्रेस मधील आणखी काही प्रवेश भाजपमध्ये होतील. येत्या काळात आणखीनही लोक भाजपात येणार आहेत, वेळ आली की त्यांची नावं जाहीर होतील, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

कोल्हापुरात विद्यमान आमदाराचा शिंदे गटात प्रवेश

कोल्हापूर : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसला आणखी एक मोठा धक्का बसला आहे. मुंबईत काँग्रेसचे जेष्ठ नेते आणि मुंबई महापालिकेचे विरोधी पक्षनेते पद भूषवलेले रवी राजा यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. त्यानंतर काँग्रेसला आणखी एक झटका बसला आहे. काँग्रेसच्या विद्यमान आमदार जयश्री जाधव यांनी काँग्रेसचा हात सोडला आहे. त्यांनी थेट शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. जयश्री जाधव या काँग्रेसचा आमदार चंद्रकांत जाधव यांच्या पत्नी आहेत. चंद्रकांत जाधव यांच्या निधनानंतर जयश्री जाधव यांनी पोटनिवडणुक लढत विजय मिळवला होता. मात्र आताच्या निवडणुकीत काँग्रेसने त्यांना उमेदवारी नाकारली. त्यामुळे नाराज झालेल्या जयश्री जाधव यांनी थेट शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदार संघातून जयश्री यांना उमेदवारी हवी होती.

कोल्हापूर उत्तर हा विधानसभा मतदार संघ शिवसेनेकडे होता. शिवसेनेचे राजेश क्षिरसागर या मतदार संघातून सलग दोन वेळा विजयी झाले होते. मात्र २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या चंद्रकांत जाधव यांनी क्षिरसागर यांचा पराभव केला. शिवसेनेचा मतदार संघ काँग्रेसकडे खेचून आणला. मात्र आमदार झाल्यानंतर चंद्रकांत जाधव यांचे निधन झाले. त्या जागेवर पोटनिवडणूक झाली. या पोटनिवडणुकीत काँग्रेसने चंद्रकांत जाधव यांच्या पत्नी जयश्री जाधव यांना रिंगणात उतरवलं. जयश्री जाधव या पती पेक्षा जास्त मतांनी विजयी होत आमदार झाल्या. यानंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीतूनही जयश्री जाधव यांनी आपल्या कोल्हापूर उत्तर मतदार संघातून शाहू महाराजांना मताधिक्य मिळवून दिले होते.

माजी आमदार मालोजीराजे यांच्या पत्नी मधुरिमाराजे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. त्यांना उमेदवारी दिल्याने जयश्री जाधव या नाराज झाल्या. त्यांनी काँग्रेसकडे आपली नाराजी व्यक्त करत थेट पक्षाच्या सर्व पदांचा राजीनामा दिला.

2020 इलेक्शन

महायुतीत बंडखोरी होणार नाही : देवेंद्र फडणवीस

मुंबई : पुन्हा महायुती सरकार सत्तेत येणार आहे. काही ठिकाणी क्रॉसफॉर्म आले होते. काल मुख्यमंत्र्यांसोबत बैठक झाली. क्रॉसफॉर्म परत होतील. काही ठिकाणी बंडखोरी झाली आहे त्याबाबत देखील रणनीती झाली आहे. पक्षांतर्गत बंडखोरीवरही चर्चा झालीय, त्यांनाही समजावलं जाईल.गोपाळ शेट्टी पक्षाचे प्रामाणिक सैनिक आहेत. त्यांनी नेहमीच पक्षाचा आदेश मानलाय, यावेळी ते मानतील अशी अपेक्षा आहे. माहीमबाबत बोलणी सुरू आहेत, एकत्रित मार्ग काढण्याचा प्रयत्न सुरू आहे. काल मुख्यमंत्री आणि अजित पवारांसोबत बैठक पार पडलीय, क्रॉस फॉर्म जिथं जिथं भरलेत ते परत घेतले जातील. सर्व मतभेद दूर झाल्याचे देवेंद्र फडणवीसांनी सांगितले.

जळगावच्या उद्धव ठाकरेंच्या उमेदवाराला हार्ट अटॅक

जळगाव: चोपडा विधानसभा मतदारसंघातील ठाकरे गटाचे उमेदवार प्रभाकर सोनवणे यांना सकाळी हृदयविकाराचा झटका आल्याची माहिती आहे. त्यांच्यावर एन्जिओप्लास्टि करण्यात आली असल्याची माहिती आहे. सोनवणे यांचा मुलगा दिनेश सोनवणे यांनी याबाबतची माहिती दिली आहे. सध्या राज्यात निवडणुकीची धामधूम सुरू असून त्यात पक्षाच्या उमेदवारांना पायला भिंगरी बांधून मतदारांपर्यंत जोगवा मागावा लागत आहे. यातच चोपडा विधानसभा मतदारसंघातून शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे उमेदवार प्रभाकर सोनवणे यांना गुरुवारी सकाळी छातीमध्ये दुखू लागल्याने तथा अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना खाजगी रुग्णालयामध्ये उपचारार्थ दाखल करण्यात आले.

महायुतीकडून अमित ठाकरेंसाठी फिल्डिंग?

मुंबई : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी मनसेने माहीम मतदारसंघातून राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांना उमेदवारी दिली आहे. मात्र मनसेने लोकसभा निवडणुकीत महायुतीला पाठिंबा दिला होता. त्यामुळे या ठिकाणी महायुती अमित ठाकरे यांना मदत करण्यासाठी प्रयत्न करत आहे. या मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार सरवणकर यांनी अर्ज भरला आहे. मात्र महायुतीचा धर्म पाळण्यासाठी त्यांनी अर्ज मागे घेण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. मात्र सरवणकर आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. दरम्यान आता त्यांनी अर्ज मागे घ्यावा यासाठी त्यांना मोठी ऑफर दिली गेल्याची चर्चा सुरू आहे. दरम्यान अमित ठाकरे यांना मदत करण्यासाठी सदा सरवणर यांना अर्ज मागे घेण्यासाठी मनधरणी केली जात आहे. तसेच सदा सरवणकर यांना महायुतीकडून विधानपरिषदेची ऑफर देण्यात आल्याचे म्हटले जात आहे. त्यामुळे आता सदा सरवणकर काय निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सदा सरवणकर हे महायुतीचा दबाव स्वीकारून विधानपरिषदेची ऑफर स्वीकारणार का? याबद्दल राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

तासगाव-कवठेमहांकाळमध्ये एकाच नावाचे चार उमेदवार

तासगाव :राज्यात विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. अनेक उमेदवारांनी आपले अर्ज दाखल केले आहेत. नावात काय आहे? असे म्हटले जाते. पण आता नावात सगळं आहे, असं म्हणायची वेळ आली आहे. तासगाव - कवठेमहांकाळ मतदारसंघात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार रोहित पाटील यांच्या नावाशी साम्य असणाऱ्या अन्य तीन उमेदवारांनी आपले अर्ज दाखल केले आहेत. एकाच नावाचे अनेक उमेदवार झाल्यास मतदारांची दिशाभूल करून त्याचा फटका रोहित पाटील यांना बसले, अशी रणनीती विरोधकांनी आखली आहे. अन्य रोहित पाटील यांच्यापैकी एकाला पिपाणी हे चिन्ह मिळवून देण्याच्याही हालचाली सुरू आहेत. त्यामुळे पिपाणी आणि तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हांमुळे मतदारांची दिशाभूल होईल. त्याचा तोटा रोहित पाटील यांना बसेल, असे गणित विरोधकांनी बांधले आहे.

बंडखोराची समजूत काढायला अजितदादा थेट बंगल्यावर गेले

पुणे : सर्वच राजकीय पक्षांना या बंडखोरांचा सामना करावा लागत आहे. आता या बंडखोरांची समजूत काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. तसेच प्रयत्न आता उपमुख्यमंत्री अजित पवारही करत आहेत. चिंचवड मतदार संघ हा महायुतीत भाजपला सुटला आहे. तिथून भाजपने शंकर जगताप यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते नाराज झाले आहेत. काहींनी थेट शरद पवारांच्या राष्ट्रवादीत जाणे पसंत केले तर अजित पवारांचे जवळचे म्हणून ओळखले जाणारे नाना काटे यांनी बंडखोरी करणे पसंत केले आहे. त्यांची समजूत घालण्यासाठी अजित पवारांना त्यांचे निवासस्थान गाठावे लागले. नाना काटे हे चिंचवडमधील राष्ट्रवादीचे बडे नेते म्हणून ओळखले जातात. राष्ट्रवादीत झालेल्या फुटीनंतर त्यांनी अजित पवारांना साथ दिली. विधानसभा निवडणुकीत आपल्याला चिंचवड मतदार संघातून उमेदवारी मिळेल अशी त्यांना आपेक्षा होती. मात्र तसे झाले नाही. ही जागा भाजपला गेली. भाजपने शंकर जगताप यांना उमेदवारीही जाहीर केली. त्यानंतर नाना काटे यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यानंतर त्यांनी उमेदवारी मागे घ्यावी यासाठी अजित पवारांनी नाना काटे यांची त्या निवासस्थानी भेट घेतली. दोघांमध्ये बंद दाराआड अर्धातास चर्चाही झाली.

ठेचा धक्का!!
सुराज्य सोलापूर
शुक्रवार, दि. १ नोव्हेंबर २०२४ । पान १२

करमाळ्यात पुन्हा दोघांचे भांडण... तिसऱ्याचा लाभ!

✔ करमाळा/प्रतिनिधी

माजी आ. जयवंतराव जगतापांच्या साथीच्या भरवशावर विद्यमान आमदार संजयमामा शिंदे यांनी सुरुवातीपासूनच अपक्ष लढण्याचे ठरविले होते. नारायण पाटील यांना महाविकास आघाडी कडून लोकसभेवेळीच विधानसभेची उमेदवारी जाहीर झाली होती. त्यानंतर भाजपाऐवजी शिवसेनेकडून दिग्विजय बागल यांना उमेदवारी मिळाली. या सर्व ढवळाढवळीत 'दोघांचे भांडण.. तिसऱ्याचा लाभ' या उक्ती प्रमाणे जगतापांचा मोठा फायदा पाटील गटाला होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

अर्ज भरण्याच्या आदल्या दिवसापर्यंत महायुतीकडून करमाळ्याच्या उमेदवारीचा तिष्ठत ठेवला गेलेला तिढा दिग्विजय बागल यांना शिवसेनेची उमेदवारी मिळाल्यानंतर लीलया सुटला आहे. वरिष्ठांचा निर्णय प्रमाण मानून महायुतीतील घटक पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी फारसा विरोध न करता बागल यांची उमेदवारी मान्य करून युतीतून त्यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी हजेरीही लावली आहे. यानंतर मात्र तालुक्यातील राजकीय हालचालींना वेग आला आहे.

२०१९ च्या निवडणुकीत विद्यमान आमदार शिंदे यांना निवडून आणण्यात निर्णायक भूमिका बजावलेल्या माजी आमदार जयवंतराव जगताप यांची भूमिका यावेळी मात्र महायुतीची उमेदवारी जाहीर होईपर्यंत गुलदस्त्यातच होती. महायुतीतून शिवसेना आणि भाजपच्या इच्छुकांच्या दावेदाऱ्या आणि मुंबईत वरिष्ठांच्या भेटीगाठींच्या नाट्यमय घडामोडी होईपर्यंत इकडे माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी अकलूजकरांच्या माध्यमातून मंगळवारी सायंकाळी उशिरा महाविकास आघाडीतून पवार गटाचे उमेदवार असलेले मा.आ. नारायण पाटील यांना जाहीर पाठिंबा दिल्याचे जाहीर केले आणि इथूनच करमाळ्याचे रण तापण्यास सुरुवात झाली.

२०१८ च्या बाजार समितीच्या निवडणुकीत सभापती निवडीवेळी झालेल्या बंडखोरीचा वचपा काढण्यासाठी पंधरा वर्षापासून करमाळ्यात जम बसवू पाहणाऱ्या संजयमामांना २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत जयवंतरावांनी केवळ दोन-तीन सभा ठोकून त्यांना महत्त्वाची साथ दिली होती. त्यामुळे तालुक्यातील पारंपरिक गटातील भांडणाचा लाभ शिंदे यांना झाला होता. यानंतर सत्ता स्थापनेचा तिढा, कोरोना महामारी, त्यानंतर झालेले सत्तांतर यातच तीन वर्षे निघून गेली. गुवाहाटी कांड घडल्यानंतर अजित दादा पवार उपमुख्यमंत्री झाले आणि २०२४ ची विधानसभा डोळ्यांसमोर ठेवून विद्यमान आमदार शिंदे यांनी तालुक्यात विकास कामांना मंजूऱ्या आणण्याचा सपाटा लावला. मात्र हे घडत असताना आ. शिंदेकडून घेतलेले काही निर्णय जयवंतरावांना पटले नाहीत आणि ऐन विधानसभेच्या तोंडावर त्यांची नाराजी आ. शिंदे यांच्यावर ओढावली.

निवडणूक जाहीर झाल्यानंतर शिंदे यांच्याकडून जगतापांची नाराजी दूर करणे अपेक्षित होते. मात्र याबाबत त्यांच्याकडून काही प्रयत्न झाल्याचे दिसले नाही. जागा वाटपाचा आणि उमेदवारीच्या भिजत पडलेले घोंगडे वाफावण्याच्या नादात महायुतीकडूनही स्थानिक पातळीवरील राजकीय नाराजीचा फायदा घेण्याकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे तालुक्यात निर्णायक मतदान असलेल्या जगताप गटाला आपलेसे करण्याची संधी महाविकास आघाडीकडून हेरण्यात आली आणि वरिष्ठ स्तरावरून प्रयत्न होऊन पाटील यांना जगताप यांची साथ अलगद मिळाली.

माळशिरसचा आखाडा
कोणत्या पैलवानाच्या हातात विजयाची गदा?

✔ सोलापूर/प्रतिनिधी

सध्या महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचा आखाडा चांगलाच रंगला असून माळशिरस विधानसभा मतदारसंघांतील कुस्तीकडे सर्वांचे लक्ष केंद्रित झाले आहे. या मतदारसंघातून निवडणूक लढविणारे पैलवान चांगलेच कसलेले असून त्यांच्या डावांची आणि प्रतिडावांच्या चर्चांना जोर आला आहे. आरोप आणि प्रत्यारोपाच्या फैरी उमेदवारी अर्ज भरायच्या दिवशीच सुरू झाल्या त्यामुळे कोण कुठला डाव खेळतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

माळशिरस तालुक्यातील लाडक्या बहिणी सुज्ञ आहेत त्या या लाडक्या भावाला मतदान करुन पुढे विधानसभेत पाठवतील असा मला विश्वास असून लाडकी बहीण योजना पुढे चालू राहण्यासाठी कमळाला मतदान करणे गरजेचे आहे. अन्यथा हे पंजावाले आणि तुतारीवाले सावत्रभाऊ ही योजना बंद करून गोरगरीब बहिणींच्या ताटातील घास हिरावून घेणार आहेत असे भाजपाचे उमेदवार राम सातपुते यांनी दि. २९रोजी शेवटच्या दिवशी निवडणूक अर्ज भरल्यानंतर सांगितले.

राम म्हणे ....

लाडकी बहीण योजना पुढे चालू राहण्यासाठी कमळाला मतदान करा

माळशिरस तालुक्यातील जनता तहसीलदाराला मारणाऱ्या आणि दलितांना डावलून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या आरक्षणाची अवहेलना करून खोटे सर्टिफिकेट काढून निवडूक लढविणार्यांच्या बाजूने जनता कधीही राहणार नाही. निवडणूक माळशिरस तालुक्यातील जनतेने हातात घेतली असून मागील पाच वर्षाच्या कामावर आपला माणूस म्हणून मला निवडून देणार आहेत. मागच्या पाच वर्षे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीं, गृहमंत्रीअमित शहा, राज्याचे नेते देवेंद्र फडणवीस आणि माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जनतेची सेवा करण्याची संधी मिळाली. यापुढे अशीच सेवा करण्यासाठी तालुक्यातील विकास कामांना गती देण्यासाठी मी रिंगणात उभा आहे. यावेळी माझ्या पाठिशी अनेक दृश्य अदृश्य शक्तींचा पाठिंबा मला आहे. राम सातपुते पळणारा नाही तर लढणारा कार्यकर्ता आहे त्यामुळे सर्व बाजूंनी जनतेचे आणि आमचे ठरले आहे. असे अर्ज भरण्यासाठी जमलेल्या कार्यकर्त्यांना आवाहन केले.

डाव-प्रतिडाव : सरावाच्या सामान्यातील डाव-प्रतिडांवाने माळशिरस विधानसभा निवडणुकीचा आखाडा चांगलाच रंगला असून. माळशिरस विधानसभा मतदारसंघातही अनेक पैलवान आपले दंड थोपटून तयार झाले आहेत असेच म्हणावे लागेल. यंदाची निवडणूक डाव प्रतिडावाने जरी गाजणार असली तरीही आपापल्या तालमीतले मुख्य वस्ताद ऐनवेळी कोणता डाव टाकतात यावर विजय निश्चित असणार आहे. वस्ताद व पैलवान जरी ताकदीचे असून राजकीय आखाडे बांधत असले तरीही अंतिम निर्णय जनतेच्या मनोआखाड्यावर अवलंबून आहे. हे कोणत्या पैलवानाच्या हातात विजयाची गदा सोपवतात हे येत्या काही दिवसात स्पष्ट होईल.

उत्तमाची बोली

तालुक्यातील खासदार आणि आमदार व्हावा अशी जनतेची भावना

हा देश संविधानावर चालतो कोणत्याही कटकारस्थानांवर नाही हे आपल्याला त्यांना दाखवून द्यायचं आहे. आपण आणी मोहिते- पाटील यांनी मिळून निवडुन दिलेले आमदार खासदार इथल्या नेतृत्वाला बाजुला सारून मुंबईच्या आदेशाने येथील कारभार पहात होते. त्यांचा डाव आम्ही ओळखला.याच तालुक्यातील खासदार व्हावा आणि याच तालुक्यातील आमदार व्हावा अशी येथील जनतेची भावना आहे. त्यामुळे आमचे ठरले आहे. मोहिते पाटील हे शब्दाला जागणारे म्हणून प्रसिध्द आहेत.

बाळदादांच्या मार्गदर्शनाखाली मी या तालुक्यात काम करणार आहे. माझ्यासाठी बाळदादांचा शब्द अंतिम असेल.

पंढरीत तुतारीला हात की हाताला तुतारी?

✔ पंढरपूर/प्रतिनिधी

महाविकास आघाडीमध्ये समन्वयाचा अभाव असल्यामुळे पंढरपुरात दोन पक्षाकडून उमेदवारांना एबी फॉर्म दिला गेला. काँग्रेस पक्षाकडून भगीरथ भालके यांना तर पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाकडून अनिल सावंत यांना एबी फॉर्म देण्यात आला. या मतदारसंघात दोन्ही पक्षाकडून उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. त्यामुळे हा तिढा ४ नोव्हेंबरपर्यंत चालणार आहे. तोपर्यंत कोण माघार घेणार आणि महाविकास आघाडी उमेदवार भालके की सावंत याची उत्सुकता लागली आहे. दोघांनीही उमेदवारी कायम ठेवली तर आघाडीत बिघाडी होणार असून त्यामुळे तिरंगी लढत होणार आहे.

विठ्ठल साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष भगीरथ भालके यांना शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून उमेदवारी मिळणार असे चित्र रंगले होते. परंतु भालके यांनी दिल्लीवारी करून काँग्रेसकडून एबी फार्म मिळविला आणि उमेदवारी अर्ज दाखल केला. यामुळे पंढरपुरात भाजपचे समाधान आवताडे व काँग्रेसचे भगीरथ भालके यांच्यात थेट लढत होईल, असे वाटत होते. दरम्यान, भैरवनाथ शुगरचे उपाध्यक्ष अनिल सावंत यांनी स्थानिक कार्यकर्त्यांच्या मदतीने शरद पवार यांच्याकडून एबी फॉर्म मिळविण्यात यश मिळवले व राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाची उमेदवारी दाखल केली. आता काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार या दोन्ही पक्षांमध्ये काय ठरते व उमेदवारी कोणाला निश्चित होणार याचा निर्णय वरिष्ठ पातळीवरून लवकरच घ्यावा लागणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट व काँग्रेस या दोन्ही पक्षांकडून मी अर्ज भरलेले आहेत अर्ज मागे घेण्यासंदर्भात वरिष्ठ पातळीवर चर्चा सुरू आहे. याबाबत वरूनच निर्णय होणार आहे

-भगीरथ भालके

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या मार्गदर्शनाने पक्षाकडून पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह उमेदवारी अर्ज भरला आहे. मला पक्षाने अधिकृत एबी फॉर्म दिला आहे. यामुळे पूर्ण ताकदीने ही निवडणूक लढवणार आहे.

-अनिल सावंत

महाराष्ट्रात एमआयएम नरमली! सोलापूरसह अवघ्या १४ जागी उमेदवार

✔ सोलापूर/प्रतिनिधी

सध्या राज्यात विधानसभा निवडणुकीची धामधूम सुरू आहे. सत्ताधारी आणि विरोधकांपैकी कोणकोणते उमेदवार उभे राहणार याची जेवढी उत्सुकता असते तेवढीच, ती छोट्या पक्षांबाबतही असते. मुस्लिम मते मिळावीत आणि अधिकाधिक राज्यात पक्षाचा विस्तार व्हावा, या उद्देशाने असदुद्दीन ओवेसी यांनी एमआयएम पक्ष हैदराबादमधून बाहेर काढून महाराष्ट्रात रुजवण्याचा प्रयत्न केला. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी लोकसभेची देखील एक जागा जिंकली. त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत ओवैसी यांनी सर्वाधिक म्हणजे ४४ उमेदवार उभे केले होते. त्यामुळे, यावेळी देखील ते जास्तीतजास्त उमेदवार उतरवतील, असा अंदाज होता. मात्र, यावेळी ओवेसींनी अवघ्या १४ जागांवर उमेदवार दिले आहेत. आपला हात आखडता घेतला आहे. त्यामध्ये सोलापूरच्या शहर मध्य या जागेचा समावेश आहे.

२०१९ च्या निवडणुकीत असदुद्दीन ओवेसी यांनी ४४ जागांवर आपले उमेदवार उभे केले होते, तर २०१४ च्या निवडणुकीत २४ जागांवर निवडणूक लढवली होती. असे असतानाही यंदा त्यांनी आधीच्या दोन निवडणुकांच्या तुलनेत कमी उमेदवार दिले का दिले असावेत, या राजकीय गणिताचा अंदाज बांधला जात आहे. दरम्यान, एम आयएम हा प्रामाणिक पक्ष नव्हता; त्यांनी पळ काढला, असे सांगत वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी नुकतीच एमआयएम सोबत न गेल्याचे कारण सांगितले होते. हे सांगतानाच अल्पसंख्याकापर्यंत पोहोचण्यासाठी आम्हाला इतर पक्षांची आवश्यकता नसल्याचे देखील ते म्हणाले होते.

एमआयएमचे उमेदवार

विधानसभेच्या एकूण २८८ जागांपैकी असदुद्दीन ओवेसी यांच्या एमआयएमने केवळ १४ जागांवर उमेदवार उभे केले आहेत. यात औरंगाबाद पूर्वम धून माजी खासदार इम्तियाज जलील यांना उम दवारी देण्यात आली आहे. औरंगाबाद मध्यम धून नासिर सिद्दीकी, धुळे शहरातून फारुख शाह अन्वर, मालेगाव मध्यमधून मुफ्ती इस्माईल कासमी, भिवंडी पश्चिममधून वारिस पठाण, भायखळामधून फैयाज अहमद खान, मुंब्रा कळव्यातून सैफ पठाण, वर्सोवा येथून रईस लष्करिया, सोलापूरमधून फारूख शाब्दी, मिरजमधून महेश कांबळे, मूर्तिजापूरमधून सम्राट सुरवाडे, कारंजा मानोरामधून मोहम्मद युसूफ, नांदेड दक्षिणमधून सय्यद मोईन आणि कुर्लामधून बबिता कानडे यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

मुस्लिम-दलित मते हाच मुख्य आधार

ओवेसींचे लक्ष दलित आणि मुस्लिम व्होट बँकांवर असल्याचे दिसते. ही राज्यातील महत्वाची व्होट बँक आहे. महाराष्ट्रात १३ टक्के दलित आणि १२ टक्के मुस्लिम लोकसंख्या आहे. ओवेसी यांच्या १४ उमेदवारांपैकी ११ मुस्लिम आणि तीन दलित उमेदवार उभे केले आहेत. आजवर अनेक राजकीय पक्षांनी या दोन समाजांच्या मदतीने सत्ता काबीज करण्याचा प्रयत्न केला आहे. ओवेसींवर भाजपची बी-टीम असल्याची आरोपही अनेकदा करण्यात येतो. अनेक जागा लढवून ओवेसी शेवटी भाजपला विजयी करण्याचे काम करतात, असा आरोप त्यांच्याकडे सातत्याने होत असतो. यामुळेच, मुस्लिमांच्या मनात ओवेसींबद्दल संशय निर्माण झाला आहे. हाच संशय घालवण्यासाठी ठरावीक जागांवर लक्ष केंद्रित करून जास्तीत जास्त उमेदवार जिंकवण्याचा ओवेसींचा प्रयत्न आहे.